# तक्षशिला

ना
६०

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
096234

लेखक :
श्रीधर विनायक वर्तक, बी. ए.

नगर वाचनालय सातारा
ग्रंथ स्थानांक - ना-६०
दाखल नं. - ९६२३४
पाने - ८९
किंमत - —
दिनांक - २२/९/०९

१९३३

वाचनालय
सातारा.

हेन्रिक् ईब्सेन



[ १८२८—१९०६ ]

*All Rights Reserved by the Publisher*

Printed & Published by V. P. Pendherkar at the
Tutorial Press, 211a, Girgaon Back Road, Bombay

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

# निवेदन

नाट्यमहर्षी हेन्रीक् ईब्सेन यांचें हें नाटक रंगभूमीवर आणतांना मला साहजिकच अत्यानंद होत आहे. ईब्सेनचें लिखाण वाचल्यामुळेंच माझें लक्ष रंगभूमीकडे जोरानें खेंचलें गेलें व माझ्या नाट्यविषयक कामगिरीला सुरवातही इब्सेनच्या नाटकाच्या या भाषांतरापासूनच झाली; कारण जरी माझी 'आंधळ्यांची शाळा' व 'लपंडाव' हीं नाटकें अगोदरच प्रसिद्ध होऊन गेलीं आहेत तरी कालानुक्रमाच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास माझें रंगभूमीवर आणण्यालायक असें पहिलें नाटक हेंच आहे.

हें नाटक ईब्सेन्च्या Hœrmœndene Paa Helgeland या नाटकाचें भाषांतर आहे. हें नाटक त्यानें १८५७ सालीं म्हणजे आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी लिहिलें.

आपल्या सामाजिक नाटकांच्या द्वारें ईब्सेन जन्मभर स्त्रीयांच्या हक्कांकरतां लढला; त्याच्या या मतांची पूर्व छाया या नाटकावर पडलेली दिसते. विशेषतः तिसऱ्या अंकांतील शक्तिसागर व तक्षशिला यांचें संभाषण वाचलें असतां माझ्या या विधानाची सार्थकता वाचकांस पटल्यावांचून राहणार नाहीं. तरी पण येथें ही गोष्ट स्पष्टपणें नमूद केली पाहिजे कीं, पुढें आपल्या क्रांतिकारक तत्वज्ञानानें सर्व जगभर प्रसिद्धी पावलेला ईब्सेन व हें नाटक लिहिणारा ईब्सेन यांमध्यें पुष्कळच फरक आहे. परिणतावस्थेस पोंचल्यानंतरचीं ईब्सेनचीं नाटकें या नाटकाशीं ताडून पाहिलीं असतां या नाटकांत कांहीं किरकोळ दोष आढळतील यांत शंकाच नाहीं. परंतु या नाटकाचा एक विशेष असा आहे कीं, ईब्सेनचें जें विशिष्ट नाट्यतंत्र आहे तें या नाटकांत जवळजवळ पूर्णत्वास पोंचलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. हें नाटक लिहिण्याच्या अगोदरचीं इब्सेनचीं नाट्य-विषयक व इतर लिखाणें अपरिपक्व स्वरूपाचीं होतीं. परंतु या नाटकांत त्याच्या सर्व शक्ति प्रतिबिंबीत झाल्या आहेत व म्हणूनच या नाटकाची त्याच्या एकंदर नाटकांत एक प्रकारची विशेष योग्यता मानिली जाते.

या नाटकाचें कथानक अद्भूतरम्य व नवलपूर्ण असून एका उच्च दर्जाच्या मानिनी स्त्रीची वंचना व प्रेमभंग आणि त्यामुळें दोन श्रेष्ठ जीवनांचा नाश हा त्या कथानकचा निष्कर्ष आहे.

या नाटकाचा दुसरा अंक म्हणजे नाट्य-रचना-कौशल्याची परमावधि, असें कित्येक टीकाकारांचें मत आहे व तो अंक वाचल्यावर व प्रत्यक्ष रंगभूमीवर पाहिल्यावर वाचकांचें व प्रेक्षकांचेंही तेंच मत होईल यांत मला शंका वाटत नाहीं.

चौथ्या अंकांतील अरुणदेवाच्या तोंडची कविता माझे कवि मित्र श्री० अनंत काणेकर यांनीं लिहिली असून, ती छापूं दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

गिरगांव, मुं. नं. ४
२८-११-३३

श्री० वि० वर्तक

# तक्षशिला

## अंक १ ला

[ **स्थळ**—एक उंच तुटलेला कडा. त्याची मागची बाजू उतरत उतरत समुद्रांत घुसलेली आहे. डाव्या बाजूला एक नौकागृह. उजव्या बाजूला वृक्षाच्छादित टेकड्या. पलिकडे खालच्या अंगाला समुद्रांत दोन लढाऊ जहाजांच्या डोलकाठ्या दृग्गोचर होत आहेत. लांब दूरवर समुद्रांत उजव्या अंगाला खडक व थोडींशीं बेटें दिसत आहेत. दिवस हिंवाळ्याचे असून खूप वादळ सुटलें आहे.

शक्तिसागर जहाजांतून उतरून किनाऱ्यावर नुक्ताच आला आहे. त्याच्या अंगांत पांढरा झगा असून, त्याच्यावर चांदीचा कमरपट्टा आहे. त्याच्यावरून निळा पायघोळ अंगरखा पांघरलेला आहे. पायांत मोजे असून केसांच्या कातड्याचे बूट आहेत. डोक्याला पोलादाचें शिरस्त्राण असून कमरेला फक्त आंखूड तरवार लटकत आहे.

त्याच्या मागोमाग उजव्या बाजूच्या टेकाडावरून अरुणदेव प्रवेश करतो. त्याच्या अंगांत मेंढराच्या कातड्याचा काळा झगा असून अंगांत चिलखत घातलेलें आहे. पायांत मोजे व त्यावरून केंसांचे बूट. खांद्यावरून पिंगट किनार असलेला पायघोळ अंगरखा घेतलेला आहे. डोक्यावर शिरस्त्राण असून तोंडाचा कांहीं भाग त्यानें झग्यानें झांकून घेतला आहे. तो उंच असून अतिशय मजबूत आहे. त्याची दाढी पांढरी शुभ्र असून खूप लांब आहे. उतार वयामुळें कमरेंत किंचित् पोंक आला आहे. ढाल, तरवार व भाला इत्यादि आयुधांनीं तो सजलेला आहे.

शक्तिसागर पहिल्यानें पुढें येतो, एकवार सभोंवार नजर फेंकतांच त्याला नौकागृह दिसतें. त्याबरोवर तावडतोब घाईघाईनें त्याच्याजवळ जातो व दरवाजा मोडून उघडण्याचा प्रयत्न करतो. अरुणदेव पुढें सरसावून खालीं उतरतो. सागरला पाहून किंचित् दचकतो. त्याला त्याची ओळख पटल्यासारखी वाटते. एक पाऊल पुढें घेऊन तो बोलावयास सुरवात करतो. ]

**अरुण०:**—ए, मागं सरक !

**सागर:**—( वळून तरवारीला हात घालतो. ) जन्मांत मी कधींच मागं सरकलों नाहीं.

**अरुण०:**—बऱ्या बोलानं मागं सरक ! माझे सैनिक थंडीनं गारठून गेले आहेत; त्यांना निवाऱ्याची जागा पाहिजे.

**सागर:**—आणखी मला तर ती एका थकलेल्या स्त्रीकरितां पाहिजे.

**अरुण०:**—एका यःकश्चित् स्त्रीपेक्षां मला माझ्या सैनिकांची किंमत जास्त वाटते.

**सागर:**—( जरा हंसून ) बदमाष लोकांची किंमत इतकी वाढली तर एकूण !

**अरुण०:**—( तरवार उपसून ) या उर्मटपणाचा जाब तुला रक्तानंच द्यावा लागेल.

**सागर:**—( तरवार उपसून ) आजोबा, ही गोष्ट तुम्हालाच जड जाईल. ( अरुणदेव त्याच्यावर हल्ला करतो. सागर त्याचे वार परतावितो. किनाऱ्यावरून सरिता व सागरची कांहीं माणसें प्रवेश करतात. उजवीकडील टेकाडावरून अरुणदेवाचे सहा मुलगे प्रवेश करतात. सरिता सर्वांच्या अगोदर येऊन पोहोंचते व सागरला लढतांना पाहून )

**सरिता:**—धांवा ! धांवा ! सागर एका परकी माणसाबरोबर लढताहेत.

**अरुणदेवाचीं मुलें:**—चला, चला, बाबांच्या मदतीला चला.

**सागर:**—( आपल्या सैनिकांस उद्देशून ) मागं हटा ! याच्याशीं लढायला मी एकटा पुरेसा आहे.

**अरुण०:**—( आपल्या मुलांस उद्देशून ) तुम्ही मधें पडूं नका ! ( सागरास ) संभाळ !

**सागरः**—आपणच संभाळा! ( त्याच्या हातावर वार करतो. म्हाताऱ्याची तरवार गळून पडते. )

**अरुण०ः**—शाबास! वीरा, शाबास! प्रत्यक्ष सागर सुद्धां तुझा हा पराक्रम पाहून खालीं मान घालील.

**सागरः**—( हंसून ) तर मग मलाच खालीं मान घालावी लागणार म्हणायची!

**अरुणदेवाची मुलेंः**—कोण तुम्ही, सागर? तुम्ही शूर वीर शक्तिसागर!

**अरुण०ः**—पण माझी मुलगी पळवून नेलीस त्या रात्रीं तुझ्या तरवारीचं पाणी कांहीं औरच होतं ( तोंडावरचं आवरण काढून टाकतो. )

**सागर व त्याचे सैनिकः**—कोण अरुणदेव!

**सरिताः**—( आनंदानें ) कोण? बाबा! भाऊ!

**सागरः**—सरिते, अशी माझ्या पाठीशीं उभी रहा.

**अरुण०ः**—आतां इतक्या सावधगिरीची जरूरी नाहीं. ( सागरजवळ येऊन ) मी तुला पाहिल्याबरोबर ओळखलं. सर्व जगांत प्रख्यात लढवय्या अशी तुझी ख्याती आहे, म्हणून केवळ तुझी परीक्षा पहाण्याकरतां मीं हें भांडण उपस्थित केलं. आजपासून आपण दोस्त होऊंया!

**सागरः**—तसं झालं तर फार चांगलं होईल!

**अरुण०ः**—( त्याला मिठी मारून ) सागर, तूं अजिंक्य वीर आहेस. या म्हाताऱ्याशीं दोन हात करून त्याला उघड युद्धांत जिंकणारा पहिला योद्धा आहेस!

**सागरः**—( त्याचा हात आपल्या हातांत धरून ) तर मग आपणा दोघां-मधील हा शेवटचाच युद्धप्रसंग समजा. बोला, कोणच्या अटींवर माझ्याशीं तह करण्याची आपली इच्छा आहे?

**अरुण०ः**—( सर्वांस उद्देशून ) ऐका, सर्वजण ऐका! आज बरोबर आठ पावसाळे पुरे झाले, सागर आणि त्याचा मित्र गुनार मुलुखगिरीवर असतांना माझ्या घरीं आले. उच्च दर्जाच्या पाहुण्यांना उचित असा मी त्यांचा सन्मान केला. पण गुनारनं जबरदस्तीनं माझी मानलेली मुलगी पळवली आणि सागर, तूं तर प्रत्यक्ष माझी पोटची पोरच घेऊन निघून गेलास त्या पापाची निष्कृति म्हणून

आम्ही तुला तीनशें दिनार दंड करतो. ते दिल्याबरोबर आमचा तुमचा तंटा मिटला असं समजा.

**सागरः**—आपण खरोखरच फारच सोप्या अटी घालीत आहांत. अत्ताच्या अत्तां आपण सांगितलेल्या रकमेची भरपाई करण्यांत येईल; इतकंच नव्हे, तर श्वेतद्वीपाच्या राजानं दिलेला हा दुर्मिळ रेशमाचा झगा मी आपखुशीनं आपणांस अर्पण करीन.

**सरिताः**—आपलं आजचं वर्तन आपल्या शौर्याला व औदार्याला शोभेल असंच आहे. (बापाकडे वळून) बाबा, तुमच्या आजच्या कृतीबद्दल मी तुमची कशी उतराई होऊं ? आज मी खरोखरीची सुखी झाल्यें. भाऊ—( आपल्या भावांशीं एका बाजूला कुजबुजत उभी रहाते. )

**अरुण०ः**—आज आपलं भांडण मिटलं. माझी मुलगी मला परत मिळाली. सागर, तुमचं लग्न आमच्या सम्मतीनं झालं असं समजून यापुढं तुमचा मानमरातब ठेवण्यांत येईल.

**सागरः**—आतां आपल्या मुलांप्रमाणं मी निरंतर आपल्या पाठीशीं आहें असं समजा.

**अरुण०ः**—त्या संबंधीं माझी खात्री आहे इतकंच नव्हे तर तुझ्या कसोटीची वेळही अगदीं जवळ येऊन ठेपली आहे.

**सागरः**—माझी तयारी आहे. बोला-आपली काय आज्ञा आहे ?

**अरुण०ः**—कायेनं, वाचेनं, मनानं मला तुझी मदत हवी आहे. गुनारला हुडकून काढण्यासाठीं मी या बेटाकडे आपलीं जहाजं हांकारलीं आहेत, तक्षशिलेला लबाडीनं पळवून नेल्याबद्दल मला त्याचा जाब विचारायचा आहे.

**सागरः**—( थक्क होऊन ) काय ! गुनार !

**सरिताः**—तक्षशिला ! कुठं सांपडणार तीं दोघं तुम्हाला ?

**अरुण०ः**—कुठं म्हणजे ! गुनारच्या घरीं !

**सागरः**—गुनारच्या घरीं ! कुठं आहे गुनारचं घर !

**अरुण०ः**—येथून चार बाणांच्या टप्पावर. ( बोटानें दिशा दाखवतो. ) तुम्हाला माहीत नाहीं ?

**सागरः**—छे! मागं आमची समुद्रावर चुकामूक झाली त्या नंतर मी गुनारचा कधींच शोध केला नाही. मी मुलुखगिरीवर फिरतों आहें आणखी गुनार घरीं वडिलार्जित जमिनीचा उपभोग घेतो. आज वादळामुळं गलबतं भडकून मी केवळ यदृच्छेनं या किनाऱ्याला लागलों. आतां हें मात्र खरं कीं गुनार इथंच कोठं तरी रहातो येवढं मला माहीत होतं.

**सरिताः**—( बापाकडे वळून ) अस्सं! तर मग गुनारच्या शोधाकरतां आपण घर सोडलंत एकूण!

**अरुण०ः**—होय. ( सागरास ) आपली भेट केवळ दैववशात् झाली. तुला हुडकून काढायची माझी इच्छा असती तरी तुझा मागमूस लागणं मला फारच कठीण गेलं असतं.

**सागरः**—खरं आहे तें!—हो पण—गुनारचं काय? अरुणदेव, मला असं सांगा कीं, वाटेल त्या भल्याबुऱ्या उपायांनीं गुनारचा कोंडमारा करण्याचा आपण निश्चय केला आहे का?

**अरुण०ः**—अर्थात्! सागर, माझं काय म्हणणं आहे तें एकदां नीट ऐकून घे. मागच्या उन्हाळ्यांतली गोष्ट. माझ्या धाकट्या मुलाच्या–बलदेवाच्या–वाढदिवसानिमित्त सर्व सरदारांना मीं मेजवानी दिली. मेजवानी आटोपल्यावर दिवाणखान्यांत सर्व मंडळी जमली आणि बोलण्यावरून बोलणीं निघतां निघतां बायकांना पळवून नेण्याच्या गोष्टी सुरू झाल्या, आणखी एका क्षणांत माझ्यावर गुनारचा सूड न घेतल्याबद्दल कडक टीकेचा भडिमार सुरू झाला; माझ्या अंगाचा नुसता भडका उडाला आणि मी तिथल्या तिथं शपथ घेतली कीं, गुनारला योग्य तो दंड द्यायला लावल्याशिवाय किंवा त्याचा अन्य रीतीनं भयंकर सूड घेतल्याशिवाय पुन्हां हें काळं तोंड स्वकीयांना दाखवायचं नाहीं.

**सागरः**—ठीक आहे. तसं असेल तर कसंही करून आपणांला हा प्रश्न तडीला लावलाच पाहिजे!

**अरुण०ः**—अर्थात्! पण घाबरूं नको. मी गुनारवर भलत्याच अटी लादणार नाहीं; कारण गुनार शांतताप्रिय आहे. ( एकदम आवाज बदलून ) सरिते, या प्रवासाला निघालों हें एक प्रकारें फार चांगलं झालं. अलीकडे माझा घरीं बसल्या बसल्या कांहीं केल्या वेळ जातां जात नसे. सर्व जन्म मी समुद्रावर संचार करण्यांत

घालवला—वरतीं नीलवर्ण अनंत आकाश—खालीं झोके देणाऱ्या समुद्राच्या प्रचंड नीलवर्ण लाटा—अशा या निसर्गाच्या रम्य पाळण्यांत माझे काळ्याचे पांढरे झाले–शिवाय आयुष्याची सहचरी देवाघरीं निघून गेली; मोठीं मुलं प्रतिवर्षी मुलुखगिरीवर जाऊं लागलीं, बलदेवसुद्धां प्रतिवर्षी चंद्रकलेप्रमाणं वाढूं लागला.

**सरिताः**—( आनंदानें ) बलदेव तुमच्याबरोबर आहे ?

**अरुण०ः**—होय. तो तिकडं गलबतावर आहे. काय छोकरा झाला आहे म्हणून सांगूं ! सरिते, तूं घर सोडल्यापासून काय वाढला आहे म्हणतेस ! छोकरा प्रति शक्तिसागर होणार !

**सरिताः**—( हंसत ) बाबा, हें चागलं नाहीं बरं का ! आम्हां सर्वांपेक्षां तुम्ही त्याच्यावरच जास्त प्रेम करतां !

**अरुण०ः**—अग तो सर्वांत लहान आहे—माझा बछडा ! शिवाय त्याचा तोंडवळा त्याच्या आईसारखा आहे—म्हणून बरं...

**सागरः**—पण मला असं सांगा—तुमचं आणि गुनारचं हें प्रकरण—आजच्या आजच ...

**अरुण०ः**—होय आजच्या आज—उद्याची बात नाही. योग्य रकम गुनारनं भरपाई म्हणून दिली तर मी तावडतोब माघार घ्यायला तयार आहे. पण गुनारला तंटा मिटवण्याचा हा मार्ग पसंत न पडला तर त्याचं नशीब त्याच्याबरोबर !

[ कर्णराज प्रवेश करतो. ]

**कर्णराजः**—वीरहो ! तुम्ही भेटलांत फार चांगलं झालं !

**अरुण०ः**—वीरांची भेट नेहमीं चांगलीच असते असं नाहीं !

**कर्णराजः**—तुम्ही जर खानदानीचीं माणसं असाल तर मला तुमच्यापासून अभय पाहिजे. गुनारचीं माणसं माझा खून करण्याकरतां माझ्यावर चाल करून येत आहेत.

**अरुण०ः**—गुनारचीं माणसं !

**सागरः**—तर मग तूंच कांहीं तरी त्याचा अपराध केला असला पाहिजेस.

**कर्ण०:**—मी आपला अधिकार सोडून मुळींच वागलों नाहीं. किनाऱ्या-जवळच्या एका लहानशा बेटावर आम्ही आपलीं गुरं चरणीस लावलीं होतीं-गुनारच्या माणसांनीं येऊन आमचे उत्कृष्ट खोंड विनाकारण उधळून लावले, त्याच्या एका नोकरानं मला शिव्या दिल्या, फार काय सांगू ' लवंडा ' म्हणायला सुद्धां कमी केलं नाही. मला साहजीकच फार त्वेष चढला व मी त्याला तिथल्या. तिथं छाटून टाकला.

**अरुण०:**—बरोबर ! बरोबर ! कोणताही स्वाभिमानी मनुष्य तुझ्यासारखाच वागला असता.

**कर्ण०:**—पण आज सकाळीं उठून पहातो तों त्याची माणसं माझ्यावर तोंड करून आलेलीं. योग्य वेळीं इशारत मिळाली म्हणून बरं झालं, मला निसटून तरी जातां आलं. पण आतां विसावा घ्यायला सुद्धां फुरसत नाहीं. कारण शत्रू अगदीं पाठीवर आहे !

**सागर:**—ए ! तुझ्या बोलण्यावर माझा मुळींच विश्वास बसत नाहीं. गुनारला मी अगदीं लहानपणापासून ओळखतो. तो निरपराधी माणसावर कधींच हल्ला करणार नाहीं.

**कर्ण०:**—खुद्द गुनारचा यांत फारच थोडा हात आहे. या सर्वांच्या मुळाशीं त्याची बायको—तक्षशिला ...

**सरिता:**—तक्षशिला !

**अरुण०:**—(स्वतःशीं पुटपुटत) तक्षशिला–ती–कारटी काय वाटेल तें करील.

**कर्ण०:**—त्याच्या दासाला मारल्याबद्दल मी गुनारला योग्य दंड द्यावयास तयार होतों, आणि तोहि तंटा तोडायला तयार झाला. पण तक्षशिला मध्यें पडली आणि तिरस्कारयुक्त शब्दांनीं नवऱ्याला टोंचून तिनं आमचा तह उलथून पाडला. शेवटीं गुनार दक्षिणेकडे निघून गेला अन् आज सकाळीं —

**सागर**—ती पहा दक्षिणेकडून कोणी माणसं येत आहेत.

**कर्ण०:**—अं ! हा तर गुनार !

**अरुण०:**—( कर्णास ) तूं स्वस्थ रहा ! मी गुनारशीं या बाबतींत वाटाघाट करून पहातों.

[ गुनार सैनिकांसह प्रवेश करतो. त्याचा पोषाख साधा असून कमरेला फक्त एक लहानशी कुऱ्हाड आहे. ]

**गुनारः**—( कांहीं वेळ सर्वांच्याकडे निरखून पाहून ) कोण अरुणदेव!

**अरुण०ः**—होय मीच तो!

**गुनारः**—या! या! घर आपलं आहे—आपण मित्रभावानं आलां असाल तर!

**सागरः**—भाई! भाई गुनार......

**गुनारः**—कोण? भाई शक्ति! ( दोघे कडकडून भेटतात.) तूं यांच्याबरोबर आहेस! तर मग खात्रीनं अरुणदेव मित्रभावानंच आले असले पाहिजेत. ( अरुणदेवास ) आपण कां आलांत तें ओळखणं फारसं कठीण नाहीं. खात्रीनं तक्षशिलेला पळवून नेल्याबद्दलचा जाब विचारायला—

**अरुण०ः**—तुझा तर्क खरा आहे. माझ्या सम्मतिशिवाय तूं तिला घेऊन गेलास हा तूं फार मोठा गुन्हा केला आहेस.

**गुनारः**—धर्म आणि व्यवहार हीं दोन्हीं तुमच्या बाजूला आहेत. तरुणपणच्या उच्छृंखल कृत्याबद्दल प्रत्येकानें दंड सोसलाच पाहिजे. आपण माझा जाब विचारण्याकरतां याल असं मला फार दिवसांपासून वाटतच होतं, आणखी जर दंड देऊन हा तंटा मिटण्यासारखा असेल तर माझी तयारी आहे.

**सागरः**—होय मलाहि हाच मार्ग पसंत आहे. अरुणदेव खात्रीनं फार कडक अटी घालणार नाहींत.

**गुनारः**—तें तर खरंच, कारण तक्षशिलेच्या योग्यतेप्रमाणंच दंड द्यायचा म्हटला तर माझं सर्वस्व देऊन टाकलं तरी भरपाई होणं कठीण!

**अरुण०ः**—घाबरूं नका. मी व्यवहार सोडून वागणार नाहीं. पण अगोदर दुसरा एक तंटा आपणांला तोडायचा आहे. ( कर्णाकडे बोट दाखवून ) या इसमाला तं ओळखतोस?

**गुनारः**—( पाहून ) कर्णराज! ( अरुणदेवाकडे वळून ) याचं माझं भांडण आहे हें आपल्याला माहीत नाहीं?

**अरुण०**:—तुझ्या माणसांनीं याचीं गुरं उधळून लावलीं त्याबद्दल तूं त्याची नुकसानभरपाई केलीच पाहिजेस !

**गुनार**:—पण त्यानं माझा दास मारला त्याबद्दल त्यानं अगोदर भरपाई केली पाहिजे.

**कर्ण०**:—तुझ्या माणसानं अगोदर माझा अपमान केला.

**गुनार**:—योग्य मार्गानं हा तंटा मिटवण्याची माझी तयारी आहे. असं मी तुला कालच सांगितलं आहे.

**कर्ण०**:—पण तक्षशिलेची कुठं त्याला सम्मती आहे ! आज सकाळीं तूं घरीं नसतां ती माझ्यावर चाल करून आली. मला ठार मारण्याचा तिचा उघडउघड उद्देश दिसतो.

**गुनार**:—( संतापानें ) खरं सांगतोस तूं हें ? तिनं खरोखरच तुझ्यावर हल्ला केला ?

**कर्ण०**:—मी एक अवाक्षरसुद्धां खोटं बोललों असेन तर शपथ !

**अरुण०**:—तेवढ्याकरतांच त्यानं माझी मदत मागितली—आणि—आणि त्याला ती मिळाल्याशिवाय स्वास रहाणार नाहीं.

**गुनार**:—( विचारपूर्वक ) अरुणदेव, आपण माझ्याशीं आज प्रेमळपणानं आणि सन्मानानं वागलांत, केवळ त्यामुळं आपलं मन मी मोडूं इच्छीत नाहीं. ऐक कर्ण, तूं माझा मनुष्य मारलास,—माझ्या माणसांनीं तुझीं गुरं उधळून लावलीं—फिटंफाट झाली. तुमचं आमचं देणंघेणं कांहीं राहिलं नाहीं ! आहे कबूल ?

**कर्ण०**:—कबूल—कबूल ! हें घ्या वचन.

**अरुण०**:—मग आतां याच्या जिवाला तूं किंवा तुझी माणसं यांच्याकडून कांहीं एक अपाय होणार नाहीं तर ?

**गुनार**:—अर्थात् नाहीं—स्वतः मी किंवा माझी माणसं यांच्या हातून प्रत्यक्ष माझ्या घरीं किंवा अन्यत्र याच्या जिवाला धोंका पोंचणार नाहीं.

**सागर**:—( टेकडीकडे बोट दाखवून ) तें पहा कोणी येत आहे.

**गुनारः**—( तिचें अचानक येणें त्याला न आवडून ) ही तर तक्षशिला दिसते !

**अरुण०ः**—बरोबर सैन्यही दिसतं आहे.

**कर्ण०ः**—ती मला हुडकते आहे !

[ तक्षशिला वर सांगितल्याप्रमाणें प्रवेश करते. तिच्या अंगावर वीराला साजेल असा पोशाख असून हातांत भाला आहे. तिच्या माणसांच्या हातांत तरवारी किंवा परशू आहेत. ]

**तक्ष०ः**—( एकदम थांबून ) इथं तर सैन्याची जुळवाजुळव झालेली दिसते !

**सरिताः**—( पुढें होऊन ) ये बाई तक्षशिले, किती दिवसांनीं भेटलीस !

**तक्ष०ः**—( तिच्याकडे अर्धवट दुर्लक्ष करून ) आपण आलां आहांत हें मला कळलं होतं ! ( ती प्रत्येकाकडे दृष्टिनिक्षेप करीत पुढें जाते. ) गुनार–आणखी कर्ण !—माझा शत्रू–अरुणदेव आणि त्यांची मुलं—( तिची दृष्टी सागरवर पडते, ती एक क्षणभर चमकते—एक पळभर भांबावून स्तब्ध उभी राहते पण लगेच सांवरून ) आणखी पुष्कळच ओळखीचे चेहरे दिसताहेत—पण मला हें कळत नाहीं कीं यांपैकीं मित्र कोण आणखी शत्रू कोण !

**अरुण०ः**—कां बरं ! आम्ही सर्वच तुझे मित्र आहोंत !

**तक्ष०ः**—तें जर खरं असेल तर अगोदर ( कर्णाकडे बोट दाखवून ) त्याला गुनारांच्या हवालीं करा पाहूं.

**अरुण०ः**—तसं आतां करण्याची मुळींच जरूरी राहिली नाहीं.

**गुनारः**—तक्षशिले, आपला तंटा मिटला ! तडजोड झाली !

**तक्ष०ः**—तडजोड ? अस्सं ! आपण फार दूरदर्शी आहांत ! कर्णाला या लोकांची मदत मिळाली–तेव्हां साहजिकच त्याच्या वाटेला न जाण्यांतच शहाणपणा आहे असं तुम्हांला—

**गुनारः**—हें पहा असे टोमणे मारण्यांत आतां कांहीं हांशील राहिलं नाहीं. ( तीव्रतेनें ) कर्णाचा आमचा तह झाला तोच वज्रप्राय !

**तक्ष०ः**—( मन आवरून ) ठीक आहे ! आपण जर त्याला शांततेचं वचनच दिलं असेल तर तें पाळायलाच हवं !

नगर वाचनालय, सातारा



संगणकीकृत

**गुनार:**—( शांततेनें पण निश्चयाच्या स्वरांत ) होय, मला तें पाळलंच पाहिजे !

**अरुण०:**—( तक्षशिलेला ) आणखी तूं येण्याच्या अगोदर दुसरा एक तंटा अर्धवट तुटत आला होता.

**तक्ष०:**—( तिखटपणानें ) हं ! तुमचा आणि गुनार मधला !

**अरुण०:**—( मान हलवून ) तुझ्यासंबंधीचा.

**तक्ष०:**—त्याच्याशीं कोणाचा संबंध येतो तें मला ठाऊक आहे. पण बाबा, मी तुम्हांला एकदांच बजावून ठेवत्यें कीं हत्यारबंद माणसांना भिऊन गुनार तंटा तोडायला तयार झाले असं म्हणायला मी लोकांना निमित्त मिळूं देणार नाहीं. तुम्ही जर एकटे प्रवासी म्हणून आलां असतात, आमचा पाहुणचार घेतला असतात तर तुमच्या आमच्या मधला हा लढा सहज मिटूं शकला असता !

**गुनार:**—पण तक्षशिले, अरुणदेव आणखी त्यांचीं मुलं केवळ मित्रभावानं आलीं आहेत.

**तक्ष०:**—आलीं असतील कदाचित् ! पण लोकांना निराळाच प्रकार वाटेल. शिवाय गुनार, काल तुमचा सुद्धां यांच्या शांत भावनांवर विश्वास नव्हता आणखी म्हणूनच अरुणदेवांचीं गलबतं तुमच्या किनाऱ्याला लागलीं हें कळल्याबरोबर घाबरून जाऊन घाईघाईनं कमलाक्षाला दक्षिणेकडे पाठवून दिलात !

**सागर:**—( गुनारला ) तूं आपल्या मुलाला दक्षिणेकडे पाठवून दिलास ?

**तक्ष०:**—होय ! न जाणों अरुणदेव अंगावर तुटून पडला तर काय करता !

**अरुण०:**—तक्षशिले ! हा थट्टेचा विषय नव्हे बरं ! तूं जर हा तंटा मिटविण्याच्या आड आलीस तर गुनारनं मुलाला दक्षिणेकडे पाठवण्यांत दूरदर्शीपणाच दाखवला असं सिद्ध होईल !

**तक्ष०:**—हे नशिबाचे लागेबांधे आहेत बाबा ! जें होणार तें थोडंच चुकतं आहे ! पण माझ्याविषयीं म्हणाल तर नामर्दपणाच्या उपायांनीं तंटे तोडीत बसण्यापेक्षां मी मृत्यूला आनंदानं कवटाळीन !

**सरिता:**—अग, पण सागर सुद्धां योग्य तो दंड द्यावयास तयार झाले आहेत. मला नाहीं वाटत तेवढ्यावरूनच कोणी त्यांची किंमत कमी लेखील म्हणून !

**तक्ष०:**—शक्तिसागरांच्या मानापमानाच्या कल्पना त्यांच्या त्यांच्याजवळ. त्याची उठाठेव मला कशाला !

**सागर:**—त्या मला दुसऱ्यांनीं शिकवायला नको आहेत.

**तक्ष०:**—प्रसिद्ध योद्धा म्हणून शक्तिसागरांची त्रिखंड ख्याती आहे. पण माझ्या दरवाजांतला पांढरा आस्वल मारून गुनारांनीं आपली कीर्ती दिगंत गाजविली !

**गुनार:**—( सागरकडे पाहून भीत भीत ) हो ! हो ! पण पुरे–पुरे ! आतां त्या जुन्या गोष्टी किती वेळ उकरून काढायच्या !

**अरुण०:**—हिमद्वीपांतल्या कोणत्याही वीरापेक्षां त्या रात्रीं गुनारनं जास्त पराक्रम गाजवला यांत शंकाच नाहीं, म्हणूनच...

**सागर:**—गुनारनं जरी दंड देऊन हा तंटा मिटवला तरी त्याची कोणीच छीः थूः करणार नाहीं.

**तक्ष०:**—गुनारनीं जर दंड देऊन अरुणदेवाच्या अपमानाची भरपाई करणं अवश्य असेल तर त्यांना सुद्धां दुसऱ्या एका गोष्टीबद्दल अरुणदेवांजवळून भरपाईदाखल दंड मागण्याचा अधिकार पोंचतो. गुनार, तुम्हीं मला मागं एकदां एक वचन दिलं होतं त्याची तुम्हाला आठवण आहे का ?

**गुनार:**—केवळ अविचारानं त्यावेळीं मी तुला तसं वचन देऊन चुकलों आहे खरा ! पण तूं मला तें अगदीं निकरानं पाळायलाच लावणार का ?

**तक्ष०:**—आपणां दोघांना यापुढं जर एका घरांत नांदायचं असेल तर तुम्हांला तें पाळलंच पाहिजे ! अरुणदेव ! तुमच्या मानलेल्या मुलीला पळवून नेल्याबद्दल गुनारांच्या जवळून जर तुम्हांला नुकसान भरपाई हवी असेल तर माझ्या बाबांचा खून करून त्यांचं सर्वस्व हिरावून घेतल्याबद्दल आपण सुद्धां मला–त्यांच्या औरसकन्येला—नुकसानभरपाईबद्दल योग्य तो दंड दिलाच पाहिजे.

**अरुण०:**—भीमदेव धर्मयुद्धांत पडला त्याबद्दल दंड द्यावयास मी बांधला गेलों नाहीं. तुझ्या नातलगांनीं मात्र अन्यायानं तूं कोण आहेस हें मला न कळवतां तुला माझ्याकडे पाठवून दिली आणि मी सुद्धां नीट चौकशी न करतां तुला दत्तक घेतली.

नगर वाचनालय, सातारा.

**तक्ष०:**—मग त्यांत तक्रार करण्यासारखं असं काय आहे अरुणदेव! पराक्रमी भीमदेवाच्या औरस कन्येचा–मानलेला कां होईना–पिता म्हणून मिरवणं हा तर उलट तुमचा सन्मानच झाला.

**अरुण०:**—सन्मान झाला कीं काय झालं तें मला ठाऊक नाहीं, पण तुझ्यामुळं मला ताप मात्र फार झाला.

**तक्ष०:**—तेवढ्यानंच काय झालं आहे अरुणदेव! खरा ताप तर अजून पुढंच आहे.

**अरुण०:**—मी इथं बायकाशीं झगडण्याकरतां आलों नाहीं. गुनार! तुला मी शेवटचं विचारतों–तूं हिला पळवून नेल्याबद्दल दंड द्यायला तयार आहेस कीं नाहीस? बोल!

**गुनार:**—आपणांला आतांच कळलं आहे कीं मी वचनानं बांधला गेलेलों आहें.

**अरुण०:**—(संतापून) बस् बस्, धर्मयुद्धांत केलेल्या कायदेशीर कत्तलीबद्दल मी कधींच दंड देणार नाहीं.

**तक्ष०:**—ठीक आहे तर! आम्हींही दंड द्यायला तयार नाहीं! तुम्हाला काय करायचं असेल तें खुशाल करून घ्या!

**अरुण०:**—(संतापानें) शिवाय मी असं विचारतों कीं, भीमदेवाच्या मरणाबद्दल जाब मागण्याचा कोणाला अधिकार आहे? त्याचे सर्व नातलग मारले गेले आहेत—बोल त्याचा कायदेशीर वारस कोण आहे?

**तक्ष०:**—कां बरं! गुनार आहेत—माझ्या वतीनं.

**अरुण०:**—गुनार! (हंसतों) हें पहा, तुझा याच्याशीं माझ्या संमतीनं विवाह झाला असता—किंवा त्यानं तुला पळवून नेल्याबद्दल योग्य तो दंड देऊन आपल्या पापाची निष्कृति करून घेतली असती—तर त्याला निःसंशय अधिकार पोंचला असता—पण—पण—

**सरिता:**—बाबा! बाबा!

**सागर:**—(घाईनें पुढें होऊन) अरुणदेव पुढचं बोलूं नका—पुढचं बोलूं नका!

**अरुण०:**—मी बोलणार—अगदीं मोठ्यानं ओरडून बोलणार—पळवून नेलेल्या स्त्रीला कायदेशीर नवरा नाहीं !

**गुनारः**—अरुणदेव !

**तक्ष०:**—अपमान आणखी बेअब्रू ! बेअब्रू आणखी अपमान—आतां मात्र कडेलोट झाला ! ( अरुणदेवास ) तूं—तूं—तुला याचं लवकरच प्रायश्चित्त मिळेल !

**अरुण०:**—( कठोरतेनें ) पळवून नेलेली स्त्री म्हणजे कायद्यानं फक्त रखेली मानली जाते. तुला जर जास्त उजळ नांव हवं असेल तर—

**तक्ष०:**—अरुणदेव—मला काय हवं आणखी काय नको—हें तुम्ही सांगायला नको ! गुनारची रखेली ! ठीक आहे ! ( गुनारकडे वळून ) गुनार, पुरुषाच्या अंगीं दिगंत पराक्रम गाजवण्याची हिंमत असेल तर त्याची रखेली राणीपदावर विराजमान होते ! तुम्हाला जर माझ्या नांवाला लागलेली काळोखी धुवून काढायची असेल तर असला कृतांत पराक्रम गाजवावा लागेल ! अरुणदेव, आतां आजपासून आपले मार्ग अगदीं भिन्न झाले. तुम्हाला एका क्षणाची सुद्धां फुरसत न देतां आमच्या तरवारी तुमच्या शिरस्त्राणांशीं झुंज घ्यायला सज्ज होतील. रक्ताचा एक थेंब तुमच्या शरिरांत शिल्लक असेपर्यंत आतां निर्धास्त झोंप घेऊं नका—त्याचप्रमाणं तुम्हाला जे जे कोणी मदत करायला तयार होतील, ( एकदम कर्णाकडे वळून ) कर्ण ! अरुणदेवांनीं तुला पाठीशीं घातला म्हणून तुझा आमचा तह झाला; पण निर्धास्तपणं घरीं जाऊन झोंपा काढीत बसूं नकोस असा तुला माझा इशारा आहे. आम्ही जरी वचनानं बांधलीं गेलों असलों तरी तूं मारलेल्या दासाला इतर नातलग आहेत ते त्याचा सूड—ठीक आहे, तुला योग्य ती सूचना दिली आहे, यापुढं तुझं नशीब तुझ्याबरोबर ! चला गुनार, आपल्याला आतां पुढल्या तयारीला लागलं पाहिजे. आपण मागं एकदां एक विलक्षण पराक्रम करून दाखवला आहेच पण आतां आपल्या—आपल्या रखेलीची अब्रू...

**गुनारः**—जरा मन आवर—स्वत:संबंधीं असले किळसवाणे शब्द उच्चारूं नकोस......

**सरिताः**—तक्षशिले-थांब-थांब, मी बाबांचं मन वळविण्याचा प्रयत्न करत्यें.

**तक्ष०:**—( तिची पर्वा न करता ) चला. घरीं चला ! बदफैली, छिनाल, रखेली या नांवाचा शिक्का माझ्या कपाळीं लागेल असा कधीं मला संशय तरी आला होता का ? पण ही असली बेअब्रू आणखी एक दिवस सुद्धां जर माझ्या वाट्याला येणार असेल तर ती धुऊन काढण्याकरतां, गुनार, तुम्हाला आजपर्यंत जगांत कुणीच गाजवला नाहीं असा दिगंत पराक्रम गाजवावा लागेल ( जाते ).

**गुनार:**—( दुःखानें ) भाई शक्ति, तुझ्यापासून मला एकच वचन हवं आहे. तूं हा किनारा सोडून जायच्या अगोदर एक वेळ मला तुझ्याशीं एकांतांत कांहीं बोलायचं आहे. ( उत्तराची वाट न पहातां निघून जातो. )

**अरुण०:**—( संतापानें ) तक्षशिले, आपल्या आजच्या कृत्याचीं फळं भोगावयास आतां आपल्या मनाची तयारी कर !

**सरिता:**—बाबा ! बाबा खरोखरच का तुमच्या मनांत त्यांचा सूड घ्यायचा आहे !

**अरुण०:**—चूप रहा !—सागर, आतां नुसता दंड भरण्यानं आमच्या-मधील तंटा मिटेलसं वाटत नाही.

**सागर:**—काय करण्याचा तुमचा इरादा आहे अरुणदेव ?

**अरुण०:**—तें मी अजून नक्कीं ठरवलं नाहीं, पण एवढं मात्र सांगून ठेवतों कीं गुनारच्या किनाऱ्याला लागलेली ही आमची धूळभेट फार दिवसपर्यंत लोकांच्या स्मरणांतून जाणार नाहीं !

**सागर:**—तसं होईल कदाचित्. पण मीहि आपणांला बजावून ठेवतों कीं मी जिवंत असे तोंपर्यंत आपणांला गुनारविरुद्ध कधींहि शस्त्र उपसूं देणार नाहीं.

**अरुण०:**—( उसळून ) ठीक आहे, तूं जरी माझ्या शत्रूला जाऊन मिळालास तरी मी माघार घेणार नाहीं. तुम्हा सर्वांना तोंड द्यायला आतां माझ्या मनाची तयारी आहे.

**सागर:**—अरुणदेव जिवांत जीव असेपर्यंत समरांगणांत आतां तुमची आणि माझी शत्रुत्वाच्या नात्यानं गांठ पडणं शक्य नाहीं. आपल्यामध्यें अत्यंत पवित्र असा नुकताच तह झाला आहे. विजयश्री आणि संपत्ती यांच्यापेक्षां सरिता मला जास्त प्रिय वाटते, आपण तिचे जन्मदाते पिते आहांत ही गोष्ट मी कालत्रयींहि विसरणार नाहीं.

**अरुण०:**—तुझ्या उदार अंतःकरणापासून मी तरी एवढ्याचीच अपेक्षा करीत आलों आहें.

**सागरः**—पण गुनार माझा मानलेला भाऊ आहे. अखंड मैत्रीची आम्ही शपथ घेतलेली आहे. समरांगणावर आणि शांततेच्या वेळीं आम्ही निरंतर एकमेकांच्या सुखदुःखाचे वांटेकरी झालों आहोंत. फार काय सांगू! जगांतल्या इतर कोणत्याहि मनुष्यापेक्षां गुनारवर माझं जास्त प्रेम आहे. गुनार शूर आहे पण लढाईला हपापलेला नाहीं. आणखी माझ्याविषयीं म्हणाल तर समरांगणाची भीति आजपर्यंत या हृदयाला कधींहि शिवली नाहीं हें तुम्हा सर्वांनाच माहीत आहे. पण अरुणदेव, या सर्व गोष्टी बाजूला ठेवून मी आपल्यापाशीं याचना करतों कीं काय वाटेल तें करून आपण गुनारशीं तडजोड करा! या एवढ्या बाबतींत सर्व गोष्टी माझ्या तंत्रानं चालूं द्या.

**अरुण०:**—मला तसं करतां येणार नाहीं, कारण मी आलों तसाच जर हात हालवीत परत गेलों तर माझे सर्व सरदार माझी नुसती राळ उडवतील.

**सागरः**—आपणांला रिक्त हस्तांनीं परत जायला नको, अमर्याद लुटीनं भरलेलीं माझी दोन जहाजं तीं तिकडे पलीकडे समुद्राच्या लाटांवर हेलकावे खात पडलीं आहेत. मोठमोठ्या राजराजेश्वरांनीं दिलेल्या अमूल्य देणग्या, शस्त्रास्त्रांनीं भरलेल्या असंख्य पेट्या व इतर मौल्यवान् वस्तु यांची त्यांत नुसती रेलचेल उडाली आहे. त्यापैकीं हवं तें गलबत आपण घेऊन चला आणि अशा तऱ्हेनं तक्षशिलेला पळवून नेल्याबद्दलच्या दंडाची भरपाई करून घ्या.

**अरुण०:**—सागर, आपल्या औदार्यानं तूं मला थक्क करून सोडीत आहेस. गुनारकरतां तूं एवढा स्वार्थत्याग करणार!

**सागरः**—विश्वासू मित्राकरतां, जिवाच्या जिवलगाकरतां, जें जें करावं तें तें थोडंच आहे.

**अरुण०:**—आपली अर्धी **संपत्ती** तूं देऊन टाकणार?

**सागरः**—( विनवीत ) माझं सर्वस्व घ्या. दोन्ही जहाजं त्यांतील सर्व मौल्यवान् वस्तूंसह घेऊन जा. फार काय मला सुद्धां एक गरीब सैनिक म्हणून आपली सेवा करण्याकरतां आपल्याबरोबर हिमद्वीपाला घेऊन चला. संपत्तीची

नगर (वाचनालय) सातारा

किंमत तीं काय—आज गेली तर उद्यां कमवितां येईल, पण अरुणदेव, तुम्ही जर गुनारविरुद्ध शस्त्र उचललंत तर मात्र मी फिरून कधींच सुखी होणार नाहीं.

**अरुण०:**—( विचारपूर्वक ) दोन लढाऊ जहाजं, उत्कृष्ट शस्त्रास्त्रं आणखी इतर मौल्यवान् वस्तु—असल्या चिजा किती मिळाल्या तरी थोड्याच (संतापानें) पण तक्षशिलेनं जातांना मला धाक घातला आहे—दम दिला आहे! नाहीं—तुझ्या देणग्या घेऊन मी आपल्या स्वाभिमानाची राखरांगोळी करायला तयार नाहीं !

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

**सागर:**—माझं ऐकून तर घ्या—

**अरुण०**—छे! छे! मी आतां एक शब्द सुद्धा ऐकून घेणार नाहीं. मी आपल्या अब्रूकरतां एकटा लढेन, मग जें काय व्हायचं असेल तें होईल.

**कर्ण०:**—( जवळ येऊन ) शक्तिसागर शांततेचा उपाय सुचवीत आहेत त्याला जर आपली तयारी नसेल आणि सूड घ्यायचा आपला निश्चय कायम असेल तर त्याला दुसराहि एक उत्तम मार्ग आहे. तक्षशिला जिवंत असेपर्यंत दंड देऊन तंटा मिटवण्याची गुनारची छाती नाही! ती आशा आपण करूं नका. पण आपण माझ्या म्हणण्याप्रमाणं वागायला तयार असाल तर मात्र आपणाला सूड उगवतां येईल.

**अरुण०:**—ठीक आहे बोल—तुला काय सांगायचं असेल तें सांग.

**सागर:**—खात्रीनं हा कांहींतरी नीच उपाय सुचवणार !

**सरिता:**—बाबा, त्याचं ऐकूं नका !

**कर्ण०:**—तक्षशिलेनं मला उडाणटप्पू ठरवला आहे, आणखी लबाडीनं माझा जीव घेण्याचा तिचा निश्चय आहे. आपण फक्त माझं मागाहून रक्षण करण्याचं वचन देत असाल तर आज रात्रीं हळूच जाऊन तीं दोघं आंत असतांना मी त्यांच्या घराला आग लावून देतों. बोला. आहे कबूल ?

**अरुण०:**—कबूल ? मी सांगू का मला काय कबूल आहे तें! बेवकुब ! एक शब्द जर जास्त बोललास तर इथल्याइथं तुझं नाक आणि कान कापून टाकीन ! बदमाष ! हा अरुणदेव म्हणजे काय चोरांचा राजा समजलास होय !

पृ ८९
११२५४
जा ६०

वर्तक श्री. वि.

**कर्ण०:**—ठीक आहे; तुम्ही जर अशा तऱ्हेनं गुनारवर चढाई केली नाहीं तर तो तुमच्यावर करील !

**अरुण०:**—ती निवारायला माझ्या मनगटांत पुरेसा जोर आहे समजलास.

**सागर:**—ए ! आणखी तूं आतां येथून एकदम चालता हो पाहूं. तुझ्याशीं जास्त वेळ बोलणं म्हणजे......

**कर्ण०:**—ठीक आहे. जशी आपली इच्छा. आतां मला वाटेल त्या उपायानं आत्मसंरक्षण केलंच पाहिजे. पण एवढं मात्र तुम्हांला बजावून ठेवतों कीं, आपण जर सौम्य उपाय वापरलेत तर आपणांला पश्चात्ताप झाल्याशिवाय कधींच राहणार नाही ! मी तक्षशिलेला पुरती ओळखतों, तिला गारद करायला मलाहि कांहीं तरी उपाय सुचेलच ( जातो ).

**सरिता:**—याच्या मनांत कांहीं तरी पाप दिसतंय्. ( सागरास ) आपण त्याला कसंहि करून अडवलाच पाहिजे.

**अरुण०:**—( संतापानें ) जाऊं दे. वाटेल तें करूं दे. तिला तसंच पाहिजे.

**सरिता:**—असं बोलूं नका बाबा, ती तुमची मानलेली मुलगी आहे हें विसरूं नका.

**अरुण०:**—तिनं माझ्या दारांत पाऊल टाकल्यापासूनच माझ्या सर्व नाशाला सुरवात झाली. तिच्या बापाचं भविष्य खरं ठरणार असा रंग दिसतो.

**सागर:**—कोणाचं ? भीमदेवाचं भविष्य ?

**अरुण०:**—होय भीमदेवाचं—तिच्या बापाचं. माझा शेवटचा फटका लागून, जखमी होऊन रणांगणावर पडल्यावर त्यानं भेदक नजरेनं माझ्याकडे पाहिलं व आपलं भयंकर भविष्य वर्तवलं. तो म्हणाला, "माझं बीज जोंपर्यंत जगांत शिल्लक आहे तोंपर्यंत माझ्या मरणाबद्दल सूड उगवला गेल्याशिवाय राहणार नाहीं. ज्यानं माझा खजिना लुटला त्याला सुखाची झोंप कधींच येणार नाही." एवढं बोलून तो कांहीं वेळ शांत पडून राहिला—नंतर थोडसं हंसला आणि मग मेला.

**सागर:**—असल्या गोष्टींची आपण मुळींच पर्वा करूं नये.

**अरुण०:**—कुणी सांगावं! कुणी कुणी तर असं म्हणतात कीं भीमदेवानं आपल्या मुलांना लांडग्याचं काळीज खायला दिलं होतं. तक्षशिलेला तिचा वांटा खात्रीनं मिळाला हें तर उघडच दिसतं आहे. ( कोणी येतें आहे असें पाहून ) कोण ? गुनार ? आपली भेट ! आणि ती सुद्धां अशा शांत स्वरूपांत !

**गुनार:**—होय अरुणदेव—आपण पाहिजे तर मला नामर्द समजा—पण आपल्याशीं मी शत्रुत्वाच्या नात्यानं वागूं शकत नाहीं.

**अरुण०:**—मग तुझं म्हणणं काय आहे ?

**गुनार:**—आपण इथून जाण्यापूर्वी आपला हा तंटा तुटावा एवढीच माझी इच्छा आहे. आपण सर्वजण माझ्या घरीं या आणि हवे तितके दिवस माझा पाहुणचार घ्या. उत्तमोत्तम अन्नं आणि पेयं यांची तूट पडणार नाहीं. शिवाय इतक्या लांबच्या प्रवासानंतर आपणांस विश्रांतीहि पाहिजेच. आपल्यामधील हें चमत्कारिक भांडण कोणीहि उकरून काढणार नाहीं अशी मी हमी घेतों.

**सागर:**—पण तक्षशिला ?

**गुनार:**—ती माझ्या आज्ञेबरहुकूम वागेल. आम्ही घरीं गेल्यावर तिचंसुद्धां मन बदललं. तिलासुद्धां आतां माझ्यासारखंच वाटायला लागलं आहे कीं तुम्ही जर पाहुणे या नात्यानं आमच्या घरीं याल तर तडजोड करणं सोपं जाईल.

**सरिता:**—अहाहा ! तसं झालं तर आणखी काय पाहिजे !

**सागर:**—पण मला येतां येईल किंवा नाहीं तें सांगतां येत नाहीं.

**सरिता:**—असं काय बरं करावं ? गुनार आपले मानलेले भाई आहेत—त्यांचं प्रेमाचं आमंत्रण झिडकारणं आपल्याला शोभणार नाहीं.

**गुनार:**—( गहिंवरून ) घरीं, द्वारीं, स्मशानीं भाई तूं नेहेमीं माझ्या पाठीशीं असतोस अशी माझी बढाई आणि अशा या प्रसंगाच्या वेळीं—

**सरिता:**—इथून निघून जाऊन तक्षशिलेच्या मनांत तिरस्काराची ज्योत तेवती ठेवणार का ? छे ! छे ! आपणांला तें शोभायचं नाहीं.

**गुनार:**—मी अरुणदेवांचा मोठाच गुन्हा केला आहे. त्याची भरपाई केल्याशिवाय मला कधींच चैन पडणार नाहीं.

**सागरः**—मी तुझ्याकरतां दुसरं काय वाटेल तें करीन पण तुझा पाहुणचार घेण्याचा मात्र मला आग्रह करूं नकोस. शिवाय हिंवाळा संपायच्या अगोदर मला घरीं पोंचलंच पाहिजे; कारण......

**सरिताः**—पण एकदोन दिवसांनीं असा काय मोठा उशीर होणार आहे तो!

**गुनारः**—आपल्या नशिबीं काय आहे तें कोणालाच कळत नाहीं—भाई शक्ति, ही आपली शेवटचीही भेट असण्याचा संभव आहे; आणि तसं झालं तर माझी शेवटची याचना लाथाडून लावल्याबद्दल तुला निरंतर दुःख होत राहील.

**सरिताः**—आणि आपण आजच जर जाण्याचा बेत कायम केलात तर मला सुद्धां फार दुःख होईल.

**सागरः**—( निश्चयानें ) ठीक आहे. तुमच्या मनाप्रमाणं होऊं द्या. मला जरी—पण आतां जास्त बोलण्यांत हांशील नाहीं, गुनार मी तुमचं आमंत्रण स्वीकारायला तयार आहें.

**गुनारः**—( त्याला कडकडून आलिंगन देतो. ) भाई! भाई! मी तुझा कसा उतराई होऊं ( अरुणदेवास ) मग काय आपण-सुद्धां येणार ना ?

**अरुण०ः**—( त्रासिक स्वरानें ) मी त्याचा विचार करीन. तक्षशिलेनं आज माझा भयंकर अपमान केला आहे—आज मी कांहींच सांगूं शकत नाहीं.

**गुनारः**—आपण आल्याशिवाय खास राहणार नाहीं. आपल्या मनांतला राग कसा घालवायचा हें सागर आणि सरिता यांना चांगलं साधलं आहे. मी पुढं होऊन मेजवानीची तयारी करतों; आतां आपली भेट आमच्या वाड्यांत ( जातो ).

**सागरः**—( स्वगत ) गुनारला वाटतं तक्षशिलेचं मन बदललं! गुनार, वेड्या, तिच्या खऱ्या तेजाची तुला काय कल्पना आहे! मला वाटतं ती नवीनच कांहीं तरी जाळं विणायच्या—( एकदम विचार थांबवून आपल्या नौकरांस ) चला माझ्याबरोबर; आपणांला गुनार आणखी तक्षशिला यांच्याकरतां नजराणा तयार केला पाहिजे.

**सरिताः**—होय अतिशय मौल्यवान् वस्तूंची निवड करा बरं! नाहींतर गांठ आहे तक्षशिलेशीं! ( अरुणदेवास ) आणखी बाबा, तुम्हीं आपला राग आवरीपर्यंत मी तुम्हांला स्वस्थ बसूं नाहीं द्यायची ( सागरबरोबर निघून जाते ).

**अरुण०:**—राग आवरायचा ! होय, गुनारच्या घरांत बायकामाणसं नसतीं तर तें शक्य झालं असतं कदाचित्. तक्षशिलेवर हल्ला कसा चढवायचा—बायकांच्यावर हल्ला कसा चढवायचा हें जर मला कळलं असतं—( बलदेव घाईघाईनें प्रवेश करतो. ) कोण बलदेव ? तूं जहाजावरून इकडे कसा ?

**बलदेव:**—( हंसत ) हा असा ! तुमची आणि गुनारची गांठ पडली म्हणतात तें खरं आहे का ?

**अरुण०:**—होय.

**बल०:**—आणखी तुमचं आणि त्याचं भांडण झालं ?

**अरुण०:**—निदान तक्षशिलेशीं तरी झालं एवढं खास !

**बल०:**—मग ती गोष्ट इतकी मनाला लावून घेऊं नका. तुमचा सूड उगवला जाणार !

**अरुण०:**—सूड ! कोण घेणार माझ्याकरतां सूड ?

**बल०:**—मी जहाजावर उभा होतों इतक्यांत एक माणूस हातांत भाला घेऊन धांवत आला आणि म्हणाला "अरुणदेवाच्या जहाजावरील सैनिकांनों, आपल्या मालकाला जाऊन सांगा कीं, हा कर्णराज आज दोघांचाहि सूड घेणार !" इतकं बोलून घाईघाईनं तो आपल्या नौकेवर चढला आणखी पुन्हां म्हणाला "त्या तिकडं जंगलांत वीस बंडखोर माणसं लपून बसलीं आहेत ; त्यांना घेऊन मी दक्षिणेकड जाणार आणि सूर्यास्त होण्याच्या अगोदर तक्षशिलेच्या मुलाला यमसदनाला पाठविणार !"

**अरुण०:**—तो असं म्हणाला ! अस्सं ! आतां आलं माझ्या लक्षांत ! गुनारनं आपला मुलगा दक्षिणेकडे पाठवला आहे, कर्णराजाचं त्याचं शत्रुत्व आहे—

**बल०:**—आणखी म्हणून तो त्याच्या मागोमाग त्याला ठार मारण्याकरतां जात आहे.

**अरुण०:**—( एकदम निश्चय करून ) चला, एकदम चला. या भक्षाकरतां आतां माझी आणि कर्णराजाची लढाई होणार !

**बल०:**—काय करायचं आहे तुमच्या मनांत बाबा ?

१५-८-४५

**अरुण०:**—काय करायचं तें माझं मी पाहून घेईन. आज कर्णराजाच्या ऐवजीं मी सूड घेणार, हें मात्र खरं !

**बल०:**—मी येणार तुमच्याबरोबर !

**अरुण०:**—छेः ! छेः ! तूं, सागर आणि सरिता यांच्याबरोबर गुनारच्या घरीं मेजवानीला जा !

**बल०:**—सागरांच्या बरोबर ! ते इथं आहेत !

**अरुण०:**—तीं पहा त्यांची लढाऊ जहाजं. आपला त्यांचा तंटा मिटला. तुला त्यांच्याबरोबर जायला मुळींच हरकत नाहीं !

**बल०:**—तुमच्या शत्रूच्या घरीं ?

**अरुण०:**—फक्त मेजवानीपुरता जा. आतां माझी खरी योग्यता तक्षशिलेला कळेल. पण बलदेव, नीट ऐकून घे; माझ्या मनांत काय आहे तें कोणाला सांगूं नकोस—अगदीं कोण्णाला नाहीं—आलं ना ध्यानांत ?

**बल०:**—नाहीं सांगणार !

**अरुण०:**—(प्रेमभरानें त्याच्याकडे पाहून) जा आतां. मेजवानीच्या वेळीं अगदीं विनयानं वाग. माझ्या नांवाला काळोखी लागेल असं कांहीं करूं नकोस. विनाकारण कोणाशीं बोलूं नकोस. पण बोलायचा प्रसंगच आला तर तरवारीच्या धारेपेक्षां तिखट अशी भाषा बोल. तुझ्याशीं चांगले वागतील त्यांच्याशीं प्रेमानं वाग, पण तुझ्यावर जर कोणी घसरून पडायला लागेल तर स्वस्थ बसून ऐकून घेऊं नकोस. सोसेल तितकीच दारू पी आणखी कोणी जर योग्य प्रमाणांत मद्याचा आग्रह केला तर नाहीं म्हणूं नकोस—नाहींतर तुला बायल्या म्हणतील !

**बल०:**—त्याची नको तुम्हाला काळजी ?

**अरुण०:**—बरं तर जा आतां. मी सुद्धां मेजवानीला येणार आहें आणि तो सुद्धां अशा रीतीनं कीं कधीं कोणाला कल्पनासुद्धां नसेल. (आपल्या इतर मुलांस उद्देशून) चला, सिंहाच्या छाव्यांनो, आपलीं नखं पारजा ! तुम्हाला आज रक्त चाखायला मिळणार ! (मागच्या रस्त्यानें सर्व मुलांसह जातो. सागर व सरिता मेजवानीकरतां सुंदर मौल्यवान् पोषाख घालून

येतात. त्यांच्याबरोबर दोन माणसांच्या डोक्यावर एक नजराणा भरलेली पेटी आहे. )

**बल०:**—आतां हे सर्वजण लढाईला जाणार आणि मला इथं माशा मारीत बसावं लागणार. खरोखर हें धाकटेपण फारच वाईट—कोण ? ताई !

**सरिता:**—बलदेव ! अगबाई, काय वाढला आहेस !

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

**बल०:**—पांच वर्षांत मी काय वाढूंच नये...

**सरिता:**—अरे हो, हो ! नाहीं कोण म्हणतं ?

**सागर:**—( त्याला उद्देशून ) तुझ्या बापाला वृद्धपणीं मोठाच लढवय्या लाभणार !

**बल०:**—पण नेताहेत कुठं ते मला लढायला !

**सरिता:**—त्यांना तुझी फार काळजी वाटते म्हणून बरं ! तुझ्यावर त्यांचं फारच फाजील प्रेम आहे नाहींतरी !

**सागर:**—कुठं गेले आहेत तुझे बाबा ?

**बल०**—त्या तिकडे जहाजावर. चला आपण पुढं जाऊं. ते मागाहून येणार आहेत.

**सागर:**—मी आपल्या माणसांची वाट पहातों आहें. ते नांगर टाकून इतक्यांत येतीलच.

**बल०:**—मी जाणार त्यांना मदत करायला ( जातो ).

**सागर:**—( थोडा वेळ घुटमळून ) सरिते ! प्राणा, आतां आपण एकटीं आहोंत. फार दिवसांपासून हृदयांत गाडून टाकलेलं एक गुपित तुला सांगायचं आहे कारण, तें आतां दडवून ठेवणं अशक्य आहे.

**सरिता:**—( थक्क होऊन ) काय, म्हणतां आहां तरी काय आपण ?

**सागर:**—माझं गुनारच्या घरीं जाणं सर्व नाशाला कारण होणार !

**सरिता:**—नाशाला ! तुम्हाला काय वाटतं गुनार कांहीं दगाबिगा...

**सागर:**—( तिला मध्येंच थांबवून ) छे ! छे ! वेडे, गुनार दिलदार योद्धा आहे. पण—पण मी आपलीं जहाजं त्याचं आमंत्रण न स्वीकारतां घराकडे हांकरलीं असतीं तर फार बरं झालं असतं.

**सरिताः**—आपल्या बोलण्याची मला बाई भीति वाटते. सागर, असं कां बरं वाटायला लागलं आपल्याला एकाएकीं ?

**सागरः**—मला अगोदर असं सांग—मी माझं तुला एक रत्नखचित सुवर्णकंकण दिलं होतं—कुठं आहे तें ?

**सरिताः**—( त्याला दाखवून ) हें पहा माझ्या दंडांत. तुम्हीच मला तें घालायला सांगितलं होतं.

**सागरः**—आत्तांच्या आत्तां तें समुद्रांत फेंकून दे, इतकं खोल कीं तें पुन्हां कोणालाच सांपडूं नये. कारण तसं न केलं तर तें आपणां सर्वांच्या नाशाला कारणीभूत होईल !

**सरिताः**—हें कंकण ! !

**सागरः**—ज्या रात्रीं मी तुला तुझ्या बापाच्या घरून पळवून नेली; ती रात्र तुला आठवते का ?

**सरिताः**—मला आठवते का ? काय बाई तरी विचारणं हें !

**सागरः**—त्यासंबंधीं मला तुझ्याशीं बोलायचं आहे.

**सरिताः**—( अर्धवट भीत भीत ) काय विचारायचं आहे—विचारा.

**सागरः**—त्या रात्रीं मेजवानीचा बेत होता तें तुला आठवत असेलच ? तूं लवकरच आपल्या महालांत उठून गेलीस, आणि सर्व योध्यांनीं मद्य पिण्याला सुरवात केली तरी तक्षशिला अजून तिथंच बसली होती. मद्याचे पेलेच्या पेले फस्त होत होते. हळूहळू वीरांना स्फुरण चढूं लागलं, आणि एकेकानं प्रतिज्ञा करायला सुरवात केली. मी हिमद्वीपांतली एक सुंदर कुमारिका पळवण्याची प्रतिज्ञा केली—लागलीच गुनारनंही तसलीच प्रतिज्ञा केली आणि मद्याचा पेला तक्षशिलेच्या ओंठाजवळ नेला. तीहि लगेच उठून उभी राहिली व तिनंही प्रतिज्ञा केली कीं, जो वीर माझ्या महालाच्या दरवाजांत बांधलेला भयंकर आस्वल मारून आंत शिरेल व मला उचलून घेऊन जाईल त्याच्याशींच मी विवाह करीन.

**सरिताः**—मला तें ठाऊक आहे ! पुढं ?

**सागरः**—सर्वांना वाटलं कीं तक्षशिलेनं फारच कठीण अट घातली. कारण तो आस्वल अतिशय भयंकर होता. तक्षशिलेशिवाय तो कोणालाच जवळ येऊं देत नसे, आणखी शिवाय, त्याच्या अंगांत वीस जवानांची ताकत होती.

**सरिता:**—पण त्याला मारून गुनारनीं दिगंत कीर्ति मिळविली.

**सागर:**—त्यानं कीर्ति मिळविली—पण तो आस्वल मात्र मारला मीं!

**सरिता:**—( ओरडून ) तुम्ही ! !

**सागर:**—सर्व मंडळी उठून गेल्यावर गुनार हळूच माझ्याकडे आला आणि माझ्याशीं एकांतांत बोलण्याकरितां मला आपल्या निजायच्या खोलींत घेऊन गेला, आणखी म्हणाला, "जगांतल्या इतर कोणत्याही स्त्रीपेक्षां तक्षशिला मला जास्त आवडते. तिच्याशिवाय मला जिवंत राहणं शक्य नाहीं." मी म्हणालों, "जा तर मग तिच्या महालांत—तिनं केलेला पण तुला माहीत आहेच!" त्यावर तो म्हणाला, "मनुष्य प्रेमपाशांत सांपडला म्हणजे त्याला स्वतःच्या जिवाची किंमत वाजवीपेक्षां जास्त वाटायला लागते. जर मी त्या भयंकर आस्वलावर हल्ला केला तर—तर कदाचित् मलाच प्राणास मुकावं लागेल; म्हणजे मग जीव तर जाईलच पण त्याबरोबर तक्षशिला सुद्धां हातची जाईल" अशा तऱ्हेनं आम्ही बराच वेळ भवति न भवति करीत बसलों. शेवटीं गुनार आपलीं गलबतं सज्ज करण्याकरितां समुद्रावर निघून गेला, आणि मी गुनारचं चिलखत अंगावर घातलं, तरवार उपसली—आणखी—आणखी तिच्या महालांत शिरलों!

**सरिता:**—( अभिमानाच्या आनंदानें ) तर मग आपण त्या आस्वलाला मारलात!

**सागर:**—होय, तें तर उघडच आहे. आंत काळोख मी म्हणत होता! तक्षशिलेला वाटलं कीं मी म्हणजे गुनारच आहें! मद्यप्राशनामुळं तिच्या डोळ्यांवर धुंदी आली होती. तिनं आपल्या हातांतलं रत्नखचित कंकण ओरबाडून काढलं आणखी मला दिलं—तेंच तें कंकण तुझ्या हातांत आहे!

**सरिता:**—( मत्सरानें ) आणखी आपण सबंध रात्र तक्षशिलेच्या महालांत काढलीत?

**सागर:**—आमच्या दोघांमध्यें माझी उपसून ठेवलेली नंगी समशेर होती. ( थोडा वेळ स्तब्ध राहून ) अरुणोदय होण्यापूर्वीं मी तक्षशिलेला हळूंच उचलून गुनारच्या गलबतावर नेऊन पोंचवली. आमची लबाडी तिच्या लक्षांत आली नाहीं; गुनारनं तिला घेऊन गलबतं हांकारलीं; मग मी परत येऊन तुझ्या

महालांत शिरलों, तूं दासींच्या मध्यभागीं निजली होतीस. पुढं काय झालं तें तुला माहीत आहेच. मी प्रतिज्ञा केल्याप्रमाणं हिमद्वीपांतील एक सुंदर कुमारिका पळवली; आणखी त्या दिवसापासून जिकडे जिकडे मी जाईन तिकडे तिकडे तूं इमानानं माझ्याबरोबर येते आहेस.

**सरिताः**—वीरा, तुम्ही तें पराक्रमी कृत्य केलंत अं! पण मला तें कळायला पाहिजे होतं! तुमच्याशिवाय या जगांत एवढा पराक्रम दुसरा कोण गाजवणार! आपणाला तक्षशिलेसारखी अप्रतीम स्त्री हक्कानं मिळाली असून आपण माझी निवड केलीत. जगातील कोणत्याहि माणसापेक्षां माझं आपल्यावर निरतिशय प्रेम आहेच, पण प्राणा, आपल्या अतुल पराक्रमानं—

**सागरः**—( तिला अडवून ) सरिते, तुला जेवढं कळविण्याची आवश्यकता होती तेवढं सारं आतां मीं सांगून टाकलं आहे. केवळ त्या रत्नकंकणामुळं मला हा इशारा देणं भाग पडलं—काय वाटेल तें झालं तरी तक्षशिलेच्या तें दृष्टीस पडूं देऊं नकोस. आणखी माझं जर ऐकायचं असेल तर—तर तूं तें नेऊन समुद्रांत फेंकून दे कशी !

**सरिताः**—आतां तर उलट तें मला प्राणांहूनहि प्रिय झालं आहे. आपल्या अतुल पराक्रमाचं स्मृति-चिन्ह म्हणून मी तें निरंतर उराशीं बाळगणार! पण आपण काळजी करूं नका गडे! मी तें कोणालाच दिसूं देणार नाहीं.—आणखी आपलं गुपित ही फोडणार नाहीं. ( बेहोष वृत्तीनें ) शक्तिसागर! शक्तिसागर! केयूरवान् मकर कुंडलवान् किरीटी हारी हिरण्मय—

**सागरः**—( तिला आवरून ) सरिते—जिवा मन आवर—मन आवर. आपला या पुढचा मार्ग शांत, सुंदर पुष्पांच्या गलिचानं फुललेला असणार कीं त्यावरून रक्ताचे पूर वहाणार—हें सारं आतां तुझ्या वर्तनावर अवलंबून आहे. ( नोकरांस हांक मारून ) चला, चला गुनारच्या घरीं मेजवानीला चला. ( सरितेला घेऊन पुढें चालूं लागतो.—इतर लोक मागून जातात. )

**[ अंक पहिला समाप्त ]**

---

# अंक २ रा

[ गुनारच्या वाड्यांतील मेजवानीची जागा. आंत येण्याचा मुख्य रस्ता मागील बाजूला आहे. बाजूच्या भिंतींतून इतर येण्याजाण्याचे लहान लहान दरवाजे आहेत. पुढल्या बाजूला डावीकडे मुख्य मानाची जागा. अगदीं मागें वाढणाऱ्या दासींकरतां उभे राहण्याचे ओटे. इतर माणसांना दोन्ही मानांच्या जागामध्यें चवरंग. बाहेर अंधार पडत चालला आहे. उजवीकडून सरिता व डावीकडून तक्षशिला प्रवेश करतात. ]

**सरिताः**—तक्षशिले, मला तुझा बाई चमत्कार वाटतो. तूं मला आपला सगळा वाडा दाखविलास, मला तर त्यांत अगदीं कांहीं म्हणतां कांहीं कमीपणा दिसत नाहीं. जी जी वस्तु पहावी ती ती एकीपेक्षां एक सुंदर आणखी मौल्यवान्! इतकं असून तूं आपली दुःखी!

**तक्षशिलाः**—(श्वास टाकून) हं! गरूड पक्ष्याला पिंजऱ्यांत कोंडून ठेवला तर तो पिंजऱ्याचे गज चावणारच—मग ते लोखंडाचे असोत कीं सोन्याचे असोत!

**सरिताः**—निदान माझ्यापेक्षां एका बाबतींत तरी तूं जास्त वैभवशाली आहेस. तुला मुलगा आहे—तुझा कमलाक्ष?

**तक्षशिलाः**—असल्या अपमानास्पद स्थितींत मूल होण्यापेक्षां मी वांझोटी राह्यल्यें असत्यें तर फार बरं झालं असतं.

**सरिताः**—अपमानास्पद स्थितींत!

**तक्षशिलाः**—आपल्या बापाचे शब्द विसरलीस वाटतं? कमलाक्ष रखेलीचा मुलगा आहे—ही त्याची किंमत!

**सरिताः**—अग रागाच्या भरांत बाबा तसं बोलून गेले! या गोष्टी इतक्या का मनाला लावून घ्यायच्या!

**तक्ष०:**—अरुणदेवाचं म्हणणं खरं आहे. कमलाक्ष म्हणजे एक क्षुद्र जीव आहे. त्याच्या डोळ्यांत शौर्याचें तेज चमकत नाहीं !

**सरिता:**—तक्षशिले ! तुझ्याच्यानं असं बोलवतं तरी......

**तक्ष०:**—( तिच्याकडे दुर्लक्ष करून ) आईबापांच्या अंगांतला हिणकसपणा मुलांच्या रक्तांत सापाच्या विषाप्रमाणं भिनतो. स्वातंत्र्यप्रिय वीरांचीं मुलं पोलादी हड्डीचीं बनवलेलीं असतात. मला एका वीरस्त्रीची गोष्ट ठाऊक आहे. तिनं काय केलं विचाराच्या भरांत मुलाच्या अंगावरचा फाटलेला अंगरखा नीट करतां करतां चुकून त्याच्या अंगाला शिवून टाकला, पण त्या शूर बाळाच्या डोळ्याचं पातं सुद्धां लवलं नाहीं. ( भिंवया चढवून ) सरिते, मी कमलाक्षावर एकदां हा प्रयोग करून पहाणार आहे.

**सरिता:**—( अंगावर शहारे येऊन ) तक्षशिले ! तक्षशिले ! !

**तक्ष०:**—हा ! हा ! हा ! हा ! ! अग मी तें थट्टेनं बोलल्यें ( एकदम आवाज बदलून ) तुला खरं वाटो कीं न वाटो पण एकादे एकादे वेळेस मला अशा तऱ्हेच्या गोष्टी करण्याची अनिवार इच्छा होते हें मात्र खरं. असलं धाडस माझ्या रक्तांतच असलं पाहिजे, कारण असं सांगतात कीं यक्षांच्या कुळांत माझा जन्म झाला आहे—सरिते, ये अशी बैस. गेल्या पांच वर्षांत तूं कितीतरी प्रवास केला असशील. मोठमोठ्या राजराजेश्वरांच्या घरीं पाहुणचार घेतला असशील !

**सरिता:**—होय—विशेषत: श्वेतद्वीपच्या राजाच्या दरबारांत.

**तक्ष०:**—आणखी जिकडे तिकडे तुझा खूपच सन्मान झाला असेल. सगळीकडे तुला बसायला मानाचं पहिलं स्थान मिळालं असेल.

**सरिता:**—होय ! शक्तिसागरांची राणी म्हणून—

**तक्ष०:**—तें तर खरंच. शक्तिसागरांची लढवय्या म्हणून फार ख्याती आहे. या दुनियेंत फक्त गुनार त्यांच्या वरचढ आहेत.

**सरिता:**—काय गुनार !

**तक्ष०:**—गुनारनीं असा एक पराक्रम करून दाखवला आहे कीं शक्तिसागर तिथं हजर असूनसुद्धां त्यांची तो करून दाखवण्याची छाती झाली नाही—पण

नगर वाचनालय, सातारा

संगणकीकृत

जाऊं द्या तें ! मला असं सांग, सागर मुलुखगिरीवर असतांना— एकादे वेळेस लढाई सुरू होऊन तरवारींचा खणखणाट झडूं लागला आहे; जिकडे तिकडे प्रेतं पडताहेत—अशा वेळेला तुझ्या मनांत कधीं पुरुषांच्या मागोमाग युद्ध-गर्दींत शिरून पराक्रम करण्याची ईर्षा उत्पन्न झाली होती का ? अंगावर चिलखत घालून तूं कधीं हातांत नंगी समशेर घेतली होतीस का ?

**सरिताः**—छेः कधींच नाहीं. तक्षशिले, काय बाई तुझं एकेक बोलणं आणखी विचारणं !—मी बायकोमाणूस !

**तक्ष०ः**—बायको माणूस ! बायको माणूस ! बायको माणूस काय करूं शकेल आणखी काय नाहीं याचा कुणाला कधीं थांग लागला आहे का ? निदान एक गोष्ट तरी तूं मला खात्रीनं सांगू शकशील सरिते, कारण तिचा तुला पूर्ण अनुभव आला असलाच पाहिजे. अत्यंत उत्कट प्रेमानं पुरुष जेव्हां स्त्रीला आपल्या हृदयाशीं दाबून धरतो तेव्हां तिचं रक्त तापून तिच्या हृदयांतून प्रेमाच्या लहरींवर लहरी उसळायला लागून एका विलक्षण तऱ्हेच्या आनंदानं ती बेहोष होऊन जाते हें खरं आहे का ?

**सरिताः**—( लाजून ) तक्षशिले, काय बाई तुला......

**तक्ष०ः**—( निश्चयाच्या स्वरांत ) तूं मला सांगितलंच पाहिजेस !

**सरिताः**—पण तुला सुद्धां त्याचा अनुभव आलेला आहेच !

**तक्ष०ः**—फक्त एकवेळ—फक्त एकदांच ! त्या पहिल्या रात्रीं गुनार माझ्या-जवळ बसले, आणखी त्यांनीं इतक्या जोरानं मला आपल्या हृदयाशीं दाबून धरलं कीं त्यांच्या चिलखताचे लोखंडी बंद सुद्धां उखडून गेले—आणखी मग—आणखी मग......

**सरिताः**—( ओरडून ) काय शक्तिसागरांनीं......

**तक्ष०ः**—शक्तिसागरांनीं ? शक्तिसागरांनीं नाहीं ग, गुनारनीं ! मला पळवून नेली त्या रात्रीची गोष्ट !

**सरिताः**—( ताळ्यावर येऊन ) हो! हो ! खरंच—आतां मला आठवलं.

**तक्ष०ः**—त्या एकाच वेळेला—फिरून कद्धी नाहीं. आणखी मला तर वाटायला लागलं आहे कीं, त्या रात्रीं सुद्धां माझ्यावर कोणी तरी चेटुक केलं

असलं पाहिजे. कारण गुनार अशा तऱ्हेनं बायकोला आलिंगन देऊं शकतील हें मला मुळीं ( एकदम सरितेच्या तोंडाकडे नजर जाऊन ) सरिते, काय झालं, काय झालं तुला ?—अशी फिकी कां पडलीस एकदम ?

**सरिता:**—छेः छेः कांहीं नाहीं—मला काय झालं आहे !

**तक्ष०:**—( तिच्या भाषणाकडे दुर्लक्ष करून ) मी लढाईचा आनंद उपभोगण्याकरतां बाहेर पडायला पाहिजे होतं तरच माझं कल्याण झालं असतं—तरच आपणां सर्वांचं कल्याण झालं असतं. सरिते, मी अजून जिवंत आहें याचं तुला आश्चर्य नाहीं वाटत ? मी पुष्कळ दिवसांपूर्वीच मरून गेलें आहे, आणखी माझं भूत तुझ्याबरोबर वावरत आहे अशी तुला शंका नाहीं येत !

**सरिता:**—( भिऊन ) चल, आपण तिकडे मंडळींत जाऊं गडे !

**तक्ष०:**—( तिचा हात धरून ) नाहीं ग, थांब जरा ! या घरांत पांच रात्री काढल्यावर कुणीहि माणूस जिवंत कसं रहातं याचं तुला नवल नाहीं वाटत ?

**सरिता:**—पांच रात्री ?

**तक्ष०:**—होय आमच्याकडे या हिंवाळ्यांतल्या रात्री फारच भयाण असतात ( घाईनं अगदीं वेगळ्याच आवाजांत ) पण इथं कधींच विलक्षण दिव्य देखावे पहायला मिळत नाहींत असं मात्र समजूं नकोस. तुमच्या बाजूला जन्मांत कधीं दृष्टीला पडणार नाहींत असे देखावे तुला इथं दिसतील. तूं इथं आहेस तोंपर्यंत फिरून एकदां आपण बहिणीबहिणीसारख्या वागूं. भयंकर वादळ उठलं म्हणजे आपण समुद्रावर जात जाऊं. प्रचंड लाटा एकसारख्या किनाऱ्यावर आपटून आंतून पांढऱ्या आयाळीच्या घोड्यांसारखा फेंस उसळतो आहे, पलिकडे हत्तीपेक्षांहि मोठे देवमासे इतस्ततः भ्रमण करताहेत, पोलादी चिलखतं अंगावर घातलेल्या वीरांप्रमाणें एकमेकांवर चाल करून जाताहेत,—सरिते, कधीं कधीं तर मला असं वाटतं कीं जलदेवतेप्रमाणें देवमाशाच्या पाठीवर बसून समुद्रांत भ्रमण करावं, प्रचंड गलबतांशीं शर्यत लावावी, मोठं वादळ उठवावं आणखी रडतोंडीं, भिकारडीं माणसं बायका मिळवण्याकरतां जलपर्यटण करावयाला निघालीं म्हणजे त्यांना जलसमाधि द्यावी !

**सरिता:**—तक्षशिले, असं दुष्टासारखं तुझ्यानं बोलवतं तरी कसं ?

**तक्ष०:**—सरिते, तुला चेटूक करतां येतं काग ?

**सरिता:**—( अंगावर शहारे देत ) मला ! चेटूक !!

**तक्ष०:**—मला वाटतं तुला खास कांहीतरी जादूटोणा येत असलाच पाहिजे! तसं नसतं तर शक्तिसागरासारखा योद्धा तुझ्या तावडींत कसा सांपडला असता !

**सरिता:**—तुला असं बोलायला शरम नाहीं वाटत ? जाऊं दे मला—चल!

**तक्ष०:**—( तिला पकडून ठेवून ) अग थट्टा केली मीं ती ! पण सरिते तूंच विचार करून पहा ! लांब समुद्राच्या वक्ष:स्थलावर नौका इतस्तत: भ्रमण करताहेत, लाटांचा आवाज गगनाच्या प्रचंड घुमटांत घुमतो आहे, लढाईंत पडलेले योद्धे थाटानं विश्रांति घेण्याकरतां वरची वाट चढताहेत—ज्यांनीं तुझ्या आणखी माझ्यासारखं भिकारडं जिणं टाकून दिलं आहे अशा मानी स्त्रिया त्यांच्या मागोमाग जाताहेत, पलीकडे लांबून तुतारीचा उंच आवाज ऐकूं येतो आहे—त्या तालावर वीरांचे काळेभोर घोडे भरधांव स्वर्गाची वाट चढताहेत—अशा वेळेला इथं एकाद्या प्रेतासारखं पडून राह्यचं ! सरिते तुला नाहीं वाटत कीं काळ्या घोड्यावर बसून भरधांव स्वर्गाची वाट चढण्यांत कांहीं तरी विलक्षण मौज आहे म्हणून ? ( तिला कडकडून मिठी मारते. )

**सरिता:**—( जबरीनें तिचा हात झिडकारून ) तक्षशिले ! तक्षशिले ! तूं भानवर आहेस का ? सोड, सोड मला !

**तक्ष०:**—काय भागूबाई आहेस ग ! किती लवकर भेदरतेस !

[ मागच्या मोठ्या दरवाजांतून शक्तिसागर व बलदेव यांच्यासह गुनार प्रवेश करतो. ]

**गुनार:**—आतां माझ्या सर्व इच्छा तृप्त झाल्या ! माझा शूर आणखी दिलदार भाई मला पुन्हां भेटला, माझ्या घरीं पाहुणचाराकरतां अरुणदेवांचा मुलगा आला, आणखी स्वत: अरुणदेवसुद्धां लवकरच येणार—होय ना ?

**बलदेव:**—त्यांनीं यायचं कबूल केलं आहे !

**गुनार:**—फक्त कमलाक्ष घरीं असायला पाहिजे होता.

सातारा

**बल०:**—तुमचा आपल्या मुलावर फारच लोभ दिसतो. आपण मघांपासून त्याच्याशिवाय दुसरं कांहीं बोलतच नाही !

**गुनार:**—खरं आहे तें. तो आमचा एकुलता एक मुलगा आहे ! त्याचं हृदय इतकं हळुवार आहे कीं तो सर्वांनांच आवडतो.

**तक्ष०:**—पण त्याच्या अंगांत वीरवृत्ति मात्र मुळींच नाहीं !

**गुनार:**—चल ! तुझं हें बोलणं निराधार आहे.

**सागर:**—तर मग तूं त्याला दक्षिणेकडे काय म्हणून पाठवलास ?

**गुनार:**—मी त्याला पाठवला नसता तर बरं झालं असतं ! ( आवाज उतरवून ) पण आपल्या अत्यंत प्रिय माणसाच्या मोहामुळं मनुष्य कित्येक वेळां बायकी बनतो याचा मार्ग तुला एकदां माझ्यावरून अनुभव आलेला आहेच. ( पुन्हां आवाज चढवून ) हें पहा, इथं माझ्या मदतीला फारच थोडीं माणसं होतीं तेव्हां अरुणदेवांचीं लढाऊ जहाजं आमच्या किनाऱ्यावर येऊन धडकलीं हें कळल्याबरोबर आम्हां सर्वांना साहजिकच वाटलं कीं कमलाक्षाला इथं ठेवण्यांत खात्रीनं धोका आहे.

**तक्ष०:**—मृत्यूचा विचार करण्यापूर्वी अगोदर मनुष्यानं दुसऱ्या एका गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे असं आपलं मला वाटतं !

**बलदेव:**—कोणत्या गोष्टीचा ?

**तक्ष०:**—आपल्या अब्रूचा ! आपल्या कीर्तीचा ! !

**गुनार:**—तक्षशिले !

**सागर:**—मुलाला दक्षिणेकडे पाठवल्यामुळं गुनारची बेअब्रू झाली असं कोणीच म्हणणार नाहीं.

**गुनार:**—अरुणदेवांचे मित्र आणखी मी यांच्यामध्यें अशा तऱ्हेचं बीज पेरणं हें तुला शोभत नाहीं.

**तक्ष०:**—( हंसून ) अस्सं ! ( सागरकडे वळून ) शक्तिसागर, मला असं सांगा कीं, कितीही भयंकर वादळ उठलं तरी तुमचीं गलबतं न उलटतां समुद्रावर तरंगतात कीं नाहीं ?

**सागरः**—होय ! कर्णधार धूर्त असला तर !

**तक्ष०ः**—ठीक ! ठीक ! ! मी आतां उत्तम कर्णधाराचं काम करणार आणखी मला पोंचायचं आहे त्याच बंदराकडे आपल्या आयुष्याचं हें तारूं न भडकूं देतां हांकणार ( तेथून उठून पलीकडे निघून जाते. )

**सरिताः**—( अगदीं भिन्या स्वरांत हळूच ) सागर, आपण इथून निघून जाऊंया— आत्तांच्या आत्तां—मला इथं एक क्षणभर सुद्धां राह्यची भीति वाटते.

**सागरः**—ती वेळ आतां निघून गेली. मी तुला अगोदरच सांगितलं होतं पण तें तुला पटलं नाहीं. उलट तूंच मला आग्रह केलास !

**सरिताः**—त्या वेळीं माझा तक्षशिलेकडे ओढा होता पण आतां तिचं एकेक बोलणं आणखी एकेक वागणं पाहून भीतीनं माझी छाती दडपून गेली आहे !

[ सागरची माणसें व इतर पाहुणे मंडळी–पुरुष आणि स्त्रिया–वाढणारे दासदासी इ० मागच्या बाजूनें प्रवेश करतात. ]

**गुनारः**—चला मंडळी, आतां आपण सुरवात करूं या ! आजचे आमचे सर्वांत प्रतिष्ठित पाहुणे अरुणदेव जरा उशिरां येणार आहेत—माझ्या करतां थांबूं नका असा त्यांचा निरोप आहे.

[ गुनार प्रत्येक पाहुण्याला निरनिराळ्या मानाच्या जागांवर नेऊन बसवतो. ]

**तक्ष०ः**—( भोजनास सुरवात होतांच वाढणारांस ) चला, मद्याचे पेले रिकामे पडूं देऊं नका, म्हणजे सर्वांच्या जिभांचे लगाम ढिले होऊन मनावरचे निर्बंध गळून पडतील.

( वाढणारे लोक मद्याचे पेले भरतात. )

**तक्ष०ः**—आजच्यासारखे इतके पुष्कळ योद्धे एका ठिकाणीं जमण्याचे प्रसंग फारच थोडे येणार, तेव्हां माझी अशी इच्छा आहे कीं आपणांमधील जुनी चाल आज पुन्हा सुरू करावी. प्रत्येक वीरानं आपण केलेले पराक्रम सांगावे आणखी शेवटीं सर्वांनीं मिळून सगळ्यांत श्रेष्ठ कोण याचा निर्णय द्यावा.

**गुनारः**—मद्याचे पेले फस्त होत असतां ही चाल फारच घातुक ठरते असा जुना अनुभव आहे. असल्या प्रकारांतूनच नेहमीं भांडणाचा उगम होत असतो.

**तक्ष०ः**—आपण भ्याल असं मला वाटलं नव्हतं !

**सागरः**—तसं कोणालाच वाटत नाहीं. पण आपण इथें इतके जण जमलों आहोंत कीं प्रत्येकानं आपले पराक्रम सांगायचे म्हणजे फारच उशीर होऊन जाईल. त्याऐवजीं गुनार तूं आपल्या उत्तरेकडील प्रवासाची हकीगत सांग. आम्ही ती आनंदानं ऐकूं.

**तक्ष०ः**—गुनारांचा उत्तरेकडला प्रवास म्हणजे प्रवासच तो ! त्याची किंमत वीरांच्या सभेंत काडी इतकी सुद्धां नाहीं—चला शक्तिसागर, तुम्ही सुरवात करा—नाहीं तर मला असं वाटायला लागेल कीं माझ्या पतीच्या पराक्रमाचा तुम्हांला हेवा वाटतो. तुम्ही आजपर्यंत केलेलं अत्यंत अचाट कृत्य कोणचं असेल तें बोला !

**सागरः**—तूं मला सांगायला भागच पाडते आहेस. ठीक आहे ! तुझी मर्जी. ऐक तर. मागें एकदां मुलुखगिरीवर असतां आमचीं जहाजं नांगरून पडलीं होतीं. इतक्यांत आमच्या शत्रूंनीं आकस्मिक छापा घातला; पण आम्ही न डगमगतां त्यांच्या गलबतावरचीं एकूण एक माणसं कापून काढलीं आणखी मी तर एकटा आठ माणसांशीं लढलों !

**तक्ष०ः**—वा ! वा ! खरोखरीच अवर्णनीय पराक्रम ! पण शक्तिसागर, आपण पूर्ण हत्यारबंद होतांत ?

**सागरः**—होय, मी पूर्ण हत्यारबंद होतों. माझ्याजवळ भाला, परशू आणखी ढाल होती.

**तक्ष०ः**—तरी काय झालं—त्यामुळं आपल्या पराक्रमाची योग्यता कमी ठरत नाहीं—आतां गुनार तुमच्या आयुष्यांतलं सर्वांत पराक्रमी कृत्य कोणचं तें तुम्ही सांगा !

**गुनारः**—( नाखुषीनें ) एकदां समुद्रावर दोन चांच्यांनीं एक व्यापारी जहाज लुटायला सुरवात केली. ती गोष्ट माझ्या नजरेस पडतांच मी ताबडतोब त्यांच्यावर चाल करून गेलों व त्यांची कत्तल उडवली. त्या व्यापाऱ्यांपासून कांहीं एक खंडणी न घेतां त्यांची रवानगी केली. ही गोष्ट महाराजांच्या कानांवर जातांच त्यांनीं असे उद्गार काढले कीं, ‘ गुनारचं हें कृत्य खरोखरच वाखाणण्यासारखं आहे.’ इतकं बोलूनच ते थांबले नाहींत तर त्यांनीं मला अत्यंत गौरवून एक पत्र, उंची पोषाख व इतर देणग्या यांचा नजराणा पाठवला.

नगर वाचनालय, सातारा



संगणकीकृत

**तक्ष०ः**—काय गुनार, यापेक्षां जास्त पराक्रमी कृत्य आपण उभ्या आयुष्यांत केलं नाहीं !

**गुनारः**—मी दुसऱ्या कोणत्याच महत्कृत्याची बढाई मारणार नाहीं. हिमद्वीपाहून परत आल्यापासून मी शांततेंत घरीं बसून दिवस काढतों आहें व कधीं बाहेरच पडलों तर प्रवासी म्हणूनच बाहेर पडलों आहे; म्हणून सांगण्यासारखं असं दुसरं कांहींच माझ्या हातून घडलं नाहीं.

**तक्ष०ः**—ठीक आहे ! तुम्ही आपलं अत्यंत उज्ज्वल यश जर मुद्दाम लपवून ठेवायला लागलांत तर तुमच्या बायकोला आपलं तोंड उघडलं पाहिजे !

**गुनारः**—तक्षशिले चूप रहा—माझं एवढं सांगणं ऐक !

**तक्ष०ः**—पूर्ण हत्यारबंद असतां शक्तिसागरांनीं आठ माणसं लोळवलीं; पण गुनार मध्यरात्रीं माझ्या महालांत एकटे शिरले; आंत शिरण्याच्या अगोदर त्यांनीं माझ्या दारांत बांधलेला, वीस जवानांना भारी असा पांढरा अस्वल मारला. आणखी हें सारं करतांना त्यांच्याजवळ शस्त्र काय होतं म्हणाल तर एक बोटकी तरवार !

**गुनारः**—( दुःखपूर्ण स्वरानें ) वेडे पोरी—आतां तरी थांब.

**सरिताः**—( अगदीं हळूं आवाजांत ) सागर, तुम्ही हें सहन करणार का ?

**सागरः**—( सरितेस ) चूप !

**तक्ष०ः**—( पाहुण्यांना उद्देशून ) बोला तर आतां—मंडळी !—कोण जास्त शूर ? गुनार कीं सागर—सागर कीं गुनार ?

**गुनारः**—( मंडळींस ) खबरदार !

**तक्ष०ः**—( आवाज चढवून ) बोला ! बोला ! मला विचारण्याचा हक्क आहे.

**पाहुण्यांपैकीं एक वृद्ध वीरः**—खरं बोलायचं म्हणजे गुनारचा पराक्रम सर्वश्रेष्ठ आहे, आणि शक्तिसागरांची योग्यता त्यांच्या खालोखाल आहे.

**गुनारः**—( भीत भीत सागरकडे पाहून दुःखानें ) भाई शक्ति, या हृदयांत काय कालवाकालव चालली आहे हें जर तुला कळेल—

**सरिताः**—( हळूंच सागरास ) मैत्री झाली म्हणून काय झालं—

**सागरः**—चूप रहा तूं! (इतरांस उद्देशून मोठ्यानें) होय, गुनारची योग्यता सर्वांत अधीक आहे. फार काय त्यानं जरी तो भयंकर अस्वल मारला नसता तरी त्याची योग्यता माझ्या दृष्टीनं मुळींच कमी ठरली नसती; कारण तुम्हाला वाटते इतकी किंमत मला असल्या गोष्टींची वाटत नाहीं.

**तक्ष०ः**—शक्तिसागर, तुमच्या बोलण्यांत मत्सराची छटा दिसते.

**सागरः**—(स्मितहास्यपूर्वक) तुला नाही कळायचं तें. (गुनार) भाई, कोणीहि कितीहि तोडण्याचा प्रयत्न करो, आपल्या मैत्रींत खंड पडणं शक्य नाहीं.

**तक्ष०ः**—कोण तोडायला बसलं आहे तुमची मैत्री!

**सागरः**—असं म्हणू नको! माझी जवळ जवळ खात्री होत चालली आहे कीं केवळ तंटा माजवण्याकरतां तूं हा मेजवानीचा बेत घडवून आणला आहेस.

**तक्ष०ः**—शक्तिसागर तुमचं हें बोलणं फक्त तुम्हांलाच शोभण्यासारखं आहे! या ठिकाणीं मानाचा पहिला दर्जा मिळाला नाहीं म्हणून तुमच्या मनांत राग धुमसतो आहे! दुसरं काय!

**सागरः**—मी स्वतःपेक्षां गुनारच्या मानाची जास्त पर्वा करीत आलों आहें.

**तक्ष०ः**—ठीक! ठीक! गुनारांच्या खालोखाल मान मिळणं हा सुद्धां कमी सन्मान नाहीं! (बलदेवाकडे वांकड्या नजरेनें पहात) आणखी अरुणदेव जर इथं असते तर त्यांना तिसरी जागा मिळाली असती कदाचित्!

**बलदेवः**—मग तुझा बाप भीमदेव इथं असता तर त्याला आणखीनखालीं बसावं लागलं असतं, कारण सर्वांना ठाऊकच आहे कीं त्याला अरुणदेवांच्या समोर मान वांकवावी लागली.

**तक्ष०**—तुला असं बोलायला आधार काय, तर तुझ्या बापाच्या लांब लांब बाता! पण आपणां सर्वांना ठाऊकच आहे कीं तुझे बाबा आहेत प्रसिद्ध भाट! अरे कांहीं कांहीं लोक तर असं सुद्धां म्हणतात कीं ते स्वतःच्या पराक्रमावर स्वतःच कवित्व करतात आणि स्वतःची खूप—फाजील स्तुति करून घेतात!

**बलदेवः**—मग जे असं म्हणत असतील त्यांना जाऊन सांग कीं, तुमचं तें बोलणं माझ्या कानांवर न येईल अशी खबरदारी घ्या!

**तक्ष०ः**—( त्याला चिडवण्याकरतां हंसत ) तूं काय त्यांचा सूड घेशील?

**बलदेवः**—अर्थात्! आणि तो सुद्धां अशा रीतीनं कीं त्याची फार दिवस लोकांना आठवण रहावी.

**तक्ष०ः**—( ढोंगी आवाजानें ) मग मी देवाची अशी प्रार्थना करत्यें कीं देवा या कोवळ्या मुलाच्या नाजुक गालावर लवकर दाढी फुटूं दे!

**बलदेवः**—मला दाढी नसली तरी सुद्धां माझ्याशीं बोलण्यांत टिकण्याची बायकांची प्राज्ञा नाहीं.

**तक्ष०ः**—आणखी पुरुषांशीं लढण्याची तुझी प्राज्ञा नाहीं! म्हणूनच तुझे बाबा तुला घरीं चुलीशीं बसवून ठेवतात आणखी तुझ्या भावांना घेऊन लढाईवर जातात!

**बलदेवः**—त्यांचं इथंच तर चुकलं! माझ्यावर नजर ठेवण्यापेक्षां त्यांनीं जर तुझ्यावर चांगली कडक नजर ठेवली असती तर तुला असं गुनारांचा हात धरून, पळून जाऊन त्यांची रखेली होऊन रहावं लागलं नसतं!

**गुनारः**—बलदेव!

**सागरः**—बलदेव!!

**सरिताः**—भाई!!!

**तक्ष०ः**—( रागानें थरथर कांपत ) ठीक आहे—ठीक आहे—जरा थांब!

**बलदेवः**—(गुनारकडे आपला हात लांब करून) गुनार!! माझ्यावर रागावूं नका—फारच घाणेरडे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडले. पण तुमच्या बायकोनं मला तसं बोलणं भाग पाडलं!

**सरिताः**—( विनंतीच्या आवाजांत ) तक्षशिले, माझ्यावर जर तूं कधीं थोडं सुद्धां प्रेम केलं असशील तर त्या प्रेमाची शपथ घालून, हात जोडून मी तुला विनंति करते कीं मुद्दाम तंटा वाढवूं नको—भांडणं माजवूं नको.

**तक्ष०ः**—( हंसून ) मेजवानीच्या वेळीं जर थट्टा करायची नाहीं तर करायची तरी केव्हां?

**गुनारः**—( सागरशीं एका बाजूला बोलत होता तो बलदेवाकडे वळून ) बलदेव तूं खरा शूर आहेस ( वर भिंतीवर लटकविलेली एक तरवार काढून त्याला देतो ) ही घे तुला देणगी; तिचा योग्य कामीं उपयोग कर.

**बल०ः**—( तरवारीचें पातें तपाशीत ) गुनार, या देणगीबद्दल मी तुमचा उतराई आहे. तिचा उपयोग नामर्दपणानं कधींच केला जाणार नाहीं याची खात्री बाळगा.

**तक्ष०ः**—हें वचन जर तुला पाळायचं असेल तर ती तरवार आपल्या भावांच्या हातीं देऊं नको—

**गुनारः**—तक्षशिले !

**तक्ष०ः**—( त्याच्याकडे दुर्लक्ष करून ) किंवा ती आपल्या बापाच्या हत्यारांशेजारीं एका भिंतीवर टांगूं नको कारण तिला संसर्गदोष लागेल !

**बल०ः**—बरोबरच आहे ! कारण त्याच भिंतीवर तुझ्या बापाचीं हत्यारं आहेत, तेव्हां मी ही तरवार साहजिकच नामर्द माणसाच्या हत्याराशेजारीं कधींच टांगणार नाहीं.

**तक्ष०ः**—( संतापलेलें मन आवरून ) जेव्हां तेव्हां तुझ्या बापानं माझ्या बापाचा पराभव केला अशी तूं बढाई मारतोस पण बाजारगप्प जर खरी असेल तर तुला वाटतो तितका तुझ्या बाबांचा पराक्रम मर्दानीपणाचा नाहीं.

**बल०ः**—कोणती बाजारगप्प ग ?

**तक्ष०ः**—माझी नाहीं बाबा तुला सांगायची छाती होत; उगीच तुला भयंकर संताप येईल !

**बल०ः**—ठीक आहे तर मग, चूप रहा—तेंच बरं ! ( तिच्यापासून तोंड फिरवतो )

**तक्ष०ः**—अंः ! बाकी तुला सांगायला कांहीं हरकत नाही म्हणा...लोकं असं म्हणतात कीं पहिल्यांदा तुझ्या बाबांची भीमदेवाशीं द्वंद्वयुद्ध खेळण्याची छाती होईना—म्हणून त्यांनीं केलं काय कीं, स्त्रीवेष घेतला आणखी एका चेटकीच्या घरीं गेले ! आणखी तिथं त्या दोघांनीं मिळून तीन दिवस अहोरात्र जारण-मारणाचे प्रयोग केले ! ! अन् मग तुझे शूर बाबा भीमदेवांशीं लढायला पुरुष-वेषांत बाहेर पडले !

[ सगळेजण उभे रहातात. पाहुणे मंडळींत खळबळ उडते. ]

**बल०:**—( सर्व सहनशक्ति फाटून जाऊन ) इतकी हलकट गप्प तूं खात्रीनं लोकांच्या तोंडून ऐकली नाहींस, तुझ्याच डोक्यांतून ती बाहेर पडली असली पाहिजे. फक्त तुझ्यासारख्या विषानं भरलेल्या हृदयांतूनच असलं कालकूट बाहेर पडायचं ! तूं माझ्या बापावर माणुसकीला न शोभेल असा आरोप केला आहेस, ( तरवार फेंकून ) गुनार, ती घ्या आपली तरवार ! ज्या घरीं माझ्या बापाचा एवढा अपमान होऊं शकतो त्या घरीं मी कोणत्याच देणगीचा स्वीकार करूं शकत नाहीं.

**गुनार:**—बलदेव, माझं ऐकून तर घे !

**बल०:**—मला जाऊं द्या ! पण तुम्ही आणखी तक्षशिला आतां संभाळून असा. कारण तुमची या जगांतील सर्वांत आवडती वस्तु माझ्या बाबांच्या ताब्यांत आहे.

**तक्ष०:**—तुझ्या बाबांच्या ताब्यांत !

**गुनार:**—काय बोलतो आहेस तूं ?

**सागर:**—कुठं आहेत अरुणदेव ?

**बल०:**—माझ्या भावांना घेऊन दक्षिणेकडे गेले आहेत !

**तक्ष०:**—गुनार, अरुणदेवानं खास कमलाक्षाला मारला !

**गुनार:**—मारला ! कमलाक्ष मारला !! अरुणदेव आतां तूं आणखी तुझे कच्चेबच्चे यांचा बळी पडलाच म्हणून समज—बलदेव, हें खरें आहे का ?

**सागर:**—गुनार, माझं ऐक, गुनार !

**गुनार:**—( बलदेवास ) चल बोल, जिवाची किंमत असेल तर खरं बोल !

**बल०:**—हे पहा तुमच्या असल्या दटावणीला मी भीक घालीत नाहीं ! माझे बाबा परत येईपर्यंत दम धरा म्हणजे मग ते तुमच्या घराण्याची अब्रू चव्हाट्यावर मांडतील; आणखी तक्षशिले, मी ऐकलेले शब्द तुला सांगतों ते ध्यानांत ठेव—'सूर्यास्त होण्याच्या अगोदर तक्षशिलेचा मुलगा यमलोकाच्या वाटेला लागणार !'

( मागच्या वाटेनें बाहेर जातो. )

**गुनारः**—( अत्यंत दुःखानें ) माझा चिमुकला बाळ—कमलाक्ष—कमलाक्ष !

**तक्ष०ः**—( देहभान सुटून ) आणखी तुम्ही—तुम्ही त्याला जिवंत जाऊं दिलात—प्रत्यक्ष पोटच्या मुलाचा सूड न घेतां तुम्ही इथं मुळुमुळु रडत बसणार ! सर्व लोक तुमच्या तोंडांत शेण घालतील !

**गुनारः**—( देहभान सुटल्यासारखं दाखवून ) तरवार—कुणीतरी—कुऱ्हाड ! बलदेवा संभाळ तुझा शेवटचा क्षण—( शेजारीं उभा असलेल्या एका सैनिकाच्या हातांतून कुऱ्हाड हिसकावून घेतो व धांवत बाहेर जातो. )

**सागरः**—( त्याच्या मागोमाग जाण्याचा प्रयत्न करीत ) गुनार, हात आंवर ! त्याच्यावर वार टाकूं नको—खबरदार !

**तक्ष०ः**—( त्याला अडवून ) जाऊं द्या त्यांना ! जाऊं द्या ! बाहेर लोक आहेतच ते त्यांना बाजूला करतील. मला गुनारांचा स्वभाव पुरता माहीत आहे. त्यांच्या हातून खून होणें शक्य नाहीं ! ( तिला बाजूला सारून सागर बाहेर जातो. बाहेरून मोठा गलबला ऐकूं येतो ).

**लोकः**—कसला आवाज हा !

( बाहेरून आवाज येतो ' बलदेव पडला—बलदेव पडला '. )

**सरिताः**—काय ! बलदेव पडला !

( गुनार रक्तानं माखलेली कुऱ्हाड घेऊन प्रवेश करतो. )

**सरिताः**—( रडत ) भाई ! भाई !

**गुनारः**—( कुऱ्हाड फेंकून ) आटोपलं—कमलाक्षाचा सूड घेतला !

**सरिताः**—( रडत ) गुनार घाई केलीत—घाई केलीत !

**गुनारः**—केली असेल—झाली असेल ( एकदम दुःखानें स्फुंदत ) कमलाक्षा—सुंदरा—मनमोहना—

**तक्ष०ः**—गुनार, रडत बसूं नका, आपली मित्रमंडळी जमवा—सैनिकांना हत्यारं वाटा—बलदेवाचा सूड घेणारे पुष्कळ लोक आहेत हें विसरूं नका.

**गुनारः**—दुसरे कशाला पाहिजेत ! तो स्वतःच आपला भयंकर सूड उगवणार. आतां रात्रंदिवस स्वप्नांत, जागेपणीं, मला जिकडे तिकडे बलदेव, बलदेव, बलदेव...

**तक्ष:**—बलदेवाला योग्य तेंच बक्षीस मिळालं. कुळांतल्या एका माणसानं जर अन्याय केला तर त्याचीं फळं इतरांना भोगावीं लागणारच !

**गुनार:**—तें मला कळत नाहीं पण त्याला मारायच्या अगोदर मी सुखी होतों एवढं मात्र खरं !

**तक्ष०:**—कत्तलीनंतरची पहिली रात्र अशीच भयाण वाटते, पण ती उलटून गेली म्हणजे मग त्याचं एवढं वाटत नाही. अरुणदेवांनीं कपटानं आणखी बेशरमपणानं सूड साधून घेतला. उघड लढाईंत पडण्याची त्यांची छाती झाली नाहीं म्हणून त्यांनीं वरून वरून तडजोडीचं बोलणं लावलं, आणखी शेवटीं आपल्या निःसहाय्य बाळाचा बळी घेतला. माझी दृष्टी जर तुम्हा सर्वांना असती तर किती चांगलं झालं असतं. अरुणदेवांचं दुष्ट मन मी चांगलं ओळखत्यें, आणखी म्हणूनच त्यांच्या कच्चाबच्चांचा नायनाट करण्याची मी तुम्हांला भर दिली. त्याचं मला मुळींच वाईट वाटत नाहीं.

**गुनार:**—खरं आहे ! खरं आहे ! अरुणदेवाच्या अपराधाच्या मानानं आपण घेतलेला सूड म्हणजे कांहींच नाहीं. बलदेव मेला तरी अजून त्याला सहा मुलगे आहेत—पण मला—आतां एकहि राहिला नाहीं—एकहि नाहीं !

**एक नोकर:**—( धांवत येऊन ) अरुणदेव आले ! अरुणदेव आले ! !

**गुनार:**—अरुणदेव !

**तक्षशिला आणि गुनारची इतर माणसें:**—चला तरवारी उपसा—तरवारी उपसा.

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

**सरिता:**—( डोळे पुशीत ) बाबा !

**गुनार:**—चला हत्यारं उपसा ! सूड—कमलाक्षाचा सूड ! !

[ अरुणदेव प्रेमानं कमलाक्षाला पोटाशीं धरून खेळवीत खेळवीत प्रवेश करतो. ]

**गुनार:**—( किंकाळी फोडून ) कमलाक्ष !

**अरुण०:**—हा घे तुझा कमलाक्ष ! सुरक्षित परत आला !

**सरिताखेरीज सर्व:**—( थक्क होऊन ) कमलाक्ष जिवंत ! !

**गुनारः**—( हातांतील तरवार गळून ) हायरे दुर्दैवा ! दुर्दैवा ! कसा दावा साधलास हा ! !

**सरिताः**—( रडत ) बलदेव ! बलदेव ! भाई ! भाई ! !

**अरुण०ः**—( कमलाक्षाला खालीं ठेवून ) गुनार हा घे तुझा छोकरा परत ! पोर काय खेळाडू आहे म्हणून सांगू ?

**कमलाक्षः**—बाबा ! मी गेलों तेव्हां तुम्हीं म्हणालांत 'अरुणदेव फार खराब आहे. तो तुला मारील.' पण तें सारं खोटं—त्यांनीं मला पोटाशीं घेतला—माझे मुके घेतले !

**अरुण०ः**—( तक्षशिलेस ) आतां तुझ्या बापाला मारल्याबद्दल मी पूर्ण भरपाई केली आहे—आतां तरी तडजोड शक्य आहे का ?

**तक्ष०ः**—होय—आतां—होईल बहुतकरून !

**गुनारः**—( एकदम जागा झाल्यासारखं करून ) हें सारं भयंकर स्वप्न तर नाहीं ना ? तुम्हीं—तुम्हीं त्याला जिवंत परत आणलात !

**अरुण०ः**—तें तर तुला दिसतंच आहे; पण एवढं मात्र तुला सांगून ठेवतों कीं त्याचं पाऊल मात्र यमपुरीच्या हद्दींत पडलं होतं.

**गुनारः**—तें मला ठाऊक आहे !

**अरुण०ः**—आणखी तरी सुद्धां तो जिवंत परत आल्याबद्दल तुला हर्ष नाहीं होत ?

**गुनारः**—अहाहा ! तो जर जरासा लवकर आला असता तर माझ्या आनंदाला सीमा नव्हती ! पण तें असो—काय काय झालं तं तर मला सांगा !

**अरुण०ः**—त्यांत कांहीं विशेष नाहीं. कर्णराज तुझ्याविरुद्ध चिडलेला होताच. तेव्हां कांहीं बदमाष लोक बरोबर घेऊन कमलाक्षाच्या मागोमाग तो दक्षिणेकडे गेला.

**गुनारः**—कर्णराज ! अरेरे ! बलदेवाच्या बोलण्याचा अर्थ आतां माझ्या लक्षांत येतो आहे !

**अरुण०ः**—त्याचा कट माझ्या लक्षांत आला ! मग मी स्वस्थ कसा बसूं ! भीमदेवाला मारल्याबद्दल एकदां सोडून दहा वेळ मी नुकसान भरपाई नाकारली

नगर वाचनालय सातारा.



असती. इतकंच नव्हे तर नशिवाची तशीच गत असती तर तुझ्यावरोबर उघड युद्धांत दोन हात करून तुझासुद्धां शिरच्छेद केला असता. पण तुझा चिमुकला बाळ संकटांत पडला असतां त्याचं रक्षण करणं हें मला माझं कर्तव्य वाटलं, म्हणून आपले मुलगे बरोबर घेऊन मी दक्षिणेकडे कर्णावर चालून गेलों!

**गुनारः**—( स्वतःशीं ) आणि इकडे हें असें भयंकर कृत्य घडून आलं!

**अरुण०ः**—मी जाऊन पोंचलों तेव्हां कमलाक्षाबरोबरचे सारे लोक अगोदरच कैदी झाले होते. तुझ्या बाळाचा प्राण शत्रूच्या हातांत होता, आणखी त्यांनीं लवकरच त्याचा बळी घेतला असता. एका क्षणांत निकराची लढाई सुरू झाली. या तरवारीनं पूर्वीं कधींच गाजवला नसेल असा प्रताप गाजवला. कर्णराज आणखी त्याचीं दोन माणसं जंगलांत पळून गेलीं; बाकी सारेजण काळनिद्रा घेत समुद्र किनाऱ्यावर स्वस्थ पडून आहेत!

**गुनारः**—( अतिशय काळजीनं ) आणखी तुमचं! तुमचं काय झालं अरुणदेव?

**अरुण०ः**—( भयाण शब्दांत ) माझे सहा बालक माझ्यावरोबर युद्धाला आले—

**गुनारः**—( श्वास कोंडून ) आणखी त्यांच्यापैकीं—

**अरुण०ः**—एकही जण परत आला नाहीं!

**गुनारः**—एकसुद्धां नाहीं! ( हळू आवाजांत ) आणखी इकडे बलदेव! बलदेव! ( जिकडे तिकडे भीषण स्तब्धता पसरली आहे. तक्षशिला स्वतःच्या मनाशीं झगडत आहे. )

नगर वाचनालय सातारा
पृ ८८
१२०७
४० 

**अरुण०ः**—एकाद्या फोंफावलेल्या वृक्षराजाप्रमाणें छाती काढून तुफान वादळाशी टकरा घेत अभिमानानं डोकं उचलून उभा होतों! पण पितृदिशेकडून भयंकर झंझावात सुरू झाले आणखी एकामागून एक माझ्या प्रचंड शाखा गळून पडल्या! तरीपण कोणाला तरी वांचवण्याकरतां कुणी तरी मेलंच पाहिजे! ( माणसांकडे पाहून ) कोणी तरी मला एक पेला भरून द्यारे! ( सागराचा एक मनुष्य घाईघाईनें पेला भरून देतो; वर पाहून ) वीरानों लगामाला ढील द्या— घोडे भरधांव सोडा—वरची वाट चढतांना अडखळूं नका. तुम्ही येऊन पोंचलांत म्हणजे स्वर्गाचे सुवर्णखचित दरवाजे खडाखड उघडतील; कारण पाठ

न फिरवतां शेवटपर्यंत तुम्ही लढत राहिलांत!—चला, आतां हिमद्वीपाला परत चला—अरुणदेवाचे लढाईचे दिवस संपले. आतां या जुनाट वृक्षाला फक्त एकाच फांदीचा आधार आहे. तिच्या जिवावर या अफाट—भयाण विश्वांत तग धरून राह्यलं पाहिजे! बलदेव कुठं आहे?

**कमलाक्षः**—कुठं आहे बलदेव मला दाखवा. अरुणदेवांनीं मला सांगितलं कीं, तो मला एक जहाज करून देईल आणखी त्याच्यावर खूप खूप वीरांची चित्रं कोरील!

**अरुणदेवः**—बलदेव माझ्याबरोबर नव्हता हें फार चांगलं झालं, कारण तो जर बरोबर असता तर तो सुद्धां—छे! छे! छे! मी मनानं दांडगा आहें तरी तो धक्का मला सहन झाला नसता. पण गेला कुठं बलदेव? मी स्वारीहून परत आलों म्हणजे सर्वांच्या पुढं बलदेव असायचा! आम्हा दोघांना एकमेकांशिवाय चैन पडत नाही अगदीं!

**गुनारः**—अरुणदेव!—अरुणदेव!

**अरुणदेवः**—( घाबरत ) तुम्ही सर्वजण असे स्तब्ध कां? काय झालं, काय? बलदेव कुठं आहे?

**सरिताः**—देवा, हा घाव बाबांच्या जिव्हारी बसणार!!

**गुनारः**—( स्वतःशीं रडत ) अरुणदेव, आतां तुमच्यापासून लपवून ठेवणं शक्य नाहीं!

**अरुणदेवः**—( चिडून ) माझा बाळ! कुठं आहे तो?

**गुनारः**—बलदेव मारला गेला!

**अरुणदेवः**—मारला गेला? बलदेव? बलदेव! तूं खोटं सांगतो आहेस!

**गुनारः**—तो जर फिरून जिवंत दृष्टीस पडणं शक्य असतं तर मी आपला शेवटचा रक्तबिंदू द्यायला तयार झालों असतों!

**तक्ष०ः**—( अरुणदेवास ) जें काय घडलं त्याचा सर्व दोष बलदेवाच्याच माथ्यावर आहे! त्यानं आम्हांला खोटंच सांगितलं कीं, तुम्ही कमलाक्षावर हल्ला करून त्याची कत्तल केली. आज संध्याकाळीं तुमची आमची ताटातूट भांडणामुळं झाली, तुम्ही माझं कूळ उध्वस्त केलेलं—म्हणून आम्हाला तें सहजच खरं

वाटलं. शिवाय तो मेजवानीच्या वेळीं अगदीं चढेलपणानं वागला; प्रत्येक थट्टेचा त्यानं विपरीत अर्थ केला,–आणखी आम्हाला वाटेल तसं टाकून बोलला म्हणूनच शेवटीं गुनारना संताप चढला आणखी त्यांनीं तुमच्या मुलाविरुद्ध आपला हात उचलला.

**अरुणदेवः**—( संथपणानं ) तूं बायकोची जात आहेस म्हणूनच इतका पाल्हाळ लावते आहेस ! पण त्याची जरूर काय ! बलदेव मारला गेला असला तर त्याच्या आयुष्याचा ग्रंथ संपला—आटोपलं !

**कमलाक्षः**—बलदेव मारला गेला असला तर मला माझे वीर कसे मिळणार ?

**अरुणदेवः**—नाहीं ! कमलाक्ष ! आपण दोघेहि—तूं आणखी मी—आपल्या वीरांना पूर्ण मुकलों. ( तक्षशिलेस ) तुझा बाप म्हणाला होता " भीमदेवाचं बीज या जगांत शिल्लक असेतोंपर्यंत माझा सूड घेतला गेल्या-शिवाय रहाणार नाहीं " आपल्या बापाचे शब्द तूं खरे करून दाखविलेस ( थोडा वेळ थांबून, चाकरांकडे वळून ) त्याला घाव कोणच्या जागीं लागला रे ?

**एक चाकरः**—कपाळावर !

**अरुणदेवः**—( आनंदानें ) त्याला वीराचं मरण लाभलं—त्यानं शत्रूकडे पाठ फिरवली नाहीं ! पण तो एका बाजूला पडला कीं गुनारच्या पायांकडे पडला ?

**चाकरः**—अर्धवट एका बाजूला—अर्धवट गुनारच्या पायांकडे !

**अरुणदेवः**—तर मग त्याचा फक्त अर्धवट सूड उगवला जाणार.

**गुनारः**—( जवळ येऊन ) अरुणदेव माझं सर्वस्व देऊन टाकलं तरी आपलं नुकसान भरून येणं शक्य नाहीं हें मी जाणून आहे—तरी पण...

**अरुणदेवः**—( त्याला अडवून ) बलदेवाचं प्रेत माझ्या हवालीं कर, आणखी मला जाऊं दे. कुठं पडला आहे तो ? ( गुनार मुकाट्यानं बोट दाखवतो—अरुणदेव चालूं लागतो. सरिता व इतर कांहीं माणसें त्याच्या मागोमाग चालूं लागतात तें पाहून अरुणदेव एकदम वळतो व मेघगर्जनेच्या आवाजांत ) मागं हटा ! माझ्या मागं छात्या बडवून शोक करण्याकरतां माणसं नको आहेत ! हा अरुणदेव म्हणजे कांहीं एखादी विधवा नव्हे ! काय सांगतो आहें मी ! मागं हटा ! बलदेवाचा अत्यंविधि पार पाडायला मी एकटा पुरेसा

आहें ! ( संथपणानें ) मी निपुत्रिक झालों हें खरं आहे पण हा म्हातारा दुःखानं खचला असं मी कोणालाच म्हणूं देणार नाहीं. ( हळुहळू बाहेर जाऊं लागतो, इतक्यांत सागर प्रवेश करतो. )

**सागरः**—अरुणदेव, भिण्याचं कांहींच कारण नाहीं—सरिते, बलदेव मेला नाहीं !

**अरुण०ः**—( एकदम त्याच्याकडे वळून ) मेला नाहीं ! मेला नाहीं !

**सागरः**—नाहीं ! फक्त जखमी झाला आहे !

**अरुणदेवः**—कुठं आहे तो !

**सागरः**—नौकागृहांत !

**अरुणदेवः**—नौकागृहांत ! !

**अरुणदेवः**—( घाईघाईनें निघून जाऊं लागतो, परंतु मधेंच कांहींतरी आठवण झाल्यासारखें करून ) सागर, मी जातों—पण ( गुनारकडे बोट दाखवून ) पण तूं याला पाहून घे !

**सागरः**—आपण त्या संबंधीं अगदीं निर्धास्त असा !

( अरुणदेव जातो. )

**तक्ष०ः**—( विकट हास्य करीत ) जाऊं द्या त्यांना हवे तसे जाऊं द्या ! आतां सूड घेण्याकरतां ते जरी परत आले तरी आपणांला सैन्याची जुळवाजुळव करायला नको. सरिते फिरून सूड घेण्याच्या पवित्र हेतूनं तुझे बाबा हिमद्वीपाबाहेर जहाजं हाकरणार नाहींत बहुत करून !

**सागरः**—( चिडून ) तक्षशिले !

**सरिताः**—( त्याच आवाजांत ) इतक्या भयंकर थराला गोष्टी गेल्या तरी सुद्धां बाबांना वेडावण्याची तुझी हौस अजून पुरली नाहीं अं !

**तक्ष०ः**—एकदां एकादी गोष्ट होऊन गेली म्हणजे मग त्याबद्दल रडत बसण्यांत कोणता पुरुषार्थ ! आज सकाळीं मी अरुणदेवांशीं हेवादावा करण्याची, त्यांच्यावर सूड घेण्याची उघड उघड प्रतिज्ञा केली होती. भीमदेवांच्या मृत्यूचा, इतर साऱ्या-साऱ्या गोष्टींचा मला विसर पडला असता कदाचित् ! पण त्यांनीं

आज सकाळीं प्रत्यक्ष माझा भयंकर अपमान केला तो विसरणं शक्य नाहीं. गुनारची रखेली ! ठीक आहे—आतां मला त्याची लाज वाटायला नको. गुनार आतां तुझ्या बापापेक्षां जास्त पराक्रमी ठरले आहेत, त्याचप्रमाणें खुद्द सागरांपेक्षां त्यांची कीर्ति आणखी शौर्य जगांत जास्त दुमदुमतं आहे.

**सरिता:**—( खवळून ) इथं मात्र तूं चुकते आहेस, तक्षशिले ! सर्वांसमक्ष मी तुला छातीठोक बजावत्यें कीं, तूं एका भित्र्या बायल्याच्या घरीं नांदते आहेस !

**सागर:**—( घाईघाईनें ) सरिते ! सरिते ! तूं सावध आहेस का ?

**गुनार:**—काय ? भित्रा ! बायल्या ! !

**तक्ष०:**—( वेडावणीच्या स्वरांत हंसून ) तूं भ्रमिष्टासारखी कांहींतरी बडबडते आहेस झालं !

**सरिता:**—आतां खऱ्या गोष्टी लपवून ठेवणं शक्य नाहीं. तूं माझ्या मेलेल्या भावांची थट्टा केलीस, माझ्या बाबांची हेटाळणी केलीस तरी मी मूग गिळून स्वस्थ बसलें. एका बायल्याच्या हातून बलदेव पडला हें बाबांना कळूं नये म्हणून ते इथं होते तोंपर्यंत मी कांहीं बोलल्यें नाहीं. पण आतां याच्यापुढं हिमद्वीपांत केलेल्या अचाट पराक्रमाबद्दल उठल्या बसल्या आपल्या नवऱ्याची स्तुति करीत जाऊं नकोस-कारण गुनार रणभीरू आहेत! तुला पळवून नेणारा वीर आणखी तूं—या दोघांच्यामध्यें रात्रभर तळपत असलेली तरवार माझ्या पतीच्या कमरेवर लटकते आहे. हातांतून ओरबाडून तूं आपलं रत्नकंकण शक्तिसागरांना दिलंस, गुनारना नाहीं—समजलीस ! ( कंकणावरचा पदर बाजूला करून ) हें पहा आतां तें माझ्या दंडांत आहे.

**तक्ष०:**—( देहभान सुटून ) शक्तिसागर ! शक्तिसागरांनीं तें कृत्य—तो आस्वल...

**सर्वजण**—( ओरडून ) काय शक्तिसागरांनीं तो भयंकर आस्वल मारला ! !

**तक्ष०:**—( त्वेषानें थरथर कांपत ) त्यांनीं ? त्यांनीं ! ! गुनार हें खरं आहे का !

**गुनार:**—मी भित्रा आहें किंवा बायल्या आहें एवढं खेरीज करून बाकी सर्व खरं आहे.

**सागरः**—( दुःखानें ) भाई, तूं भित्रा नाहीस—कधींच नव्हतास ! ( आपल्या सैनिकांस ) चला, चला इथून चला !

**सरिताः**—( दारांतून ) आतां सर्वांत मोठा योद्धा कोण याचा आपल्या मनाशीं खल करीत बैस.

( शक्तिसागर सरिता आपलीं माणसें यांसह निघून जातो. )

**तक्ष०**:—( स्वगत ) आतां एकच गोष्ट करायची—एकाच गोष्टीचा रात्रं-दिवस विचार करायचा. ( एकदम उभी राहून ) एकतर शक्तिसागर मेले पाहिजेत किंवा मी तरी मेल्यें पाहिजे !

[ अंक दुसरा समाप्त ]

# अंक ३ रा

[ स्थळ व मांडणी दुसऱ्या अंकातल्यासारखी. वेळ दुपारची. दुय्यम मानाच्या जागेसमोरील आसनावर तक्षशिला बसली आहे; हातानें ती धनुष्याची दोरी विणते आहे. एक धनुष्य आणखी थोडेसे बाण जवळ पडले आहेत. ]

**तक्षशिलाः**—( दोरी ताणून ) चांगली चिवट आणखी मजबूत झाली. ( बाणांकडे पाहून ) बाणसुद्धां तीक्ष्ण आणखी वजनदार आहेत. ( हात मांडीवर गळून पडतो. ) पण हें सर्व पार पाडायला समर्थ कोण !—( एकदम चिडून ) शक्तिसागरांनीं माझी अशी हेटाळणी—आतां दुसऱ्या कोणाचीच मला पर्वा नाहीं.—माझ्या मनांतला सर्व द्वेष, सर्व तिरस्कार आतां शक्तिसागर, फक्त तुमच्याकरतां—तुम्हांला फार दिवस वाट पाह्यला नको. (विचार करते ) हो—पण–हें–हें कृत्य पार पाडायची छाती—( गुनार मागील वाटेनें आंत येतो. तो अत्यंत स्तब्ध असून विचारांत निमग्न आहे. )

**तक्ष०ः**—( थोडा वेळ थांबून ) कसं वाटतं आहे आतां तुमच्या मनाला ?

**गुनारः**—बरं नाहीं वाटत अजून ! कितीही खटपट केली तरी कांहीं केल्या कालच्या अमानुष कृत्याचा विसर म्हणून पडत नाहीं. त्याची आठवण झाली कीं माझ्या अंतःकरणाचा चुराडा उडतो आहे नुसता !

**तक्ष०ः**—माझ्यासारखं करा ! कांहींतरी काम काढा.

**गुनारः**—होय ! तसंच कांहीं तरी केलं पाहिजे. ( हात पाठीशीं बांधून कांहीं वेळ इकडे तिकडे फिरतो. नंतर ती काय करते आहे तें निरखून पाहतो. आणखी मग तिच्याजवळ येऊन ) काय करते आहेस तूं हें ?

**तक्ष०ः**—( त्याच्याकडे न पाहतां ) धनुष्याची दोरी विणत्यें आहे हें तर तुम्हांला दिसतंच आहे.

**गुनारः**—धनुष्याची दोरी !—आणखी ती सुद्धां स्वतःच्या केसांची !

**तक्ष०ः**—( स्मितहास्य करून ) आजकाल प्रत्येक क्षणाला मोठ्याल्या घडामोडी घडताहेत. काल संध्याकाळीं तुम्ही माझा मानलेला भाऊ जखमी केलात आणखी आज पहाटेपासून मी ही दोरी वळायला घेतली !

**गुनारः**—तक्षशिले ! तक्षशिले !

**तक्ष०ः**—काय झालं !

**गुनारः**—तूं काल रात्रीं कुठं होतीस !

**तक्ष०ः**—काल रात्रीं ?

**गुनारः**—तूं आपल्या महालांत नव्हतीस !

**तक्ष०ः**—तुम्हांला कसं कळलं ?

**गुनारः**—मला कांहीं केल्या झोंप येईना. एकसारखी बलदेवाचीं स्वप्नं पडत होतीं. शेवटीं तर तो हंसत हंसत माझ्या बिछान्यावर येऊन बसला—आणखी एकदम त्याच्या कपाळांतून भळभळा रक्त वहायला लागलं. शेवटीं मी जागा झालों आणखी पहातों तों अत्यंत चमत्कारिक पण नितांतमधुर अशा गाण्याचा गुंजारव माझ्या कानावर पडला. त्या गाण्यानं सर्व घर भारल्यासारखं मला वाटायला लागलं. मी हळूच उठून दरवाजांतून पाह्यलं तों तूं विस्तवाजवळ बसून बाणांना धार लावीत होतीस. आणखी तोंडानं चेटकाचे मंत्र म्हणत होतीस.

**तक्ष०ः**—तसं केल्याशिवाय गति नव्हती, कारण, सर्व जगांतल्या अत्यंत बलाढ्य अशा माणसाच्या छातींत हे बाण घुसायचे आहेत.

**गुनारः**—तक्षशिले—मी समजून चुकलों आहें. शक्तिसागरावर तुझा दांत आहे.

**तक्ष०ः**—तसंहि असेल कदाचित्.

**गुनारः**—तसं असेल तर तुझी इच्छा कधींच तृप्त होणार नाहीं. तूं किती जरी माझ्या कानांत विष ओतलंस तरी सागर माझ्या जिवाचा सखा आहे, ही गोष्ट मी कधींच विसरणार नाहीं.

**तक्ष०ः**—( हंसत ) अस्सं ! अगदीं नक्की ?

**गुनारः**—अगदीं नक्की !

**तक्ष०ः**—( धनुष्याची दोरी त्याच्याकडे करून ) मला असं सांगा गुनार, ही गांठ तुम्हांला सोडवतां येईल ?

**गुनारः**—( सोडवून पाहून ) छेः फारच कौशल्यानं गुंफली आहेस ती तूं !

**तक्ष०ः**—( उभी राहून ) भवितव्यतेनं तुमच्या आमच्या भोंवतीं आपलं जाळं पसरलं आहे, तिच्या गांठी तर माझ्या क्षुद्र गांठीपेक्षां जास्त मजबूत आहेत—तुम्हांला त्या कशा सोडवतां येणार गुनार ?

**गुनारः**—खरं आहे, विधिघटना अचाट आहे. तूं काय किंवा मी काय, आपणां सर्वांनाच तिच्यासमोर मान वांकवली पाहिजे.

**तक्ष०ः**—मला एक गोष्ट पक्की ठाऊक आहे कीं शक्तिसागरांच्यामुळं आपणां दोघांवर अनर्थपरंपरा कोसळणार.

[ कांहीं वेळ स्तब्धता—गुनार विचारमग्न होऊन उभा राहतो. तक्षशिला स्तब्धपणें त्याच्यावर एकसारखी नजर ठेवते. ]

**तक्ष०ः**—काय विचार चालला आहे ?

**गुनारः**—मला अलीकडं एक स्वप्न पडलं होतं त्याचा विचार करतों आहें. मला असं स्वप्न पडलं कीं, तूं ठरवलेलं कृत्य मी पार पाडलं आहे. शक्तिसागर मरून पडला आहे—आणखी अत्यंत निस्तेज होऊन तूं त्याच्या प्रेतापाशीं उभी आहेस; नंतर मीं तुला विचारलं, तक्षशिले, आतां तरी तुझ्या मनासारखं झालं ना ? आतां तरी तूं सुखी झालीस ना ? ' पण तूं भयंकर विकट हास्य केलंस आणखी म्हणालीस कीं, 'गुनार तुम्ही येथें मरून पडलां असतात आणि शक्तिसागर जिवंत असते तर मला जास्त आनंद झाला असता—मी जास्त सुखी झाल्यें असत्यें.'

**तक्ष०ः**—( खोटें हंसून ) असल्या क्षुल्लक स्वप्नावर विश्वास ठेऊन मी आपला बेत बदलीन असं तुम्हांला वाटतं तरी कसं ? गुनार तुम्ही मला अजून पुरती ओळखली नाहींत हेंच खरं.

**गुनारः**—तसंहि असेल—पण तक्षशिले, मला असं सांग, तूं इथं—माझ्या घरांत सुखी आहेस का ?

**तक्ष०:**—खरं सांगायचं म्हणजे गुनार, मला कधीं कधीं या तुमच्या घरांत मोडून चुरडून गेल्यासारखं वाटतं.

**गुनारः**—मला वाटलंच! आपणां दोघांपैकीं एकजण या घराला जड झाला आहे.

**तक्ष०:**—एक का दोघंहि देव जाणे!

**गुनारः**—( तिचा भावार्थ न ओळखून ) पण त्यावरहि एक उपाय आहे.

**तक्ष०:**—उपाय! तुमच्या मनांत कांहीं जीवबीव...

**गुनारः**—माझ्या मनांत आपलीं लढाऊ जहाजं सज्ज करून इथून बाहेर पडायचं आहे. तुझ्यावरच्या निरतिशय प्रेमानं बेहोष होऊन मी जी चूक केली आणखी आपली बेअब्रू करून घेतली तिची मला भरपाई करून घेतलीच पाहिजे.

**तक्ष०:**—( विचारपूर्वक ) तुम्हीं निघून जाणार? ठीक आहे; मला वाटतं, कदाचित् त्यांतच आपल्या दोघांचहि कल्याण असेल.

**गुनारः**—हिमद्वीपाहून आपण आपलीं गलबतं हांकारलीं, अगदीं त्या दिवसापासूनच माझी खात्री झाली कीं आपण दोघं एकत्र नांदू शकणार नाहीं. तूं मानी आणि निश्चयी आहेस. कित्येक वेळां तर मला तुझी भयंकर भीति वाटते. आणखी काय योगायोग आहे पहा! केवळ तेवढ्यामुळंच माझ्या मनांतली तुझ्या संबंधाची अभिलाषा कमी न होतां उलटी वाढत जाते. तूं मला जादूनं भारून टाकलं आहेस. कित्येक वेळां तर मला असं वाटायला लागतं कीं, तूं मला जगांतला वाटेल तो अन्याय करायला लावूं शकशील! ( मान हलवून ) विधिघटना मोठी खोल आहे. आपल्याला तिचा थांग लागणं कधींच शक्य नाहीं. पण मला असं वाटतं कीं सागरच तुझा नवरा व्हायला पाहिजे होता.

**तक्ष०:**—( ताडकन् उभी राहून, मोठ्यानें ओरडून ) शक्तिसागर!!

**गुनारः**—होय! शक्तिसागर! तिरस्कार आणखी सूड यांच्या वेडगळ कल्पनांनीं तूं जर आंधळी झाली नसतीस तर तुला त्याची खरी योग्यता

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

सहजच दिसली असती. शक्तिसागराचे गुण जर माझ्यांत असते तर मी तुला खात्रीनं सुखी करूं शकलों असतों.

**तक्ष०:**—( विकारवशता आवरून ) शक्तिसागरांना तें साधलं असतं असं तुम्हांला वाटतं ?

**गुनार:**—तो निश्चयी स्वभावाचा असून शिवाय तुझ्याइतकाच अभिमानी आहे.

**तक्ष०:**—( उत्तान आवाजांत ) तसं असेल तर—( एकदम मन आवरून ) कांहीं हरकत नाहीं—कांहीं हरकत नाहीं—( फिरून पिसाळलेल्या मनोवृत्तीनें ) गुनार, गुनार ! शक्तिसागरांना मारा—शक्तिसागरांना चीत करा !

**गुनार:**—अशक्य !

**तक्ष०:**—लबाडीनं आणखी कपटानं तुम्ही माझ्याशीं लग्न लावलंत तें मी विसरून जाईन. ज्या दिवशीं शक्तिसागर मरून पडतील त्या दिवशीं इथें काढलेल्या आठ भयाण वर्षांतलीं सारीं दुःखं मी विसरून जाईन.

**गुनार:**—माझ्या हातानं त्याच्या जिवाला कधींच धोका पोंचणार नाहीं. ( मागें पाऊल घेऊन ) तक्षशिले ! तक्षशिले, मला मोहांत पाडूं नकोस.

**तक्ष०:**—तर मग मला दुसऱ्या कोणाकडून तरी सूड घेवविला पाहिजे. शक्तिसागरांना मी फिरून माझा आणखी तुमचा अपमान करूं देणार नाहीं. ( मुठी वळून रागानें थरथर कांपत ) कदाचित् आत्तां या घटकेला तो तिच्याजवळ एकटा बसला असेल, त्या भागुबाईशीं हंसत खेळत आपली कुचेष्टा करीत असेल. तुमच्या बदलीं माझ्या महालांत शिरून मला उचलून नेऊन एकाद्या शिळ्या भाकरीच्या तुकड्याप्रमाणं तुमच्याकडं कशी, फेंकून दिली, ती कहाणी पुन्हां पुन्हां नव्या उमेदीनं तिला समजावून सांगत असेल. माझ्या महालांत शिरून माझ्याजवळ उभा राहिला, तरी मी त्याला न ओळखून शेवटीं कशी फसल्यें हें सारं—सारं तिला या घटकेला तिखटमीठ लावून सांगत असेल !

**गुनार:**—शक्तिसागर तसं कधींच करणार नाहीं. कद्दी नाहीं !

**तक्ष०:**—( उसळून ) सागर आणि सरिता मेलींच पाहिजेत. तीं दोघं जिवंत असतां मी मोकळेपणानं या जगांत वावरूं शकत नाहीं ! ( तिच्या डोळ्यांत

चमक मारते. ती गुनारशीं लगट करते व विकारवशतेच्या आवाजांत ) गुनार, या कामीं जर तुम्ही माझं म्हणणं ऐकलं तर मी तुमच्याशीं प्रेमानं वागेन. मी तुम्हांला आपल्या हृदयाशीं इतकं घट्ट दाबून धरीन कीं असला आनंद तुम्ही कधीं स्वप्नांत सुद्धां अनुभवला नसेल.

**गुनारः**—( हेलकावे खात ) तक्षशिले, खरोखरच......

**तक्ष०ः**—गुनार तुम्ही तयारीला लागा म्हणजे आयुष्यांत दुःख म्हणजे काय चीज असते तें सुद्धां तुम्हांला कधीं माहीत पडणार नाहीं; मी कधीं तुम्हांला टाकून बोलणार नाहीं; प्रेमानं तुम्ही कधीं माझ्याकडं पाहून गालांतल्या गालांत हंसलांत तर तिरस्काराची नजर फेंकून तुमचं हास्य मालवणार नाहीं. तुमच्याकरतां मी उंची पोषाख घालीन; तुम्ही लढाईला बाहेर पडलांत तर तुमच्या मागोमाग येईन, प्रवासाला निघालांत तर घोडेस्वार होऊन तुमच्या बाजूनं घोडा चालवीन आणखी रम्य गोष्टी सांगून तुमचं मन रिझवीन. मेजवानीला बसलांत तर तुमच्याजवळ डाव्या हाताला बसून तुमच्या हातीं मद्याचे पेले मी स्वतः भरून देईन. तुम्ही आजारी पडलांत तर उशापायथ्याशीं बसून तुमची सेवा करीन. तुम्हांला झोंप लागावी म्हणून गोड गोड गाणीं म्हणीन.

**गुनारः**—( तिच्या भाषणाच्या ओघाबरोबर वहात जाऊन ) खरोखरच हें सारं......

**तक्ष०ः**—मी आत्तां सांगितलं त्यापेक्षां अधीक—दसपट अधीक ! वचन देत्यें, शपथ घेत्यें पण माझ्याकरतां सूड उगवा—शक्तिसागर आणि सरिता यांचा भयंकर सूड उगवा म्हणजे मग मी—( दरवाजा उघडतो तें पाहून ती एकदम थांबते. दरवाजांतून सरिता आंत येते तिला ) सरिते—तूं ?

**सरिताः**—गुनार, त्वरा करा आपलीं माणसं जमवा.

**गुनारः**—माणसं, ती कशाकरतां ?

**सरिताः**—कांहीं हलकट लोकांना घेऊन कर्ण इकडं येतो आहे. त्याचा रोंख तुमच्या घरावर दिसतो आहे. सागरांनीं तात्पुरता त्याला अडवून धरला आहे. पण कुणी सांगावं ?

**गुनारः**—आहाहा ! भाई शक्ति ! तूं माझ्याकरतां आपला जीव किती वेळां धोक्यांत घालणार !

**सरिता:**—सागर तुमचे खरोखरीचे मित्र आहेत.

**गुनार:**—आणखी तक्षशिले—इकडं आपण—आपला बेत—माझं म्हणणं खरं आहे. तुझ्या शब्दांत कांहीं तरी जादू आहे. तूं जेव्हां करायला सांगतेस तेव्हां वाटेल तें कृत्य मला चांगलंच दिसायला लागतं.

**सरिता:**—तुम्ही म्हणतां आहां तरी काय गुनार !

**गुनार:**—कांहीं नाहीं ! कांहीं नाहीं ! सरिते, वेळेवर सूचना दिल्याबद्दल मी तुझा फार आभारी आहें. मी आत्तां जाऊन आपलीं माणसं गोळा करतों ( दरवाज्याकडे वळतो, पण मधूनच परतून ) अरुणदेवांचं कसं काय आहे ?

**सरिता:**—( मान खालीं घालून ) तें विचारूं नका. काल रात्रीं बलदेवाचं प्राणोत्क्रमण झालं आणखी त्यांनीं त्याला गलबतावर नेला. आतां ते मुलांकरतां चिता रचताहेत. संध्याकाळपर्यंत तुम्हांला त्यांची धास्ती नको.

**गुनार:**—अरेरे, बलदेव मेला हें फारच वाईट झालं !

**सरिता:**—तें तर खरंच ! आतां बाबांशीं तुमचं सख्य कधीं काळीं होईल अशी आशा करायला सुद्धां जागा राहिली नाहीं.

( गुनार कांहीं उत्तर न देतां बाहेर जातो.)

**सरिता:**—( तक्षशिलेजवळ येऊन ) या घरांत मला आतां एक काम करायचं अजून बाकी राहिलं आहे. तक्षशिले, मी तुला भेटायला आलें आहे.

**तक्ष०:**—मला ! कालच्या त्या प्रकारानंतर ?

**सरिता:**—तक्षशिले, माझ्यासंबंधीं आपल्या अंत:करणांत द्वेषाची ज्योत तेवत ठेऊं नकोस. दुष्ट मनोभावना आणि आकस्मिक दु:खं यांच्या कात्रींत सांपडून माझ्या तोंडून भलतेच शब्द बाहेर पडले ते विसरून जा. मी तुझी फार मोठी आगळीक केली आहे तीबद्दल मला क्षमा कर. कारण, खरं खरं सांगत्यें तुझ्यापेक्षां सुद्धां मी आज फारच दु:खी आहे.

**तक्ष०:**—दु:खी ! शक्तिसागरांची बायको असून तूं दु:खी ! !

**सरिता:**—जें जें घडलं त्या त्या सर्वाला मी कारण झाल्यें. भांडण सुरू झालं, बलदेव जखमी झाला, गुनारांचं कृत्य उघडकीस येऊन त्यांची बेअब्रू

झाली या सर्वांच्या—सर्वांच्या मुळाशीं मी आहें. अरेरे! मी किती सुखी होत्यें पण आतां या जन्मीं मला फिरून...

**तक्ष०:**—(एकदम कांहीं विचार मनांत येऊन) पण कालचं हें कृत्य घडावयाच्या अगोदर—गेली पांच वर्षं—तूं सुखी होतीस?

**सरिता:**—त्याचा तुला संशय वाटतो?

**तक्ष०:**—हं! कालपर्यंत मला त्याचा संशय आला नाहीं, पण...

**सरिता:**—पण......पण काय?

**तक्ष०:**—जाऊं दे तें. आपण दुसरं कांहींतरी बोलूं.

**सरिता:**—नाहीं तक्षशिले, तूं मला सांगितलंच पाहिजेस.

**तक्ष०:**—त्यापासून तुला कांहीं फायदा होणार नाहीं. पण तुझी इच्छाच असेल...हें पहा, आपण एकदां हिमद्वीपांत असतांना अरुणदेवांच्या बरोबर दरबारला गेलों होतों, तें तुला आठवत असेलच. दरबार आटोपल्यावर आपण सर्वजण नेहमींप्रमाणं गप्पा मारीत दिवाणखान्यांत बसलों होतों, इतक्यांत दोन तरुण तेथें आले.

**सरिता:**—होय. गुनार आणखी सागर.

**तक्ष०:**—त्यांनीं आपणांला अभिवादन केलं आणि ते आपणांमधें येऊन बसले. मग थट्टामस्करी सुरू झाली. कांहींजणांनीं प्रश्न विचारला, "हे योद्धे इथें कशाकरतां आले असावेत?" कोणीतरी उत्तर दिलं, "दुसऱ्या कशाकरतां—बायका मिळविण्याकरतां!" त्यावर शक्तिसागर म्हणाले, "माझं हृदय आकर्षण करील अशी स्त्री मिळणं फारच दुरापास्त आहे." अरुणदेवांनीं हंसत उत्तर दिलं, "हिमद्वीपांत श्रीमंत आणि थोर कुळांत जन्माला आलेल्या कुमारिकांना मुळींच तोटा नाहीं." पण सागर म्हणाले, "खऱ्या वीराला निधड्या छातीचीच बायको मिळाली पाहिजे. एकाद्या साध्या स्त्रीप्रमाणं जिची महत्त्वाकांक्षा मर्यादित नाहीं अशाच कुमारिकेची मी निवड करीन. जगांतला कोणताहि मान, कोणतंहि ऐश्वर्य तिला कस्पटासमान वाटलं पाहिजे. मी मुलुखगिरीवर निघालों म्हणजे माझ्याबरोबर येण्याची तिची तयारी पाहिजे. तिनं अंगांत चिलखत घालून हातांत भाला घेऊन रणगर्दीत घुसलं पाहिजे. तरवारींचा लखलखाट आणखी

रक्ताचा वर्षाव तिच्या नजरेला सहन झाला पाहिजे, कारण, ती भित्री असेल तर माझ्या नांवाला काळोखी लागेल." सरिते, सागर असं बोलले होते हें खरं ना?

**सरिता:**—( चांचपडत ) हो...पण...

**तक्ष०:**—अशी स्त्री मिळाली असती तर सागर सुखी झाले असते. ( तिरस्कारानें हंसत ) आणखी असं असून त्यांनीं तुझी निवड केली !

**सरिता:**—( दु:खानें चमकून ) हें सर्व सांगण्याचं...

**तक्ष०:**—आणखी अशा रीतीनं त्यांनीं तुझी निवड केल्यावर त्यांच्या शब्दाला जागून तूं नि:संशय अभिमानानं डोकं वर उचलून एखाद्या बादशाहीणी-प्रमाणं वागलीस, सागरांच्या कीर्तीला शोभेल अशा तऱ्हेनं प्रत्येकाला नमवलंस!... होय ना ?

**सरिता:**—नाहीं...तक्षशिले,...पण...

**तक्ष०:**—तूं त्यांना नवीन पराक्रम करायला उत्तेजन दिलंस ! हातांत भाला घेऊन त्यांच्या बरोबर लढाईला गेलीस ! आणखी ज्या ठिकाणीं युद्धाची भयंकर धुमश्चक्री माजली आहे अशा ठिकाणीं घुसण्यांत भूषण मानलंस—होय ना ?

**सरिता:**—( अत्यंत दु:खानें ) नाहीं—नाहीं !

**तक्ष०:**—तर मग काय तूं भ्याडासारखं वागून त्यांच्या नांवाला काळोखी फासलीस ?

**सरिता:**—( बेहोषपणानें ) तक्षशिले पुरे ! पुरे ! नको ! नको आतां !

**तक्ष०:**—( तिरस्कारानें ) आणखी तरी सुद्धां आजपर्यंत मी सुखी होत्यें असं म्हणालीस नाहीं ? सागर सुद्धां स्वत:संबंधीं असंच म्हणतील असं तुला वाटतं ?

**सरिता:**—नको ! तक्षशिले, नको ! अरेरे ! माझ्या गत आयुष्याचं किती भेसूर चित्र स्पष्टपणानं माझ्या समोर मांडलंस हें !

**तक्ष०:**—( हंसून ) एक थट्टेचा शब्द कोणी बोला कीं लागली रडायला, चल, टाक काढून तें सारं मनांतून ! हें बघ मी काय चालवलं आहे ( तिला बाण दाखविते ) बघ याची धार किती तिखट आहे ! सरिते, मला बाणांना धार लावतां येते कीं नाहीं !

**सरिताः**—धारच काय, पण तुला अचुक शरसंधान सुद्धां करतां येतं. तक्षशिले, तुझे बाण अगदीं वर्मी लागतात ग ! तूं आत्तां जें बोललीस त्याचा विचार सुद्धां कधीं माझ्या मनाला शिवला नव्हता ! ( जरा धीटपणानें—पण शक्तिसागरांचं आयुष्य मी दु:खी करून सोडलं असं म्हणणं म्हणजे—छेः छे ! तें खरं नाहीं !

**तक्ष०ः**—सरिते, घाबरूं नको ! घाबरूं नको ! तें खरोखरच खरं नाहीं ! आतां सागरांची त्यावेळची धडाडी कायम असती तर गोष्ट वेगळी ! त्या वेळची गोष्ट कशाला पाहिजे ? त्या वेळची शक्तिसागरांची महत्वाकांक्षा सर्व जगांत नरश्रेष्ठ म्हणून मिरविण्याची होती. पण आतां ते अल्पसंतुष्ट झाल्यासारखे दिसतात !

**सरिताः**—तक्षशिले, तुला त्यांच्या जबरदस्त महत्वाकांक्षेची अणुरेणू एवढी सुद्धां कल्पना नाहीं, म्हणून तूं असं बोलते आहेस. त्यांना माझ्यासारखी बायको शोभणं शक्यच नाहीं. त्यांनीं इतके दिवस ही गोष्ट माझ्यापासून लपवून ठेवली—पण—पण मी आतां साऱ्या प्रकाराला निराळंच वळण लावणार !

**तक्ष०ः**—कोणत्या तऱ्हेचं ?

**सरिताः**—यापुढं आतां मी त्यांच्यावर आपल्या जिवाचं ओझं टाकणार नाहीं; त्यांच्या वीरवृत्तीला आपल्या पोंचट वर्तनानं आळा घालणार नाहीं !

**तक्ष०ः**—तुझ्या मनांत काय जिवाचं कांहीं बरं वाईट...

**सरिताः**—चूप ! चूप ! ! कोणी तरी येत आहे !

( मागील बाजूनें एक नोकर येतो. )

**नोकरः**—बाहेर शक्तिसागर आले आहेत.

**तक्ष०ः**—कोण ? शक्तिसागर ! जा तर मग लवकर गुनारनां हांक मार जा !

**नोकरः**—कर्णराजावर स्वारी करण्याकरतां, शेजारच्या माणसांची मदत मागायला, घोड्यावर स्वार होऊन महाराज मघाशींच बाहेर पडले.

**तक्ष०ः**—खरंच ! मी विसरलेंच होत्यें. बरं जा तर तूं ( तक्षशिला सरितेकडे वळते व सरिता जायला निघते तें पाहून ) तूं कुठं चाललीस ?

**सरिताः**—इथं सागरांशीं माझी गांठ पडून फायदा नाहीं—मला जाऊं दे.

नगर वाचनालय, सातारा



संगणकीकृत

या सर्वांचा शेवट आमच्या ताटातुटींत होणार हें तर उघडच दिसतं आहे—पण त्यांची भेट इथं—छे: छे नको ग बाई !

( डाव्या हातच्या रस्त्यानें बाहेर निघून जाते. )

**तक्ष०:**—आणखी असल्या या भागूबाईवर मी सूड घेणार होत्यें ! तो तर अगदींच फुसका बार झाला असता—पण आतां माझा बाण अगदीं वर्मी जाऊन भिडला असेल ! ( कांहीं थांबून ) मरणं कठीण तर खरंच पण कैक वेळां जगणं त्याहूनही जड वाटतं !

( मागच्या दारांतून सागर प्रवेश करतो. )

**तक्ष०:**—आपण गुनारनां भेटायला आलां असाल? थोडे थांबा, ते इतक्यांत येतील. ( जायला निघते. )

**सागर:**—नाही. तक्षशिले, थांब. मी तुला भेटायला आलों आहें.

**तक्ष०:**—मला ! !

**सागर:**—आणखी तूं एकटी भेटलीस हेंहि फार चांगलं झालं.

**तक्ष०:**—आपण माझा अपमान करण्याकरतां आलां असाल तर एकटी काय आणि दुकटी काय—चिकार माणसांनीं भरलेल्या दिवाणखान्यांत सुद्धां आपल्या विरुद्ध माझं रक्षण कोण करणार ?

**सागर:**—( निश्वास टाकून ) हं ! माझ्याविषयीं तुझ्या मनांत कोणत्या भावना खेळताहेत तें मी पूर्ण ओळखून आहें.

**तक्ष०:**—( भीषण भिन्नतेनें ) बहुत करून मी तुमच्या बाबतींत अन्यायानं वागत्यें असं तुम्हांला वाटत असेल नाहीं ? छे ! छे! शक्तिसागर, तुम्ही माझ्या साऱ्या जन्माचं मातेरं केलंत ! आपल्या मनाला साक्षी ठेऊन मला सांगा कीं माझ्याशीं ती भयंकर प्राणघातकी प्रतारणा कुणी केली ? माझ्या महालांत शिरून, मला प्रेमाच्या बाता मारून कुणी वेडी बनवली ? आणखी शेवटीं एकाद्या कुत्र्या-समोर शिळ्या भाकरीचा तुकडा फेंकून द्यावा त्या प्रमाणं मला गुनारांच्याकडं कुणी फेंकून दिली ? माझी किंमत फक्त गुनारांची बायको होण्यापुरतीच आहे अशी खूणगांठ मनाशीं बांधून शेवटीं आपल्या आवडत्या कुमारिकेला घेऊन कोण निघून गेलं ? तुम्ही ! तुम्ही !! तुम्ही !!!

**सागरः**—या जगांत जरी मनुष्याला पुष्कळच गोष्टी पराक्रमानं साध्य करून घेतां येतात तरी आयुष्यांतले खरेखुरे आणीबाणीचे प्रसंग दैवाधीन असतात. आपली दोघांची तशी गत झाली !

**तक्ष०ः**—खरं आहे ! खरं आहे ! दुष्ट नशिबाचें जगावर साम्राज्य आहे. तरी पण आपण जर त्याच्यापुढं मान वाकवली नाहीं तर त्याची शक्ति सहज ढिली पडते. नशिबाशीं टक्कर देण्याची ज्याची हिंमत असेल त्यालाच शेवटीं विजयश्री माळ घालते. आणि म्हणूनच मी तशी टक्कर देण्याची तयारी चालवली आहे.

**सागरः**—काय करायचं आहे तुझ्या मनांतून ?

**तक्ष०ः**—नशीब जरी बलवत्तर असलं तर मी त्याच्याशीं एकदां झगडून पहाणार आहें. पण जाऊं द्या तें ! आपण दुसरं कांहींतरी बोलूं !

**सागरः**—( थोडावेळ थांबून ) गुनारकरतां तूं फारच चांगली शस्त्रें तयार करतेस.

**तक्ष०ः**—गुनार करतां नाहीं—तुमच्या विरुद्ध !

**सागरः**—त्याचाच अर्थ तो !

**तक्ष०ः**—तसंहि असेल कदाचित् ! कारण, मी जर नशिबासारखीं जाळीं विणण्यांत पटाईत झाल्यें तर तुमची आणखी गुनारांची—आज नाही उद्यां—लढाई झाल्याशिवाय खास रहात नाहीं ! ( ती त्याच्याकडे कांहीं वेळ पहात उभी रहाते, नंतर गालांतल्या गालांत हंसते आणि मग बदललेल्या आवाजांत ) कधीं-कधीं माझ्या मनांत काय विचार चालतात सांगूं ? मी कित्येक वेळां नाना तऱ्हेच्या कल्पना-तरंगांत रंगून जात्यें. अशा वेळेला मी आपले डोळे मिटून घेत्यें आणि कल्पना करत्यें कीं, शूर वीर रणधीर शक्तिसागर आमच्या किनाऱ्यावर येऊन पोंचले आहेत; आमचं घरदार जाळून टाकण्याचा आम्हाला धाक घालीत आहेत. गुनारांची सर्व माणसं मरून पडलीं आहेत. फक्त ते आणि मी दोघंच जिवंत राहिलों आहोंत. शक्तिसागरांची माणसं घराला आग लावीत आहेत. शक्तिसागर आपली सिंहासारखी छाती काढून प्रचंड पर्वतासारखे स्थिर उभे आहेत—तो देखावा पाहून मी चूर होऊन गेल्यें आहें ! इतक्यांत गुनार म्हणताहेत ‘ एकच

अचूक शरसंधान–एकच अचूक शरसंधान आपल्याला वांचवील'—असं म्हणून धनुष्याला बाण लावीत आहेत तोंच त्याची प्रत्यंचा तुटते आहे. "तक्षशिले, तक्षशिले, आपल्या केंसांचा गोफ घेऊन मला एक दोरी वळून दे" अशी गुनार मला निकड लावीत आहेत—पण मी निश्चल उभी राहून हंसत म्हणत्यें आहें, "जळूं द्या–खाक होऊं द्या ! आयुष्याची किंमत मला आतां मूठभर गवतापेक्षां जास्त वाटत नाही !"

**सागर:**—तुझ्या प्रत्येक शब्दांत किती विलक्षण मोहनी भरली आहे !

( तिच्याजवळ जातो. )

**तक्ष०:**—( त्याच्याकडे चमत्कारिक नजरेनें पहात ) तुम्ही—तुम्ही माझ्या-जवळ बसायची इच्छा दाखवितां !

**सागर:**—तुला वाटतं माझ्या अंतःकरणांत तुझ्यासंबंधीं राग घुमसतो आहे. तक्षशिले, ही आपली शेवटची भेट आहे. माझ्या मनाला एकसारखी टोंचणी लागली आहे आणि म्हणून मी असाच्याअसाच निघून जाऊं शकत नाहीं; कारण मी जाण्याच्या अगोदर माझ्या मनाचा तुला एकदां ठाव लागलाच पाहिजे.

**तक्ष०:**—काय करायचं आहे तुमच्या मनांत ?

**सागर:**—तुला एक कहाणी सांगायची आहे.

**तक्ष०:**—दुःखमय ?

**सागर:**—अगदीं प्रत्यक्ष आयुष्याइतकी दुःखमय !

**तक्ष०:**—( तिखट शब्दांत ) आयुष्यांतल्या दुःखांची तुम्हांला काय कल्पना आहे शक्तिसागर ! !

**सागर:**—माझी कहाणी ऐकल्यावर तुझा तूंच निवाडा कर.

**तक्ष०:**—ठीक आहे. सांगा, तोंपर्यंत मी आपलं काम तरी संपवित्यें.

( तो तिच्याजवळ तिच्याच आसनावर बसतो. )

**सागर:**—एकदां काय झालं कीं संपत्ती आणि कीर्ति मिळवण्याकरतां दोन योद्धे आपल्या घरून बाहेर पडले, त्यांनीं अखंड मैत्रीच्या शपथा घेतल्या आणि घरीं, द्वारीं, स्मशानीं एकमेकांची पाठपुरवणी करण्याचा निश्चय केला.

**तक्ष०:**—त्या योद्धयांचीं नांवं गुनार आणि शक्तिसागर—होय ना ?

**सागर:**—ठीक आहे ! आपण त्यांना तींच नांवं ठेऊं. कांहीं दिवस जलपर्यटण केल्यावर ते दोघे हिमद्वीपाला येऊन पोंचले. तिथं एक वृद्ध संस्थानिक राज्य करीत होता; त्याच्या घरांत दोन कुमारिका होत्या. पण त्यांतील एक—त्या संस्थानिकाची मानलेली मुलगी—दुसरीपेक्षां फारच वरचढ होती; कारण ती केवळ धैर्याची पुतळी होती. ते दोघे योद्धे नेहमीं तिच्या गोष्टी बोलत आणि शेवटीं दोघांचंहि एकमत होई कीं, त्रिखंड जगतांत इतकी उत्तम स्त्री मिळणं शक्य नाहीं.

**तक्ष०:**—काय ! दोघांच्याहि मतानं ! !—तुम्ही काय माझी थट्टा मांडली आहे !

**सागर:**—गुनारच्या मनांत रात्रंदिवस ती कुमारिका खेळत होती—आणि शक्तिसागर तर जवळजवळ तिच्याकरतां वेडा झाला होता. पण त्या दोघांहि योद्धयांनीं एकमेकांजवळ आपल्या प्रेमाची केव्हांहि कबुली दिली नाहीं. तिच्या बाजूनं बोलायचं म्हणजे तिनं गुनारवर कधींच आसक्ति दाखविली नाहीं—किंवा शक्तिसागरालाहि त्याच्या प्रेमांत कधीं उत्तेजन दिलं नाही. ( कांहीं वेळ थांबतो. )

**तक्ष०:**—(श्वास कोंडून) सांगा !—सांगा !—पुढचं सांगा—मी हात जोडत्यें !

**सागर:**—तिच्या असल्या बेपर्वाईच्या वर्तनानं उलट शक्तिसागराचं मन तिच्याकडं जास्तच ओढ घेऊं लागलं; तें इतकं कीं त्याचं त्याला आवरतां आवरेना ! शेवटीं काय झालं कीं, एका रात्रीं मेजवानीच्या वेळीं त्या मानी कुमारिकेनं प्रतिज्ञा केली कीं मी घातलेली अट जो पाळील त्याच्याशींच मी विवाह करीन, असं म्हणून तिनं आपली भयंकर अट सांगितली—त्याबरोबर तिथं जमलेल्या सर्व वीरांच्या तोंडचं पाणी पळालं, पण शक्तिसागराच्या हृदयांतून मात्र हर्षाच्या लहरी उसळायला लागल्या, कारण आपण हें कृत्य सहज करून जाऊं अशी त्याला धमक वाटत होती—( भयाण शब्दांत )—पण विधिघटना विचित्र होती—गुनारनं त्याला बाजूला हांक मारली व आपली प्रेमकहाणी सांगितली; पण शक्तिसागरानं आपली बाजू मांडली नाहीं त्यामुळं असं घडलं कीं...

**तक्ष०:**—सागर ! सागर ! ! ( मन आवरून ) ही गोष्ट खरी आहे ? ही कहाणी सत्य आहे ?

**सागरः**—होय, खरी आहे! अगदीं खरी आहे!! शेवटीं काय झालं कीं, आमच्यापैकीं एकाला माघार घ्यावी लागली. गुनार माझा मित्र होता. मी केलं तें केल्याशिवाय मला दुसरा कांहीं इलाजच नव्हता. अशा तऱ्हेनें तूं गुनारची बायको झालीस आणि मला सरितेबरोबर लग्न करावं लागलं.

**तक्ष०ः**—आतां—आतां तिच्यावर प्रेम करतां?

**सागरः**—नाहीं; फक्त तिला सन्मानानं वागवतो. या जगांत शक्तिसागरानं एकाच स्त्रीवर खरं प्रेम केलं पण विधिघटना काय विचित्र आहे पहा कीं, तिनं पहिल्याच भेटींत शक्तिसागराविरुद्ध आपल्या धनुष्याच्या दोरीला वैराच्या गांठी मारायला सुरवात केली! (उठून) आमची करुणकहाणी संपली; आणि आतां एकच काम करायचं बाकी राहिलं आहे—तें हेंच कीं, तुम्हांला एकदां शेवटचा मुजरा करायचा आणखी एकमेकांना शेवटचा निरोप द्यायचा!

**तक्ष०ः**—नाहीं! थांबा!! जाऊं नका!!! शक्तिसागर! शक्तिसागर! तुम्ही हें काय केलंत हो!

**सागरः**—काय केलं मीं!! तक्षशिले, तुला काय झालं एकदम? अशी फिकी कां पडलीस?

**तक्ष०ः**—आणखी आत्तां मला हें सारं तुम्ही सांगतां अहांत-इतक्या उशिरां-छेः छेः तें मला खरं वाटत नाहीं.

**सागरः**—ही आपली शेवटची भेट आहे. हें आपलं शेवटचं संभाषण आहे. मी सांगितलं त्यांतला प्रत्येक शब्द खरा आहे. तुझ्या मनांतली माझ्यासंबंधीं वैराची गांठ सुटून जावी म्हणून—आणि शक्य असल्यास तुझ्या हृदयांत माझ्याकरतां दयेचा थोडासा ओलावा निर्माण व्हावा म्हणून तुला ही कहाणी सांगणं भाग पडलं.

**तक्ष०ः**—(बेभान, बेहोष होऊन नकळत हातांत हात अडकवते, आणखी थक्क होऊन पण शांतपणानं एकसारखी त्याच्याकडे पहात उभी राहते.) माझ्यावर प्रेम केलं—तुम्ही माझ्यावर प्रेम केलं? (एकदम त्याच्याजवळ जाऊन) मला नाहीं तें खरें वाटत! (त्याच्या डोळ्याकडे निरखून पहाते व दुःखाची किंकाळी फोडून) अगबाई! खरं आहे! खरं आहे!! दुर्दैवा! दुर्दैवा, कसा दावा साधलास हा!!

[आपलं तोंड दोन्हीं हातांनीं झांकून मागें सरकते.]

**सागर:**—तक्षशिले!

**तक्ष०:**—( एकदां रडते आहे, एकदां हंसते आहे आणि हे दोन्ही भाव मनांतल्या मनांत दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत ) माझ्याकडं लक्ष देऊं नका गडे! माझ्या बोलण्याचा अर्थ इतकाच कीं,—( त्याच्याजवळ जाऊन ) शक्तिसागर, तुमची कहाणी अपुरी राहिली! तुमच्या गोष्टींतली ती मानी कुमारिका—तिचंसुद्धां तुमच्यावर प्रेम होतं—अलोट प्रेम होतं! ( संथपणानं ) होय. सागर, माझं तुमच्यावर निरतिशय प्रेम होतं. तुम्ही मघांशीं म्हणालांत मी आपलं प्रेम तुम्हांला दाखवलं नाहीं—पण मी पडल्यें बायको माणूस—तेव्हां तसं करण्याशिवाय मला दुसरा कांहीं इलाजच नव्हता! मी जर आपलं प्रेम तुम्हांला दिसूं दिलं तर तुमचं मन माझ्यावरून उडेल अशी मला भिती वाटत होती. तुम्ही जगांतल्या इतर कोणत्याहि माणसापेक्षां जास्त श्रेष्ठ आहां अशी माझी खात्री होती. आणि म्हणूनच तुम्ही दुसऱ्या एका स्त्रीशीं लग्न केलंत ही गोष्ट नेहमीं माझ्या मनांत शल्याप्रमाणें खुपत राहून मी अगदीं बेभान होऊन जात असें—ती इतकी कीं कित्येक वेळां माझं मलाच आश्चर्य वाटे!

**सागर:**—( सर्व मनोवृत्तिं उचंबळून येऊन ) अशा तऱ्हेनें नशिबानं आपल्या दोघांच्याभोंवतीं दु:खाचं जाळं विणून ठेवलं आहे.

**तक्ष०:**—त्याचा सर्व दोष तुमच्यावर–तुमच्या माथ्यावर! पुरुषानं नेहमीं शौर्यानं आणि निश्चयानं वागलं पाहिजे. मी ज्या वेळीं इतकी कडक अट घातली त्यावेळीं माझ्या मनांत फक्त तुमच्यासंबंधींचाच विचार घोळत होता—फक्त तुमच्याशींच विवाह करण्याचा माझा निश्चय होता. आणखी माझी खात्री होती कीं, या जगांत त्या आस्वलाला फक्त तुम्ही एकटे मारूं शकाल–आणि तो माझा तर्क खरा ठरला–पण तुम्ही काय करून बसलांत कीं......

**सागर:**—गुनारला हृद्रोग लागला आहे हें मला कळून चुकलं होतं. फक्त मी एकटा त्याला बरा करूं शकत होतों. मग तूंच सांग मला दुसरा कोणता तरी मार्ग मोकळा होता का? शिवाय, तुझंहि माझ्यावर प्रेम आहे हें जर मला आधीं कळलं असतं, तर कदाचित् मी निराळ्या तऱ्हेनं वागलों असतों. कारण प्रेमाचा प्रताप कांहीं और आहे.

**तक्ष०:**—( घाईनें ) तें कसंही असो—सागर—केवळ एका क्षुल्लक लबाडीमुळं आपली इतकी वर्षं ताटातूट झाली. पण आतां ही दुर्दैवाची गांठ सुटली. आतांतरी पुढं आपण मागच्या दुःखांची भरपाई करूं या !

**सागर:**—तसं होणं आतां या जन्मीं तरी शक्य नाहीं ! आपली फिरून—आणि ती सुद्धां कायमची ताटातूट होणार !

**तक्ष०:**—शक्तिसागर, आपली ताटातूट या जन्मीं आतां होणं शक्य नाहीं. तुमच्यावर माझं प्रेम आहे, आणि न लाजतां न शरमतां सर्व जगाला तसं ओरडून सांगण्याची माझ्या अंगांत हिंमत आहे. कारण माझं प्रेम म्हणजे एकाद्या भागूबाईच्या प्रेमाप्रमाणं वाऱ्यावर हेलखावे खाणारा क्षुद्रमनोविकार नव्हे ! शक्तिसागर, उठा ! उठा !! जगांत सुखाला सुद्धां कांहीं किंमत असते हें विसरूं नका. तें मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न करा. आपल्या दोघांचीही तशीच इच्छा असली तर आपण स्वतंत्रच आहोंत, तेव्हां आपल्याला हा प्रीतीचा डाव जिंकणं कांहीं जड नाहीं !

**सागर:**—स्वतंत्र ! आपण दोघं स्वतंत्र !!

**तक्ष०:**—सरितेची तुम्हांला आतां काय पर्वा आहे ! गुनारची मला आतां काय किंमत आहे ! त्या दोन क्षुद्र जीवांच्याकरतां आपली दोघांची माती करून घेण्याची काय जरूर आहे !!

**सागर**—तक्षशिले, तक्षशिले !!

**तक्ष०:**—गुनारला इथं राहूं द्या; सरितेला बापाबरोबर घरीं परत पाठवून द्या; मला आपलं शिरस्त्राण, चिलखत चढवून तुम्ही जिकडं जिकडं जाल तिकडं तिकडं तुमच्या मागोमाग येऊं द्या ! भिऊं नका, शक्तिसागर, तुमची लाडकी बायको म्हणून मी तुमच्याबरोबर येत नाहीं; कारण कायद्यानं मी दुसऱ्याची आहे—आणखी तुमच्या बिछान्याची मालकीण अजून जिवंत आहे. छे: छे: शक्तिसागर, बायको म्हणून नव्हे तर तुमच्या जिवाची मैत्रीण म्हणून मी तुमच्याबरोबर येईन, तुमची कीर्ति त्रिखंड गाजावी म्हणून लढाईच्या वेळीं तुम्हांला उत्तेजन देईन ! तरवारींचा खणखणाट झडूं लागला कीं मी तुमच्या-जवळ बाजूला उभी राहीन; आणखी दैवानं उलट खाऊन तुम्हाला कधीं दूर जलपर्यटणाला निघून जावं लागलं तर तुफान दर्यावरुन तुमच्या मागोमाग

जगाच्या शेवटापर्यंत प्रवास करीन. आणखी शेवटीं ज्या दिवशीं तुमची प्रेतयात्रा निघेल त्या दिवशीं, एक शक्तिसागरांची व एक तक्षशिलेची—अशा दोन चिता पेटवाव्या लागतील !

**सागर**—मला सुद्धां एके काळीं हींच सुखस्वप्नं पडत असत. पण आतां तें संपलं, त्याचा काळ उलटून गेला. एका उंच पर्वताच्या दोन तुटलेल्या कड्यांवर तक्षशिले, आपण दोघं उभीं आहोंत, आणखी गुनार व सरिता एकाद्या प्रचंड खाईप्रमाणं आपणां दोघांच्यामध्यें आडवीं येताहेत. गुनारकरतां मी आपल्या तरुणपणच्या प्रेमाचा विध्वंस करून घेतला—आतां निदान हा स्वार्थत्याग वायां जाणार नाहीं अशा तऱ्हेनं मला वागलं पाहिजे; मग त्याकरतां मला वाटेल तीं दुःखं सहन करावीं लागलीं तरी हरकत नाहीं. आणखी गरीब बिचारी सरिता ! तिनं तर माझ्यावर एकाद्या अजाण अर्भकाप्रमाणं विश्वास टाकून घरदार, माणसंकुणसं, पिताबंधू यांचा त्याग केला. तेव्हां ज्या ज्या वेळीं मीं तिला प्रेमानं कुरवाळली त्या त्या वेळीं माझ्या मनांत तक्षशिलेसंबंधीचे विचार खेळत होते असा तिला संशय सुद्धां येतां कामा नये.

**तक्ष०ः**—आणखी असल्या क्षुल्लक कारणाकरतां तुम्ही आपल्या आयुष्याचं मातेरं करून घेणार ? मग तुमच्या शक्तिसामर्थ्याची, तुमच्या शौर्याची, तुमच्या मनाच्या मोठेपणाची किंमत ती काय राहिली ! आणि तुम्हाला काय वाटतं यापुढं मी गुनारच्या घरीं एक क्षणभर तरी राहूं शकेन ? छे ! छे ! शक्तिसागर, माझं ऐका. तुमच्यासारख्या पुरुषाला करतां येण्यासारख्या कितीतरी गोष्टी आहेत ! कनकपूरच्या गादीवर इंद्रसेन डुलक्या घेत बसला आहे, त्याची तंगडी धरून त्याला धुळींत फेंकण्याचा प्रयत्न करा ! मोठमोठे योद्धे आनंदानं तुमच्या सैन्यांत या कामाकरतां दाखल होतील ! आपण दुर्दमनीय अशा पराक्रमानं पुढं सरकूं आणि तुम्ही राजसिंहासनावर अधिष्ठित होईपर्यंत पराक्रमाची शिकस्त उडवून देऊं !

**सागरः**—माझ्या बेफाम तारुण्यांतलीं हीं सारीं सुखस्वप्नं, तक्षशिले, तूं किती स्पष्टपणं बोलून दाखवीत आहेस ! पण हें सारं मला विसरून गेलं पाहिजे. मला आतां तूं मोहांत पाडूं नकोस.

...(वाचनालय) ...



**तक्ष०:**—आपल्या दोघांच्या जन्माची गांठ आतां विधात्यानं बांधली आहे, ती आपल्याला कशी सोडवतां येणार ? माझ्या जन्माचं ध्येय आतां स्पष्ट झालं—तुम्हाला जगांत उदयाला आणायचं—तुम्हाला राजसिंहासनावर बसवायचं ! इथं घालवलेल्या प्रत्येक क्षणाला तुमची मूर्ति माझ्या हृदयांत खेळत होती—ती फोडून टाकण्याचा मी कितीतरी वेळां प्रयत्न केला पण दुर्बळ ठरल्यें ! आतां तसं करण्याची जरूर राहिली नाहीं, कारण तुमचं माझ्यावर प्रेम आहे हें आतां मला कळून चुकलं...

**सागर:**—( कठोर होण्याचा प्रयत्न करून ) असं असेल तर नीट ऐकून घे ! माझं तुझ्यावर प्रेम होतं; पण आतां तें सारं संपलं ! मी ते जुने दिवस विसरून गेलों.

**तक्ष०:**—खोटं—शक्तिसागर—खोटं ! माझी एवढी योग्यता खास आहे कीं एक वेळ जर तुम्ही माझ्यावर प्रेम केलं असेल तर तुम्हाला तें विसरून जाणं कधींहि शक्य नाहीं.

**सागर:**—( आवेशानें ) मला तें विसरलंच पाहिजे.

**तक्ष०:**—अशक्य ! अशक्य ! मला दूर लोटण्याचा तुम्ही हवा तेवढा प्रयत्न करा—त्याचा आतां कांहीं उपयोग होणार नाहीं, कारण रात्र पडायच्या अगोदर गुनार आणि सरिता यांना सारं कांहीं कळून चुकेल !

**सागर:**—माझी खात्री आहे, तूं असं करणार नाहींस.

**तक्ष०:**—मी तें करणार !

**सागर:**—मग मी केलेली तुझी पारख खोटी होती म्हणायची ! तूं म्हणजे एक मानी स्त्री आहेस अशी माझी कल्पना होती !

**तक्ष०:**—वाईट प्रसंगांमुळं विचारांना दुष्ट वळण लागतं. तुम्ही माझ्यावर वाजवींपेक्षां फाजील प्रसंग आणलेत. पण आतां मी तुमच्याबरोबर रणांगणावर येणार ! गुनारचा लटुपटीचा संसार पुरे झाला !

**सागर:**—पण स्वाभिमानाची किंमत तूं नेहमीं प्रेमापेक्षां जास्त समजतेस ! बलदेवाला मारल्यामुळं गुनार आणि मी यांना भांडायला पुरेसं कारण आहे. अशी

२८९ ९२५४ ना ६०

कल्पना कर कीं तो माझ्या हातून पडला, तरी—तरीसुद्धां तूं साऱ्या गोष्टी उघड करून माझ्या मागं येशील ?

**तक्ष०:**—( चपापून ) आपण असं कां विचारतां ?

**सागरः**—अगोदर माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. मी जर तुझ्या नवऱ्याला ठार मारला तर तूं काय करशील ?

**तक्ष०:**—( त्याच्यावर नजर रोखून ) मी आपल्या तोंडाला खीळ घालीन—आणखी तुमचा मृत्यू घडवून आणीपर्यंत विश्रांति म्हणून घेणार नाहीं.

**सागरः**—( स्मितहास्यपूर्वक ) शाबास तक्षशिले, मला वाटलंच कीं माझी परीक्षा खोटी नव्हती !

**तक्ष०:**—( एकदम ) पण हें सारं घडणंच शक्य नाहीं !

**सागरः**—त्यांत काय अशक्य आहे ? बलदेवाच्या मरणाचा फांसा टाकून तूंच तर गुनार किंवा मी यांच्यापैकीं एकाचा मृत्यू ठरवून ठेवला आहेस.

( गुनार इतर कांहीं माणसांसमवेत प्रवेश करतो. )

**गुनारः**—( खिन्नपणानें, तक्षशिलेस ) तूं लावलेल्या विषवृक्षाला कडू फळं यायला लागलीं.

**सागरः**—( त्याचे जवळ जाऊन ) काय झालं गुनार ?

**गुनारः**—कोण ? भाई शक्ति ! काय झालं ? जें व्हायचं तेंच झालं ! सरितेनें मला कर्णाचं वृत्त कळवल्याबरोबर मी घोड्यावर स्वार झालों आणि आपल्या शेजाऱ्यांच्या जवळ मदत मागायला गेलों.

**तक्ष०:**—( काळजीनें ) बरं मग ?

**गुनारः**—मला जिकडं तिकडं दांडगाईचीं उत्तरं मिळालीं. कर्णाशीं झालेल्या भांडणाचं खापर त्यांनीं माझ्याच माथीं फोडलं. तोंडानं उच्चारहि करवत नाहीं असे नाना तऱ्हेचे आरोप त्यांनीं माझ्यावर केले. मला भित्रा म्हणून माझी निर्भत्सना केली आणि माझ्याशीं कोणत्याहि तऱ्हेचा संबंध ठेवायचा नाहीं असं त्यांनीं उघड बोलून दाखवलं !

**सागरः**—तुला अशा तऱ्हेचा अपमान फार वेळ सहन करावा लागणार नाहीं—तूं काळजी करूं नकोस. रात्र पडायच्या अगोदर कर्णावर स्वारी करण्याकरतां तुला पुरेशी माणसं मिळतील.

**गुनारः**—भाई, मी तुझा कसा उतराई...

**तक्ष०ः**—( विजयी मुद्रेनें ) मला वाटलंच !

**सागरः**—( कठोरपणाचा आव आणून ) पण एवढ्यानंच संपलं नाहीं ! तुमची आमची जुनी मैत्री आजपासून तुटली ! ऐक गुनार, तूं माझ्या बायकोचा भाऊ अन्यायानं मारलास त्याबद्दल मी तुला उद्या—सूर्योदयाबरोबर—द्वंद्वयुद्धाला आव्हान करतों ! ( तक्षशिला एकदम सागराकडे एक पाऊल टाकते. पण पुन्हां मन सांवरून जागच्याजागीं निश्चल उभी राहते. )

**गुनारः**—( पूर्ण थक्क होऊन ) द्वंद्व युद्ध ! माझ्याशीं ! भाई शक्ति, तूं ही काय थट्टा आरंभली आहेस !

**सागरः**—( निश्चयी आवाजांत ) मी तुला द्वंद्वयुद्धाला आव्हान देतों आहें. फक्त मृत्यूनंच तो प्रश्न सुटेल. आपणांपैकीं कोणी तरी एक जण उद्यां पडलाच पाहिजे !

**गुनारः**—( दुःखानें ) आत्तां माझ्या लक्षांत आलं ! मी आंत आलों तेव्हां तूं तक्षशिलेशीं एकटा बोलत होतास, तिनं तुझा फिरून कांहींतरी अपमान केलेला दिसतो !

**सागरः**—तसं ही असेल कदाचित् ! ( तक्षशिलेकडे वळून ) खऱ्या मानी स्त्रीनं आपल्या नवऱ्याची अब्रू सांभाळलीच पाहिजे. ( नोकरांकडे वळून ) आणखी अरे ए—तुम्ही जाऊन आपल्या धन्याच्या शेजाऱ्यांना सांगा कीं, उद्या त्याचं आणखी माझं द्वंद्वयुद्ध होणार आहे. या शक्तिसागराबरोबर युद्धाला उभं राहण्याची जो छाती दाखवील त्याला भित्रा म्हणण्याची कोणाची प्राज्ञा आहे !

( नोकर जातात. )

**गुनारः**—( त्याच्याजवळ जाऊन व त्याचा हात आपल्या हातांत धरून ) भाई शक्ति ! भाई शक्ति ! आतां मला कळलं ! पूर्वी एकदां माझ्या सुखाकरतां

तूं आपलं आयुष्य धोक्यांत घातलंस—आणखी आतां माझ्या अब्रूकरतां आपला जीव पुन्हां संकटांत घालीत ओहस !

**सागरः**—त्याबद्दल तूं आपल्या बायकोचा ऋणी आहेस. केवळ तिच्याकरतां मला हें सारं करावं लागत आहे. उद्या सकाळीं—ठरलं मग ?

**गुनारः**—मी तुला भेटेन ! ( प्रेमानें ) माझी शेवटची भेट म्हणून ह्या तरवारीचा स्वीकार कर. ती मौल्यवान् आहे.

**सागरः**—नाहीं. ती आहे तिथंच लटकूं दे ! कुणी सांगावं, कदाचित् उद्यां सकाळनंतर मला फिरून तरवारीची गरजच पडणार नाहीं.

**गुनारः**—जा ! भाई जा ! ( त्याचे हात आपल्या हातांत धरून ठेवतो. )

**सागरः**—येतों मी आतां !

( गुनार डाव्या बाजूनें जातो, सागर एक वेळ तक्षशिलेकडे नजर फेंकून मागच्या वाटेनें निघून जातो. )

**तक्ष०ः**—( थोडा वेळ स्तब्ध उभी राहते. नंतर हळूं आवाजांत ) उद्यां सकाळीं यांची लढाई ! यांच्यापैकीं कोण बरं पडेल ? ( पुन्हा स्तब्ध उभी राहते, नंतर मोठ्यानें ओरडून ) कोणीहि पडो ! कोणीहि पडो ! शक्तिसागरांची आणखी माझी ताटातूट आतां यापुढं कधींच होणं शक्य नाहीं.

[ अंक तिसरा समाप्त ]

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

# अंक ४ था

( स्थळः—समुद्रकिनारा. संध्याकाळ. आकाशांत ढगांची गर्दी उसळलेली आहे; मधून मधून चंद्र दिसतो आहे. मागच्या बाजूला एक मोठी समाध दिसत आहे. एका खडकावर, हातांचीं कोपरें मांडीवर टेकून, तळहातांवर मस्तक ठेवून अरुणदेव बसला आहे. त्याच्या डोक्यावर कांहीं नसून केस मोकळे सुटले आहेत. समाधीजवळ दिवट्यांच्या उजेडांत माणसें काम करीत आहेत. थोड्या वेळानें सागर आणि सरिता नौकागृहांतून बाहेर येतात. आंत विस्तव पेटलेला दिसत आहे. )

**सरिताः**—( हळूच ) ते पहा; अजून तसेच बसले आहेत. ( सागराला मागें ओढून ) नका ! त्यांच्याशीं इतक्यांत बोलूं नका.

**सागरः**—खरंच ! घाई करण्यांत अर्थ नाहीं. त्यांना कांहीं वेळ शोक करूं द्यावा हेंच बरं.

**सरिताः**—( पुढें येऊन बापाकडे दुःखानें पहात उभी राहाते, नंतर सुस्कारा टाकून ) बलदेवाचं प्रेत काल स्वतःच्या पाठीवरून गलबतावर नेलं, तेव्हां बाबांचं धैर्य ढळलं नव्हतं—चिता पेटवल्या तरी त्यांचं धैर्य खचलं नव्हतं, पण एकदां चिता धडधड पेटून गेल्यावर शोकानं त्यांचा मनावरचा ताबा सुटला; घाव जिव्हारीं बसला ! ( अश्रू पुसून ) सागर ! आपण घराकडे जहाजं कधीं हांकारणार ?

**सागरः**—एवढं हें वादळ थांबलं, आणखी गुनारचं हें प्रकरण मिटलं म्हणजे !

**सरिताः**—आणखी मग तुम्ही जमिनी खरेदी करून आपल्याकरतां एक घर बांधणार ना ? या लढाया आतां पुरे झाल्या गडे !

**सागरः**—हो ! मी तुला अगोदरच कबूल केलं आहे.

**सरिताः**—आणखी मी तुम्हांला बायको शोभत नाहीं, असं तक्षशिला म्हणत होती तें सारं खोटं ना ?

**सागरः**—खोटं ! सारं खोटं ! तुझा माझ्यावर विश्वास आहे ना ?

**सरिताः**—अहाहा ! आतां माझ्या सुखाला पारावार नाहीं. आतां मी इथं पाहिलेल्या साऱ्या भयंकर गोष्टी विसरून जाईन. घरीं गेल्यावर हिंवाळ्यांत विस्तवासमोर बसून आपण गुनार आणि तक्षशिला यांच्या गोष्टी बोलूं !

**सागरः**—सरिते ! तुला जर आपल्या सुखाची किंमत असेल तर घरीं गेल्यावर तुझ्या तोंडून तक्षशिलेचं नांवसुद्धां माझ्या कानांवर येतां कामा नये.

**सरिताः**—( किंचित् रोषानें ) तिचा इतका द्वेष करणं चांगलं नाहीं ! सागर, आपल्या औदार्याला तें शोभत नाहीं.

**एक मनुष्यः**—( अरुणदेवांजवळ जाऊन ) समाध पुरी झाली.

**अरुण०ः**—( जागा झाल्यासारखें करून ) समाध !—तर—मग—आतां—

**सागरः**—त्यांच्याशीं बोल आतां, सरिते !

**सरिताः**—बाबा ! थंडी किती पडली आहे ती पाहिलीत का ? आणखी वादळ पण काय सुटलं आहे !

**अरुण०ः**—काय झालं पडली म्हणून ! आपण त्यांना विस्तवावर ठेवलं तें विसरलीस वाटतं ? त्यांना थंडी कशी बाधेल आतां !

**सरिताः**—तें खरं ! पण बाबा ! तुम्हांला—

**अरुण०ः**—मला ? मला काय होणार आहे !

**सरिताः**—तुम्ही आज कांहींच खाल्लं नाही. आंत निवाऱ्याला चला, जेवण तयार आहे.

**अरुण०ः**—राहूं दे तें ! मला भूक नाहीं !

**सरिताः**—पण तुम्ही इथे असे बसूं नका !—तुम्हांला संवय नाही—कांहीं तरी भलतंच होईल.

**अरुण०ः**—तुझं म्हणणं खरं आहे. माझ्या छातींत कांहींतरी अडकल्या-सारखं वाटतं आहे. मला श्वास घेतां येत नाहीं. ( चेहरा दोन्ही हातांत लपवितो. सरिता त्याच्याजवळ बसते. )

**सरिता:**—उद्यां तुम्ही शिडं उभारून गलबत हांकारणार ना ? घरीं जायचं ना आतां आपण ?

**अरुण०:**—घरीं ? आतां मला घरीं जाऊन काय करायचं ? मी इथंच आपल्या बाळांच्या जवळ राहणार आहें !

**सरिता:**—( दु:खानें ) बाबा !

**अरुण०:**—तूं आंत जा पाहूं; मला त्रास देऊं नकोस ! एक दोन वादळाच्या रात्री माझ्यावरून गेल्या कीं ... मग सारं आटोपेल !

**सागर:**—अरुणदेव ! ही भाषा आपल्या तोंडीं शोभत नाहीं.

**अरुण०:**—मी आतां विश्रांती करतां हपापलों आहे याचं तुम्हांला नवल वाटतं ? माझं काम आटोपलं—सर्व मुलांना मी पोहोंचवलं !—( चिडून ) मला एकटा बसूं द्या ! जा ! जा ! !

**सागर:**—( सरिता उभी राहते, तिला हळू आवाजांत ) आणखी कांहीं वेळ त्यांना स्वस्थ बसूं दे.

**सरिता:**—नाहीं ! मला आणखी एक उपाय करून पाहूं द्या ! मला त्यांचा स्वभाव पुरता ठाऊक आहे. ( अरुणदेवास ) तुमचं जगांतलं काम संपलं असं तुम्ही म्हणतां—पण अजून तें संपलं नाहीं. तुम्ही आपल्या मुलांना पोहोंचवलं पण बाबा ! तुम्ही शाहीर आहांत ना ? तुम्ही आपल्या मुलांवर अजून शोकगीत कुठं रचलं आहे ?

**अरुण०:**—शोकगीत ? छे:! छे! काल मी तें कदाचित् रचलं असतं, पण—आज मी एकदम म्हातारा झालों ! खचलों !

**सरिता:**—पण बाबा ! तुम्हांला तें रचलंच पाहिजे. तुमचे सगळे मुलगे मोठाले योद्धे होते, त्यांचे गुण कोणीतरी गायला नकोत का ? त्यांच्या जवळच्या नातलगांत तुमच्या एवढा मोठा एक सुद्धां शाहीर नाहीं.

**अरुण०:**—शोकगीत ! तुला काय वाटतं सागर ?

**सागर:**—मला वाटतं सरितेचं म्हणणं खरं आहे.

**सरिताः**—आपण घरीं गेल्यावर श्राद्धाच्या दिवशीं जर त्यांचे पराक्रम वर्णन करणारं शोकगीत नसेल तर लोक काय बरं म्हणतील ? इतक्यांतच त्यांच्या मागोमाग जाण्याची काय घाई आहे बाबा ?

**अरुण०ः**—बरं तर! मी प्रयत्न करून पाहतों. सरिते! तूं ऐकून ठेव; म्हणजे मी गेल्यावर तुला तें खडकावर खोदून ठेवतां येईल! ( मशाली घेऊन त्याचे सैनिक त्याच्या भोंवतीं जमतात. कांहींवेळ विचारांत मग्न राहून सुरवात करतो )—

### शोकगीत

**या अनल ज्वाला दुःखाच्या, जाळिती माझ्या कां हृदयाला ।**
**एका मागून एक कृतान्तें, नेले ओढुनि माझे बालक ।**
**मम ऊर फुटे किती खोल ।**
**दुःख किती सहणार विकल हें ।**
**वीरहृदय मम काल अमित कां ।**

अहाहा! आतां माझ्या अंगांत फिरून तकवा आला ( आपल्या माणसांस ) चला! गड्यांनो आपण दोन घांस खाऊन घेऊं. दिवसभर कामानं तुम्ही थकून गेलां असाल! ( आपल्या माणसांबरोबर नौकागृहांत जातो. )

**सरिताः**—देवानंच मला बुद्धी दिली म्हणायची! ( सागरास ) चलायचं ना ?

**सागरः**—नाहीं! मला भूक नाहीं, सरिते! उद्याच्या प्रसंगाकरतां तूं आपल्या मनाची तयारी करून ठेवली आहेस ना ?

**सरिताः**—सागर! मी वीरपत्नी आहें! वीरपत्नीची पतीच्या मरणाकरतां नेहमींच तयारी असते. ( हंसून ) पण अजून मी एकही अश्रू मात्र ढाळला नाहीं, कारण मला माहीत आहे कीं आपण गुनारपेक्षां फार भारी आहांत.

**सागरः**—देव करो आणि तुझ्यावर माझ्याकरतां अश्रू ढाळण्याचा प्रसंग न येवो. ( थांबून समुद्राकडे दूरवर पहात उभा राहतो. )

**सरिताः**—काय ऐकूं येतं आहे तुम्हाला सागर ?

**सागरः**—तुला ऐकूं नाहीं येत त्या तिकडे ? ( डावीकडे बोटानें दाखवितो

व मागच्या बाजूला जाऊन ) बहुतेक गारांचा वर्षाव होणारसा रंग दिसतो... कोण आहे तें ?

**कर्णराजः**—( बाहेरून ) तुमच्या ओळखीचीच माणसं आहेत शक्तिसागर ! ( कर्णराज कांहीं उडाणटप्पू माणसांसह प्रवेश करतो. )

**सागरः**—कर्ण ! कुठं चाललास ?

**कर्णराजः**—गुनारच्या घरीं.

**सागरः**—शत्रू म्हणून ?

**कर्णराजः**—अर्थात् ! आपण मला काल अडवलंत; आज माझं करणं आपणाला खास आवडेल.

**सागरः**—अस्सं !

**कर्णराजः**—तुमचा गुनारशीं तंटा झाला हें मला कळलं आहे. पण माझ्या मनाजोग्या साऱ्या गोष्टी घडल्या तर गुनार द्वंद्वयुद्धाला अगदीं खिळखिळा होऊन येईल.

**सागरः**—कर्णराज ! सांभाळ, तूं भलत्याच कामाला हात घालतो आहेस बरं !

**कर्णराजः**—( बेपर्वाईनें हंसत ) तें माझं मी पाहून घेईन. तुमच्या मनांत आज रात्रीं जर जहाजाचीं शिडं उभारायचीं असतील तर खुशाल उभारा; कारण मी आतां मोठा जाळ पेटवणार आहे त्याचा तुम्हाला आयता उजेड मिळेल ! चला ! दोस्त, चला ! ( ते जातात. )

**सरिताः**—सागर ! सागर ! आपण त्याला थांबवलाच पाहिजे ! गुनारच्या घराला आग लावण्याचा त्याचा बेत दिसतो.

**सागरः**—( नौकागृहाजवळ जाऊन ) अरुणदेव, उठा ! उठा ! आपल्या मुलांना मारल्याबद्दल कर्णावर सूड घ्या.

**अरुण०ः**—( बाहेर येऊन ) कर्ण ! कुठं आहे तो ?

**सागरः**—गुनारचं घर जाळायला तो आतांच इथून गेला.

**अरुण०ः**—छान ! छान ! जाळूं द्या, जाळूं द्या ! मला तरी गुनार आणि तक्षशिला यांच्यावर सूड घ्यायचाच आहे. माझं आयतंच काम झालं. कर्णाला मी मागाहून पाहून घेईन.

**सागरः**—या बोलण्यांत कांहीं अर्थ आहे अरुणदेव ? तुमच्या मनांत कर्णावर सूड घ्यायचा असेल तर तुम्ही त्याला आतांच पकडला पाहिजे, कारण हें नीच कृत्य पार पाडल्याबरोबर तो जंगलांत पळून जाईल. शिवाय, मी गुनारला द्वंद्व-युद्धाकरतां आव्हान दिलंच आहे. समजा, माझ्या हातून जरी तो निसटला तरी मग तुम्ही आहांतच! पण कांहीं झालं तरी त्याचं आपण आज रक्षण केलंच पाहिजे. अरुणदेव ! तुम्ही आपल्या नातलगांना अशा तऱ्हेनं बदमाषांच्या हातून मरूं देणार का !

**अरुण०ः**—तुझं म्हणणं खरं आहे. मी आज गुनारचं रक्षण करीन पण उद्यां तो मेलाच पाहिजे.

**सागरः**—तो किंवा मी ! आपण खात्री बाळगा.

**अरुण०ः**—चला तर ! अरुणदेवाच्या चिमण्या वीरांनों ! आतां तुमच्या-बद्दलचा सूड ! ( वर पहातो; व आपली माणसं घेऊन निघून जातो. )

**सागरः**—सरिते ! तूं त्यांच्याबरोबर जा ! मला इथंच राहिलं पाहिजे. कारण गुनारच्या आणि माझ्या द्वंद्वाची बातमी चोहोंकडे पसरली आहे तेव्हां मला उद्यांपर्यंत त्याला भेटतां येत नाहीं. पण तूं आपल्या बापाबरोबर रहा. त्याला भलतं सलतं कांहीं करूं देऊं नकोस ! गुनारच्या घरांत बायकामाणसं आहेत त्यांना—किंवा तक्षशिलेलासुद्धां यत्किंचित् धक्का पोहोंचतां कामा नये.

**सरिताः**—बरं, तर मग मी जात्यें ! आपण तक्षशिलेची सुद्धां इतकी काळजी वाहतां अं ! आपल्या औदार्याची धन्य आहे !

**सागरः**—जा ! जा लौकर !

**सरिताः**—ही मी निघाल्येंच ! पण तक्षशिलेसंबंधीं आपण अगदीं निर्धास्त राहा. तिच्या महालांत सोन्याचं चिलखत आहे, आणि आत्मसंरक्षण करण्याची तिच्या अंगांत धमक पण आहे.

**सागरः**—तें तर आहेच !—पण जा आतां तूं ! आपल्या बापाला भलतं सलतं कांहीं करूं देऊं नकोस—सर्वांना सांभाळ—गुनारच्या बायकोला सांभाळ.

**सरिताः**—आपण काळजी करूं नका !—येत्ये मी ! ( जाते. )

**सागरः**—भाई गुनार! तुझ्यावर प्राणसंकट आलं असतां शक्तिसागराल स्वस्थ बसावं लागलं असा हा आयुष्यांत पहिलाच प्रसंग! (ऐकून) इतक्यांतच तरवारींचा खणखणाट सुरू झाला! कर्ण गुनारच्या घरीं पोहोंचलेला दिसतो. (जाण्याकरतां वळतो इतक्यांत थक्क होऊन मागें पाऊल घेतो.) कोण? तक्षशिला! तूं इथं कशी?

[ तक्षशिला घाईनें प्रवेश करते. तिच्या अंगावर सोन्याचें चिलखत असून डोक्यावर शिरस्त्राण आहे. केस मोकळे सुटलेले आहेत. पाठीवर बाणांचा भाता असून कमरपट्ट्याला एक लहानशी ढाल अडकविली आहे. हातांत धनुष्य आहे त्याची दोरी तिच्या स्वतःच्या केसांची वळलेली असून ती मागें पहात पहात, भीतभीत घाईनें चालते आहे. नंतर सागराला पाहून घाईघाईनें त्याच्याजवळ येते आणि पुटपुटते.]

**तक्ष०ः**—सागर! सागर! तुम्हाला तो दिसतो का?

**सागरः**—कोण? कुठं?

**तक्ष०ः**—लांडगा! तो पहा, माझ्यामागं! हालत नाहीं चालत नाहीं—फक्त माझ्याकडे आपल्या गुंजेसारख्या लालभडक डोळ्यांनीं टवकारून पहातो आहे. सागर! तो मला नेहमींच दिसतो. पण आज मला तो तिनदां दिसला—त्याचा अर्थ इतकाच कीं आज रात्रीं मी खात्रीनं मरणार!

**सागरः**—तक्षशिले! तक्षशिले!

**तक्ष०ः**—तो पहा! तो पहा! जमिनींत गडप झाला (लांडग्यास) जा! जा! तुझा इशारा मला पोहोंचला.

**सागरः**—तक्षशिले! तूं देहभानावर नाहीस. चल इथं उभी राहूं नकोस, आंत चल.

**तक्ष०ः**—नाही! मी इथंच थांबणार! माझी वेळ भरत आली.

**सागरः**—तुला झालं आहे तरी काय तक्षशिले?

**तक्ष०ः**—मला काय झालं आहे? कुणाला ठाऊक! पण तुम्ही आज म्हणालांत तेंच खरं. गुनार, आणखी सरिता हीं आपणांमध्यें आडवीं येत आहेत. सागर! आपण दोघंहि आपल्या नश्वर देहाचा त्याग करूं म्हणजे मग आपल्याला कोणीहि आडवं येणार नाही.

**सागरः**—आपण दोघं ? अस्सं ! तुझ्या मनांत आपण दोघांनीं आत्महत्या...

**तक्ष०ः**—आपण परक्या स्त्रीशीं लग्न लावलं त्या दिवसापासूनच मी स्वतःला मुकल्यें. सागर, आपण फारच दुष्ट कृत्य केलंत. मनुष्याला या जगांत फक्त एकाच गोष्टीचं दान देण्याचा अधिकार नाहीं—आणि ती गोष्ट म्हणजे आपली लाडकी बायको. पण आपण स्वार्थत्यागाच्या नांवाखालीं निसर्गाचे नियम पायाखालीं तुडवलेत—आणखी दोन जिवांचा नाश उडवलात. माझं मन मला मोठ्यानं ओरडून सांगत आहे कीं, तुम्ही आणि मी जर का एकमेकांशीं विवाह-रज्जूनं बद्ध झालों असतों तर सर्व जगांत तुमची ख्याती झाली असती, आणखी मी सुखी झाल्यें असत्यें. तुमच्यावर एकादं भयंकर संकट कोसळलं असतं तर तुम्हाला मी आपल्या दांडग्या मनाचा पाठिंबा दिला असता, आणि अशा तऱ्हेनं एकाच पुरुषाच्या प्रेमांत मला विश्वांतल्या साऱ्या उदात्ततेचा आणि शौर्याचा आनंद चाखायला मिळाला असता.

**सागरः**—गेल्या गोष्टीबद्दल शोक करीत बसण्यांत काय अर्थ आहे ! तुला काय वाटतं मला माझ्या भवितव्याची कल्पना आली म्हणजे आनंद होत असेल ? रोज सरितेबरोबर आयुष्य घालवायचं, आणखी खोट्या प्रेमाचे खोटे खेळ खेळायचे ! तरी पण तें सारं केलंच पाहिजे. विधिघटना बदलणं ही आपल्या हातची गोष्ट थोडीच आहे !

**तक्ष०ः**—( निश्चयानें ) विधिघटना बदललीच पाहिजे. आपण दोघंहि आपले नश्वर देह फेकून देऊं आणखी जें आपल्याला इथं साधलं नाहीं तें स्वर्गांत साधूं. ही माझ्या धनुष्याची दोरी पाहिलीत ? ती मी अस्सल मंत्रांनीं भारून ठेवली आहे. तिनं नेम कसा अचूक लागेल. ( धनुष्याला दोरी चढवते व त्याला बाण लावते. ) ऐका ! केवढा झंझावात सुटला आहे. मेलेले वीर स्वर्गाची वाट चढत आहेत. चला आपण त्यांच्या मागोमाग जाऊं.

**सागरः**—( मागं सरून ) तक्षशिले ! तक्षशिले ! मला तुझी भिती वाटते !

**तक्ष०ः**—आतां आपली ताटातूट करायला कोण समर्थ आहे ? या मृत्युलोकांत आपलं लग्न झालं नाहीं तेंच बरं झालं ! संसार करायचा ! कापूस पिंजायचा ! सूतं काढायची ! आणखी पोरं पाजायची ! शीः !

**सागरः**—पुरे ! पुरे ! तुझं डोकं फिरल्यासारखं झालं आहे. विचार करून

करून तुझ्या मनाचा चुराडा उडाला आहे! ( एकदम घाबरून ) तें बघ! तें बघ! गुनारचं घर पेटलं!

**तक्ष०:**—जळूं द्या! खाक होऊं द्या! गुनारच्या लाकडी घरापेक्षां स्वर्गातले राजवाडे जास्त भव्य आहेत.

**सागर:**—अग ते तुझ्या नवऱ्याचा—गुनारचा—जीव घेत आहेत.

**तक्ष०:**—मला त्याची काय पर्वा आहे? आज मी तुमच्याबरोबर थाटानं स्वर्गाची वाट चढेन. होय, सागर, असं झालंच पाहिजे. या जगांत मला आतां चैन नाहीं पडायचं! स्वर्गातले देव आपलीं कर्तव्यं विसरून हतप्रभ झाल्यासारखे दिसतात. चला! मी तुम्हाला स्वर्गाच्या सिंहासनावर बसवत्यें. ( बाहेर मेघांचा कडकडाट ऐकूं येतो. ) तें पाहिलंत! ते पहा घोडेस्वार! ते पहा दोन काळे घोडे भरधांव सुटले. एक तुमच्याकरतां आणि एक माझ्याकरतां. चला! आतां शेवटच्या प्रयाणाला सुरवात करायची! ( धनुष्य उचलून त्याच्यावर बाण मारते. )

**सागर:**—अचूक शरसंधान! ( पडतो ) तक्षशिले! तक्षशिले!

**तक्ष०:**—( आनंदाच्या उर्मीनें ) सागर! सागर! आतां आपण सर्वस्वीं एकमेकांचीं झालों.

**सागर:**—तक्षशिले! तुझी छबी मी आपल्या हृदयांतून फाडून टाकली तेव्हांपासून माझ्या अंतःकरणांतून एकसारखा रक्ताचा वर्षाव होत होता—पण आतां जखम सांधली—माझा जीव खाली पडला—मी सुखी झालों. ( मरतो ).

**तक्ष०:**—(संथपणानें) गेला! जगांतला पराक्रम गेला! शौर्य गेलं! औदार्य गेलं! पण सागर, तुम्हाला एकटं नको जायला! ही मी तुमच्या मागोमाग आल्येंच. चला आतां समुद्राच्या विशाल उदरांत!—( समुद्रांत उडी मारते! )

[ अरुणदेव, सरिता, व कमलाक्षाला पोटाशीं घेऊन गुनार असे एकामागून एक येतात. ]

**अरुण०:**—( समाधीकडे वळून ) आतां मला स्वस्थ झोंप येईल!—बाळांनो, तुमचा पुरता सूड घेतला!

**सरिता:**—बाबा! बाबा! भीतीनं माझी अगदीं गाळण उडाली आहे! खालीं जिकडे पहावं तिकडे रक्तच रक्त आणखी वर आकाशांत भयंकर वादळ!

**गुनारः**—अरुणदेव, मला आज रात्रीपुरती माझ्या बाळाकरतां निवाऱ्याची जागा पाहिजे !

**अरुण०ः**—गुनार !

**गुनारः**—हो अरुणदेव, मी तुमच्या तावडींत सांपडलों आहे खरा. माझं घर जळून खाक झालं ! माझी सारी माणसं मारली गेलीं. माझं काय वाटेल तें करा !

**अरुण०ः**—तें सागर पाहून घेईल ! पण तोंपर्यंत तूं खुशाल आंत ये, आणि विश्रांति घे ! ये, बाहेर राहाणं धोक्याचं आहे.

**सरिताः**—चला ! चला ! आंत चला. ( नौकागृहाकडे जाते. सागरचं प्रेत पाहून किंकाळी फोडते ) सागर ! सागर ! कोणीतरी दावा साधला हो ! कुणी-तरी खून केला !

**अरुण०ः**—सागरचा ?

**गुनारः**—भाई ! शक्ति !

**सरिताः**—( त्या सर्वांकडे वेडावलेल्या नजरेनें पहात ) छेः ! छेः ! तें खरं असणं शक्य नाही. शक्तिसागरांना कोण मारणार ?—( तिला धनुष्य दिसतें ) अगबाई ! हें काय ?

**अरुण०ः**—बेटा तुझं पहिलंच बोलणं खरं आहे, सागराचा खून झाला !

**गुनारः**—( एकदम घाईनें ) आणखी तक्षशिला ? तक्षशिला कुठं आहे ? ती इथं आली होती ?

**सरिताः**—तें मला माहीत नाहीं; पण हें धनुष्य मात्र तिचं आहे.

**गुनारः**—मला वाटलंच !

**सरिताः**—आपला द्वेष—आपला राग पुरता उगवून घेतलान् बिचारीनं !

**गुनारः**—( स्वतःशीं ) सागराला मारला ? द्वंद्वयुद्धाच्या आदल्या रात्रीं सागरला मारला ? एकंदरींत तिचं माझ्यावर प्रेम होतं तर !

**कमलाक्षः**—( घाबरून ) बाबा ! बाबा ! ते पहा ! ते पहा !

**गुनारः**—काय ?

मंदिर (वाचनालय) सातारा

**कमलाक्षः**—ते पहा काळे घोडे !

**गुनारः**—छत् ! ते नुसते ढग !

**अरुण०ः**—छेः ! छेः ! ती वीरांची शेवटची स्वारी आहे.

**कमलाक्षः**—ती पहा त्यांच्याबरोबर आई आहे.

**सरिताः**—देवा ! देवा !

**गुनारः**—काय म्हणतो आहेस बेटा ? कुठं आहे तुझी आई ?

**कमलाक्षः**—ती पहा सर्वांच्या पुढं—काळ्या घोड्यावर ! बाबा ! बाबा ! ( घाबरून मिठी मारतो. )

**गुनारः**—खात्रीनं तक्षशिला सुद्धां मेली !

**अरुण०ः**—आणखी तिच्याबरोबर आपलं भांडण संपलं.

**गुनारः**—अरुणदेव ! मी आपला अत्यंत ऋणी आहें. चला, चला ! इथून चला. मी तुमच्याबरोबर हिमद्वीपाला येणार !

**अरुण०ः**—चला ! चला ! हा प्रवास फार दिवस आपल्या लक्षांत राहणार !

[ पडदा पडतो. ]

# तुतारीचे पडसाद !

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

श्री० वर्तक यांचें एकंदर लिखाण व जगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि जर समजावून घ्यावयाची असेल तर त्यांचें पहिलें पुस्तक "तुतारीचे पडसाद" हें ताबडतोब वाचा !

हा ओजस्वी निबंध श्री० वर्तक यांनीं १९२६ सालीं लिहिला असून केशवसुतांवर टीका करतांना त्यांनीं कलावंत कवि व तत्त्वज्ञानी कवि या दोघांतील सूक्ष्म भेद अगदीं मार्मिकपणें दाखवून दिले असून, शिवाय आमच्या सामाजिक व राजकीय गुलामगिरीवर अत्यंत निर्भीड व तेजस्वी टीका केली आहे ! "जगा !" "जगा !" "जगा !" हा या पुस्तकाचा निष्कर्ष आहे.

प्रकाशकः—ट्युटोरिअल् प्रेस,

गिरगांव बॅकरोड, मुंबई नं० ४